तू भ्रमत आहासी वाया

वपु काळे

VISIT…

तू भ्रमत आहासी वाया

वपु काळे

तू
भ्रमत
आहासी
वाया

वपु काळे

मेहता
पब्लिशिंग
हाऊस

प्रीती लागी तुम नामकी
पल बिसरे नाही
नजर करो अब मेहेरकी
मोहे मिलो गुसाही
बिरह सतावे मोही को
जीव तरपैं मेरा
तुम देखन की चाह है
प्रभु मिला सवेरा
नैना तरसे दरसको
पल पलक न लागे
दर्दबंद दीदार का
निस्वास जागै
जो अबको प्रीतम मिले
करू निमित न न्यारा
अब कबीर गुरू पाईया
मिला प्राण पियारा ।।

— कबीर

ज्यांचं बोलणं ऐकत राहावं,
अशा तीन व्यक्ती समोर आहेत-
सौ. सरोजिनी वैद्य,
श्रीमती शांता शेळके,
सौ. वीणा देव
स्पष्ट वाणी, नेमके विचार, योग्य विवेचन, माधुर्य,
प्रसाद गुण, प्रचीतीचं वलय आणि निखळ प्रांजळपणा.
या सगळ्याचा संगम, खरा त्रिवेणी संगम
म्हणजे वीणा, सरोजिनी आणि शांताबाई.
असाच प्रत्यय व्यासंग आणि लेखनशैली
यांच्या संगमातून येतो, त्या अरूणा ढेरे
'सायरा'ची तिसरी आवृत्ती ह्या चौघींच्या प्रतिभेला

— वपु

।। प्रस्तावना ।।

ज्ञानेश्वरीचा दुसरा अध्याय वाचता वाचता एका ओवीशी माझी मनपावले रेंगाळली. मनाच्या घुमटात विचारांचे प्रतिध्वनी घुमायला लागले. काय होते आहे हे कळेनासे होऊ लागले. वपुंची बेदम आठवण झाली. त्यांनी लिहिलेल्या कथा-कादंबऱ्यांतल्या कित्येक व्यक्ती माझ्या आठवण सावलीभोवती पिंगा घालू लागल्या. ज्ञानेश्वरीतल्या प्रत्येक साडेतीन चरणी ओवीतली प्रचंड ताकद, व्यक्त होत असलेली ज्ञानेश्वरांची अनुभव जाणीव, त्यातून प्रतित होत असलेला अर्थ, त्या प्रतित होत असलेल्या अर्थापलिकडचे कवेत न सापडणारे आध्यात्मिक चिंतनाचे आभाळ, शैलीपलीकडची रंगजाणीव, अर्थजाणीव, सहजसोपेपणातून अनंताकडे झेप घेणारी प्रकाशजाणीव, अलगदपणे अंतिम सत्याकडे पोहोचणारी भक्तीजाणीव, इतकेच नव्हे तर गीतेतला श्रीकृष्णाचा संदेश आभाळव्यापी करणारी समग्र ज्ञानेश्वरी हा जसा वैयक्तिक चिंतनाचा विषय आहे अगदी तसेच, वपुंच्या कितीतरी कथांच्या बीज स्वरुपाशी, अफाट प्रतिभेने निर्माण केलेल्या घटना चक्राशी, शैलीशी आणि एकूणच खास वपु टच् असलेल्या प्रतिमासृष्टीशी ही ज्ञानेश्वरीतली आनंद जाणीव रेंगाळते आहे. आध्यात्मिक मनाचे शुचिर्भूत भगवेपण पांघरून वपुंच्या कथेतले हे कितीतरी नायक-नायिका त्याच चिंतनाचा आधार होत आहेत.

सुखी संतोषा न यावें । दुःखी विषादां न भजावे ।
आणि लाभालाभ न धरावें । मनामाजीं ।

सुखाचा वारा अंगावर आला म्हणून बेभान होऊन नाचू नये की दुःखाचा झंझावात अवघं आयुष्य समूळ नष्ट करायला लागला म्हणून विषादाचा विलाप करू नये. मनातल्या अंतर्मनातसुद्धा लाभ आणि हानी यांची चित्रे उमटू देऊ नयेत, हे सांगणारे संत ज्ञानेश्वर स्वतः तसे अनुभवसिद्ध आयुष्य जगले आणि तसे ते प्रभावीपणे सांगू शकले. ही ओवी जगणारी काही थोडी माणसे आजही पहायला मिळतात. लेखकांच्या लेखनातून डोकावतात. वपुंच्या प्रस्तुतच्या 'तू भ्रमत आहासी वाया' मधली सायरा ज्ञानेश्वरीतल्या याच ओवीत दडलेली नाही तर अशा कितीतरी आशयघन ओव्यांतले चिंतन प्रकट करते आहे, हे कादंबरी वाचतांना जाणवतेच जाणवते. सायरा म्हणूनच प्रचंड आठवली. कारण वपुंनी ह्या प्रस्तुतच्या कादंबरीत सायराच्या व्यक्तित्त्वाचा केलेला विकास हा पूर्णपणे ज्ञानपायऱ्यांवरचा आहे आणि भक्तीची भगवी पताका सायराने स्वतःच्या जगण्यातून आणि बोलण्यातून व्यक्त करत शेवटी ओंकारनाथांच्या खांद्यावर इतक्या सहजपणे ही पताका दिली आहे हे मला ह्या ओवीशी आल्यावर विशेषकरून जाणवले. कारण संपूर्ण सायराचे आयुष्य-तत्त्वज्ञान त्याच केवळ नव्हे तर अशा कितीती ओव्यांभोवती वपुंनी नकळतपणे रेंगाळत ठेवलं आहे हे जाणवल्याशिवाय राहात नाही.

इतके की पुन्हा ज्ञानेश्वरीतल्याच एका ओवीशी त्याची सांगड घालता येईल.

जैसा दीपे दीपु लाविजे । तेथ आदील कोण हें नोळखिजे ।
तैसा सर्वस्वे जो मज भजें । तो मी होऊनि ठाकी ।।

दिव्याने दिवा लावला की सर्वच दिवे उजळू लागतात आणि मग ह्या प्रकाशाच्या वाटेवरचा पहिला कोणता तेच लक्षात येईनासे होते. तसे कृष्णभक्तीत सर्वस्वाने बुडून गेलेला अर्जुन शेवटी श्रीकृष्णरूप होऊनच उरतो. वपुंनी आपल्या ह्या सयरातून जणू हाच संदेश कथेच्या मार्गातून दिला आहे. सायरा ज्याला जाऊन मिळते तिथे ती ते होऊन जाते. भेदच उरत नाही. तिथे जगण्यातले तत्त्वज्ञान ती इतक्या सहजपणे आपल्या बोलण्यातून आणि कृतीतून व्यक्त करते की ती एक प्रकारची दिशाच होऊन जाते. मग ती सायरा प्रा. मंडलीकांच्या सहवासात असो की ओंकारनाथांच्या. सायरा हे व्यक्तिमत्त्व प्रत्येकाच्या हृदयात दिवा तेवत ठेवते. कुठला आधीचा आणि कुठला नंतरचा हे मग कळेनासेच होते. म्हणून मग वाटत राहाते.

चोखाळपण रत्नांचे । रत्नावरी किरणांचे ।
तैसे पुढा मन जयाचें । करणें पाठी ।।

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की रत्नाचे शुद्धपण जे असते तेच फार वेधक असते. त्यावर किरण पडल्यावर त्या शुद्धपणाला झळाळी प्राप्त होते. ती रत्नाची आभा अधिक चोखळ होते. अगदी तसेच काहींचे मन असते. शुद्ध, स्फटिकासारखे स्वच्छ आणि पारदर्शक, ते मन सतत प्रकाशत रहाते त्या रत्नासारखे. त्याची स्वयंप्रकाशी झळाळणारी कृती मग मागोमाग उमटतेच. पण प्रकाशाचा मार्ग ते रत्न पहिल्यांदा दाखवते. वपुंच्या कित्येक पात्रांनी मला वाचताना हा अनुभव दिला. त्या व्यक्तींनी जो अनुभव दिला तीच वपुंच्या एकूण चिंतनाची तृप्ती त्यांनी प्रतिभेने उंच नेली. सहजसुंदर शैलीतून प्रकाशत ठेवली. आपलं संतवाचनातून अनुभवलेलं मन स्वच्छपणे समोर ठेवले. आशय मागाहून आला. "पुढा स्नेह पाझरे । मागे चालती अक्षरे ।।" हा अनुभव वपुंनी आपल्या समग्र साहित्यातून आजवर दिला. पण दुसऱ्या अध्यायातल्या त्या ओवीशी माझी मनपावले रेंगाळली आणि त्या ओव्या वाचता वाचता वपुंच्या 'तू भ्रमत आहासी वाया' ह्या कादंबरीतली 'सायरा' मला विलक्षण आठवायला लागली. तिने माझे मन एकदम ताब्यातच घेतले. जाणवले की ह्या सायराची आध्यात्मिक बैठक चांगली लांब-रुंद आहे. ऐसपैस आहे. त्याला ज्ञानेश्वरीच्या चिंतनाचा आधार आहे. संतवचनांची पाठराखण आहे.

ही सायरा म्हणजे वैचारिक परिपूर्णतेचा खेळ आहे. नेहमीच्या त्रिकोणात अडकलेली ही प्रेमकहाणी नाही तर सोने जन्मल्यावर हिणकस भाग नष्ट होऊन शुद्ध सोने शिल्लक

रहाते असा अनुभव देणारी ही लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वाची एक समर्थ कादंबरी आहे. मध्यबिंदूभोवती फिरणाऱ्या वर्तुळाची ही कहाणी आहे. जिथे स्वार्थ नाही, हक्क नाही, अशा प्रेमाच्या राज्यात ओंकारनाथाला अलगद सोडणाऱ्या, मध्यबिंदू हरवलेल्या वर्तुळाच्या आनंद-परिघावर ओंकारनाथांचे विश्व उजळवून टाकणाऱ्या, सायराची ही कहाणी वाचकांच्या मनात कायमसाठी तरळत रहाणार असा आवाका घेऊन प्रकट झाली आहे. पस्तीस-चाळीस वर्षं सतत मानवी मनाचा शोध घेणाऱ्या वपुंच्या तपश्चर्येचे 'तू भ्रमत आहासी वाया' हे फळ आहे. ह्यातली 'सायरा' ही नायिका म्हणजे, सुखापलिकडचे जसे एक सुख असते तसे दुःखापलिकडेही एक सुख असते. हे सुख म्हणजे वैयक्तिक पातळीवर रेंगाळणाऱ्या विराट दुःखाला एक सुरेख स्वप्न पडल्यासारखे भेटते. वास्तविक सायरा काहीच मागत नाही. ओंकारनाथ तिला काहीही देऊ करताहेत अशातला भाग नाही. पण काही मागायचे असते हे ठाऊक नसलेली ही सायरा काहीही न मागता खूप काहीतरी मिळवत असते आणि पैसे टाकून काहीही मिळवणारे ओंकारनाथ खूप काही तरी हरवत असतात. वपुंच्या ह्या कादंबरीतली 'निवेदनपद्धती' त्यातल्या व्यक्ती, प्रतिमासृष्टी आणि एकूणच कथानकाचा असा काही भाव एकरूप झाला आहे मनात, की कादंबरी वाचून पूर्ण झाल्यावर उत्कट प्रेमाचे आणि त्यागाचे प्रतिकार मात्र उमटत रहातात. भारून टाकणारी सायराच फक्त शिल्लक राहते. मंडलीक हे सायराचे गुरुस्थानी असलेले प्राध्यापक तर सायराच्याच मनाचा खेळ आहे का ? अशी हलकीशी जाणीवही कादंबरी वाचताना होते आणि शेवटी मनात असा विचार येतो की जे विश्लेषणाने साधत नाही ते खूप वेळेला अस्तित्वाने साधते. सायरा हा एक व्यक्तिमत्त्वाचा असा काही तलम रेशीमधागा आहे की प्रत्येकाच्या मनात मग तो रेंगाळत रहातो. कुठेही ही सायरा जवळपास रेंगाळत रहावी असे वाटत रहाते आणि असे हे भारून टाकणारे व्यक्तिमत्त्व वपुंनी ह्या प्रस्तुतच्या कादंबरीतून निर्माण केले आहे.

वपुंच्या आजवरच्या लेखनाचे नेमके मूल्यमापन करताना मनात एक विचार येतो की जेव्हा मराठी कथा बहराला आली होती, नवकथा रूजायला लागली होती, ग्रामीण कथेने वाचकाला जबरदस्त मोहिनी घालायला सुरुवात केली होती, त्याच काळात म्हणजे १९५५-६० च्या दरम्यान व.पु.काळे यांच्या शब्दसृष्टीचे तानपुरे झंकारायला सुरुवात झाली होती. गाडगीळ-गोखले-भावे-माडगूळकर या मराठीतल्या नवकथेच्या उद्गात्यांनी मराठी कथेचे विश्व पूर्णपणे भारून टाकले होते आणि ह्या चार नवकथाकारांच्या आसपास लिहू लागलेल्या जी. ए. -मोकाशी-चिरमुले- राजाध्यक्ष-पुंडलीक-दळवी-खानोलकर-पानवलकर यांची कथा वाचकाला झपाटून टाकत होती. त्याच काळात जरा पुढे व. पु. काळे हे नाव कथाकार म्हणून वाचकप्रिय होऊ लागले. नवीन कथाकारांच्या ह्या जबरदस्त लाटेत व.पुं.च्या कथेची लाट इतरांहून वेगळी ठरली. कारण त्याच्या पूर्णपणे अनलंकृत आणि सहजगर्भ शैलीतल्या संवादांच्या लयदार झोपाळ्यावर बसून आलेली कथा फार वेगळी होती. नेमकेपणा, शब्दातला मोजकेपणा,

व्यक्त होणारा साधेपणा याच्या बरोबरीने जीवनातले अस्सल अनुभव आणि त्यातले मानसिक पातळीवर रंगणारे नाट्य पकडणारी ओघवती शैली. पुन्हा वर्णनांचा अजिबात सोस न बाळगणारी आणि केवळ संवादातूनच फुलत जाणारी जीवघेणी प्रसन्न शब्दसृष्टी फक्त वपुंच्या लेखनात अधिक जाणवत होती. वाचकाला हा आनंदपाऊस वेगळा वाटला. कारण तुमच्या-आमच्या मध्यमवर्गीय आयुष्यातील सुखदुःखे, मान-अपमानांचे अवघड प्रसंग, भावभावना-वासना आणि विचार-विकारांची आंदोलने व्यक्त करणारी दुखरी नस वपुंनी नेमकी पकडली आणि आपल्या कथेतून त्याचा मुक्त आविष्कार केला. जीवानाच्या प्रवाहात वपु जीवनाला सन्मुख उभे राहिले. निर्मितीच्या सर्व क्षणांना त्यांनी आपले सर्व प्रातिभ अनुभव अर्पण केले. शुद्ध जीवनाशी विचारांतून, आपल्या आकलनाच्या खोलवरच्या चिंतनातून, आपल्या साहित्याच्या वाटेवर सर्व शब्दऐश्वर्य, सायंकालीन सूर्यासारखे आकाशभर विखरून दिले आहे. त्या अनुभवातून काहींच्या कथा झाल्या, काहींच्या दीर्घकथा झाल्या, काहींच्या लघुकादंबऱ्या झाल्या. आणि काही कवितेच्या ओळी आकाशभर विखुरल्या गेल्या. वास्तवाचे दर्शन घडवणाऱ्या त्यांच्या प्रसन्न शैलीला एक मुलायम स्पर्श झाला आणि ह्या मुळच्या आध्यात्मिक चिंतनाला लेखनाचीच एक ऐश्वर्यजोड मिळाली. कुठल्याही साहित्यकृतीत व्यक्तित्त्वाचा, व्यक्तिमत्त्वाचा, एक आधारवड असावा लागतो. ह्या आधारवडाला अनुभवाच्या पारंब्या असाव्या लागतात. कुठेतरी जीवनविषयक श्रद्धा असावी लागते आणि सहस्त्रदल कमळ सूर्यकिरणांनी अलगद उमलावे तसे विविध प्रसंग त्या कलाकृतीतून उमलावे लागतात. तेव्हा कुठे रसिक भुंगे गुणगुणायला लागतात. हे भान कादंबरीकाराकडे असावे लागते. वपुंपाशी ते आहे हे महत्त्वाचे. अगोदरच्या कथांतून ते उलगडले होते पण ह्या कादंबरीत ते कमळ आपल्या सहस्त्र पाकळ्यांनी उमलले आहे. ह्या कमळातले ज्ञानेश्वरी, गीता, आणि त्याहीपेक्षा 'ओशों'च्या माध्यमातून भेटलेले अष्टावक्र, येशू, बुद्ध, महावीर, लोओ-त्से, कबीर, गुर्जिएफ हे विविध पराग आहेत. तसे पाहिले तर ह्या कादंबरीची नायिका, सायरा ही व्यक्तिरेखा धर्माने मुसलमान असूनही, भारतीय हिंदू परंपरेच्या परिपूर्णतेचा ध्यास तिला आहे, हे कादंबरी वाचल्यावर लक्षात येते. खरं तर सायरा खऱ्या अर्थाने निधर्मी आहे. कारण स्वतःविषयी ती तटस्थ असूनही तिच्यातल्या स्वाभाविक प्रसन्नतेने ती स्वतःला पूर्णपणे हरवून बसलेली आहे. आत्मविसर्जनाची तिला जणू ओढ लागलेली आहे. या विसर्जनाची एक कहाणी म्हणजे प्रस्तुतची कादंबरी.

ज्ञानेश्वरीत एके ठिकाणी ज्ञानेश्वर म्हणतात -

नातरीं येथिचा दिवा ।
नेलिया सेजिया गांवा ।
तो तेथें तरी पाडवा ।
दीपचि कीं ।।

या गावात तेवत असलेला दिवा जरी दुसऱ्या गावाकडे नेला तरी तो दिवाच असतो. प्रकाश हा त्याचा धर्म आहे. चहुकडे केवळ प्रकाशच देणारा जसा दिवा असतो, केवळ उजेडाचेच पाठ-पोट असलेला जसा दिवा असतो, तशी सायरासारखी काही उत्तुंग व्यक्तिमत्त्वं असतात. त्या दिव्यासारखी ती कुणाच्याही सहवासात असली तरी त्यांच्या अस्तित्वाचा प्रकाश सभोवतालचा प्रदेश भारून टाकणार. ते तत्त्वज्ञान सांगणारी ही कादंबरी, ज्ञानेश्वरीच्या ओव्यांसारखी वाचकाला तरंगत तरंगत नेते हे महत्त्वाचे. हा केवळ वपुंच्या शैलीचा विजय नाही तर त्यांच्या मनात जो प्रकाश भरून राहिलेला आहे, त्या प्रकाशाची ही परावर्तित किरणे आहेत. त्यामुळे समग्र जीवनाचा वेध घेणारी प्रस्तुतची कादंबरी. मराठी कादंबऱ्यांतल्या महत्त्वाचा टप्पा ठरणारी आहे. ह्याची नोंद वाङ्मयीन इतिहास घेतल्याशिवाय राहणार नाही.

वपुंच्या आजवरच्या सर्व कथांनी आणि इतर वाङ्मयाने केवळ रंजन केले नाही तर त्यांच्या समग्र वाङ्मयाने वाचकाला अंतर्मुख केले. आभाळपलिकडे एक आभाळ असते. माती खाली पुन्हा सृजनशील माती असते. निर्मितीचा आनंद लुटणारी ही मातीखालची माती शेवटी आभाळापलिकडच्या आभाळात जाऊन भिडते. वपुंच्या कथेतली आस्वादप्रक्रिया आनंदापलिकडचा आनंद देऊन जाते. प्रस्तुतची 'तू भ्रमत आहासी वाया' हा आस्वादापलिकडचा आनंद देऊन जाते हे मात्र निश्चित...

(१९ नोव्हेंबर १९९२) — वामन देशपांडे

Contact : 020-24476924 / 24460313
Website :
www.mehtapublishinghouse.com
info@mehtapublishinghouse.com
production@mehtapublishinghouse.com
sales@mehtapublishinghouse.com

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, without the prior written consent of the publisher and the licence holder. regarding the translations rights of this book in any language please contact us at **Mehta Publishing House,** 1941, Madiwale Colony, Sadashiv Peth, Pune 411 030.

अनुक्रम

एक
दोन
तीन
चार
पाच
सहा
सात
आठ
नऊ
दहा

।। एक ।।

'तू एकदा मनसोक्त रडून घे. तुला बरं वाटेल.' तिनं चमकून प्रा. मंडलीकांकडे पाह्यलं. ते त्यांच्या शांत, धीरगंभीर आवाजात म्हणाले,

'रडणं म्हणजे दुबळेपणाचं लक्षण नव्हे. मोकळेपणी रडायला धैर्य लागतं.' तिनं पुनः वर पाह्यलं.

'माणूस स्वतःच्या वयाला घाबरतो. परिवार, कुटुंबातल्या स्वतःच्या स्थानाला घाबरतो. फार मोठा डिग्रीवाला असेल तर डिग्रीचाही विचार करतो. एम. ए.वुअिथ फिलॉसॉफी केलीस, तेव्हा रडायचं कसं हा विचार करू नकोस. मनसोक्त रड, मोकळी हो.'

'मला तुमच्या कुशीत घ्या.'

'ये, पण नुसती पडून रहा. माझ्याजवळ येऊन रडायला लागलीस की मी सांत्वनासाठी शब्द शोधणार. सांत्वनासाठी आजवर जगात कुणालाही शब्द सापडले नसतील. सांत्वन म्हणजे दुःखाचं मूल. मूल आईपेक्षा मोठं कसं होईल ? मूल मोठं व्हायला लागलं की आई आणखी मोठी व्हायला लागते. म्हणून, समजूत घालणारं कुणी भेटलं म्हणजे हुंदके वाढतात. हसता हसता माणूस एका क्षणात थांबू शकतो. दुःखातली व्यक्ती रडणं एका क्षणात विसरू शकत नाही. तेव्हा तू जा. बाहेर पड. एकांत शोध. तिथं तू तुझी डिग्री विसरशील. समजुतीला कुणी येणार नाही. शांत होण्याचे इशारे आतूनच उमटतील, मग आपोआप शांत होशील.'

'मला तुमच्याजवळ बसावंसं वाटतंय. मला तुम्ही एकांत शोधायला का सांगताय् ? - दुसरं काय आहे आता नशिबात ?'

मंडलीकांनी आश्चर्यानं विचारलं,

'तू हे बोलतेस ? नवल आहे. एकाकीपण वेगळं, एकांत वेगळा, एकांताची माझी व्याख्या फार वेगळी आहे. परिसराचं मौन म्हणजे एकांत. आणि परिवारात असतानाही निराधार वाटणं हे एकाकीपण. तेव्हा तू एकांतात जा, मनसोक्त रड. जमिनीला अश्रू हवे असतात. मातीचं देणं चुकवलं की हलकी होशील. वर चढशील, आकाशाजवळ पोहोचशील. असंच कोणतं तरी दुःख पार केल्यावर तुकाराम, 'तुका आकाशाएवढा' असं लिहून गेला असेल. जा आता. मी प्राध्यापक आहे. 'कुणी ऐकतंय' म्हटल्यावर बडबडत राहणार.'

‘तुम्ही माझे गुरू आहात. तुम्ही मार्ग नाही का दाखवणार ?’

‘ह्या बाबतीत नाही. तू ह्याक्षणी गुरू शोधूही नकोस. गुरूचा आधार शोधणं म्हणजे एक सुसंधी हातची गमावणं.’

तिच्या डोळ्यातल्या पाण्यानं घशातला हुंदका अश्रूंबरोबर गिळायला लावला. आता तिनं नुसत्या आश्चर्यानं मंडलीकांकडे पाह्यलं. ते म्हणाले,

‘सोन्याप्रमाणे आगीतून तावून सुलाखून पार होण्याची संधी म्हणजे, असं एखादं दुःख. असा एखादा अनुभव. तुम्ही गुरूचा आधार मिळवलात की स्वतःचा विकास थांबवलात. रेडीमेड उत्तर म्हणजे शॉर्टकट्. आयुष्य सोपं होईल कदाचित, समृद्ध होणार नाही. तेव्हा जा. तुझा प्रश्न तू सोडव. घरातून पळून गेलीस तेव्हा तो निर्णय तू स्वतःच घेतला होतास ना ?’

तिनं मानेनं हो म्हटलं.

‘स्वतःची वाट स्वतःच शोधल्याचा अभिमान वाटला ना तेव्हा ?’

‘.....’

‘हा फटका तुला वेगळं शिकवेल. धीट बनवेल. रडून मोकळी हो, अनुभव नाकारू नकोस, आधार शोधू नकोस. बेभान होऊन प्रेमात पडलीस तितकी रडताना बेभान हो. मात्र एकही अश्रू पश्चात्तापाचा असता कामा नये; ही माझी अट.’

‘नको ती गोष्ट घडली ह्याचंच दुःख आणि पश्चात्ताप असतो ना ?’

‘गोष्ट योग्य की अयोग्य हे कालांतरानंच समजतं. प्रत्यक्ष कृती घडते तेव्हा ती त्या क्षणी जशी घडायला हवी, तशीच घडते. आपण फक्त पश्चात्तापाचा काळ वाचवू शकतो. पंकजशी लग्न करून शंभर टक्के सुखी झाली असतीस, ह्याची शाश्वती होती का ?’

‘मला आत्ता काहीच सांगता येत नाही.’

‘मी सांगतो. प्रियकर परिपूर्ण असतो. नवऱ्याला मार्यादा असतात.’

‘असं का ?’

‘कारण संसार हा व्यवहार आहे. प्रियकराच्या बाबतीत संपूर्ण समर्पण असतं. ‘मी’ उरत नाही म्हणून संघर्ष नसतो. संसारात तसं होत नाही.’

‘पण अवघड काय आहे इतकं ?’

‘तू मला असंच बोलायला भाग पाडणार; आणि मी बोलणार.’

‘मला बरं वाटतंय्.’

मग ऐक. एक प्रियकर आपल्या प्रेयसीकडे गेला. त्यानं दार वाजवलं. तिनं आतून विचारलं, ‘कोण आहे ?’ -उत्तर आलं, ‘मी आहे.’ ती म्हणाली, ‘अजून तू तयार झाला नाहीस, एक वर्षानं ये.’ एक वर्षानं तो गेला. पुनः ‘कोण आहे ? चं उत्तर ‘मी’ असंच. ती म्हणाली, ‘तयारी पूर्ण झाली की ये.’ त्यानंतर एक वर्षानं तो परत गेला. तिनं विचारलं, ‘कोण आहे ?’ -तो म्हणाला, ‘आता तूच आहेस, मी उरलेलाच नाही.’

हकीकत संपवून मंडलीक म्हणाले,

‘हे उत्तर येताक्षणी दार उघडलं गेलं. प्रेम म्हणजे मरण असतं. ‘मी’ हा शब्द प्रेमात आणि भक्तीत उरत नाही. मरणात तेच होतं. ज्याला जिवंतपणी मरण अनुभवायचं आहे, तोच खरं प्रेम करू शकतो. ह्या कसोटीवर पंकजचं स्थान कोणतं होतं, त्याचा विचार कर. स्वतःचाही कर. पंकजचा आनंद हाच तुझा आनंद मानलास तर तुला अस्तित्वच नाही, असं समज आणि आपलं अस्तित्त्व विरून जावं एवढी पंकजची पात्रता नसेल, तर प्रेमभंग झालाच नाही, असं मान. व्यक्ती चुकली, इतकाच त्याचा अर्थ. तुझी प्रेम करण्याची ताकद कुणीही हिरावून घेऊ शकत नाही.’

ती मंडलीकांकडे बघत राह्यली. भरून येऊ पहाणारे डोळे, न पुसता कोरडे व्हायला लागले. सूर्यप्रकाश वाढू लागला की दंवबिंदू आपोआप नाहीसे होतात, ह्याचा तिला प्रत्यय आला. हीच प्रकाशाची साक्ष.

‘काय पाहतेस अशी ?’

‘सांत्वनाला शब्द नसतात, ह्याच्यावरचा माझा विश्वास उडाला.’

‘बेटा, ह्यात कुठेही सांत्वन नाही. नव्या विचारानं तू केवळ भारावली आहेस. अंधाऱ्या वाटेवर क्षणभर विजेचा प्रकाश पडतो. वीज चमकून नाहीशी झाली की अंधार जास्त गडद होतो. मग काही काळ चालणं जास्त अवघड जातं. म्हणून सांगतो. गुरू शोधू नकोस. चालणं, ठेचकाळणं, रक्तबंबाळ होणं, एकाकी पडणं, दरीत कोसळणं, हे सगळं घडू दे. नियती, प्रारब्ध हे अडथळे मानू नकोस. ते सौभाग्य आहे. आगीतून जा, कचरा जळून जाईल. सोनं उरेल. आणि मग, सायराच कुणाला तरी आधार होईल. हा चमत्कार घडला तर पंकज तुझा गुरू हाईल. प्रेमपूर्तीत साफल्याची शंका असते,

प्रेमभंगातलं वैफल्य नवी पायवाट शोधायला लावते, स्वतःच्या मालकीची.'

सायरा मंडलीकांचे पाय धरण्यासाठी वाकली. तिला वरच्यावर थोपवीत मंडलीक म्हणाले,

'समोर गीता आहे, ज्ञानेश्वरी आहे. कोणत्याही धर्माचा माणूस असो, ह्या दोन ग्रंथांच्या तो बाहेरच जाणार नाही. जिथं जिथं अर्जुन आहे तिथं तिथं कृष्ण प्रकट होतोच. कृष्ण फारच बिझी असेल, तर ज्ञानेश्वर येतात. कधी रेडा लागतो तर वेद वदवण्यासाठी असा एखादा प्राध्यापक मंडलीकही चालतो. पळ आता.' सगळं आवरून सायरा निघाली, तेव्हा मंडलीक म्हणाले,

'आता गप्प बसवत नाही, म्हणून सांगतो, बुद्धाच्या काळातली सत्यघटना. अंगुलीमाल नावाचा एक खुनी. सध्याच्या भाषेत सांगायचं तर दहशतवादी. शंभर माणसं मारायची हे त्याचं ध्येय. नव्व्याण्णव माणसं मारून झाली होती. एक हत्या केली की त्याचं बोट कापायचं आणि गळ्यात माळ करून घालायची, हा नेम. शंभरावी हत्या करण्यापूर्वी बुद्ध त्याला भेटला. त्यां अंगुलीमालला दीक्षा दिली. त्या गावचा राजा बुद्धाला भेटायला आला, तेव्हा भीतीनं थरथरत होता. बौद्धवेषात, बुद्धाशेजारी बसलेल्या अंगुलीमालला त्यानं ओळखलं नाही. त्याचा कायापालट झाला त्याच्यावरही राजाचा विश्वास बसला नाही.

दुसऱ्या दिवशी बुद्धभिक्षू होऊन अंगुलीमाल भिक्षा मागायला बाहेर पडला. नगरातल्या लोकांनी घाबरून घराचे दरवाजे बंद केले. काहीजण छपरावर चढले. त्यांनी दगडांचा वर्षाव केला. अंगुलीमाल शांत उभा राह्यला. शेवटी चक्कर येऊन खाली पडला. बुद्ध धावत आला. त्यानं अंगुलीमालचं डोकं आपल्या मांडीवर घेतलं.

'तू हा मारा सहन कसा केलास ?'

अंगुलीमाल म्हणाला,

'दीक्षा देताना तुम्ही म्हणालात, नव्व्याण्णव माणसं आपण मारली, वगैरे सगळं स्वप्न समज. आजचा अंगुलीमाल भिक्षू आहे. तो खरा. त्याप्रमाणे, हे नागरिक मला दगडांनी ठेचून काढताहेत, हेही मी स्वप्न समजतो. मला वेदना होत नाहीत.' इतकं सांगून मंडलीक जरा थांबले आणि म्हणाले,

'मना सज्जना भक्तीपंथेची जावे' ह्या वचनापासून कोणत्याही गोष्टीकडे, नाक उडवून 'ही फक्त थेअरी आहे,' असं म्हणून तिला निकालात काढता येतं. पण चार पावलं जर त्या दिशेनं टाकून पाह्यली तर, आपल्यापुरती ती 'थेअरी' रहात नाही. प्रथम थेअरी

नाकारायची नाही. ती जगायची. त्यातून जो अनुभव येतो त्या अनुभवाची थेअरीला जोड द्यायची. मग तिला प्रत्ययाचं बळ येतं. ती थेअरी इतरांना सांगत बसायचं नाही. कारण विचार ?'

तिनं नुसतं पाह्यलं.

'प्रचिती आली की ती तुमची तत्त्वं होतात आणि तुमची तत्त्वं इतरांची थेअरी होतात.'

'असं का ?'

'अनुभव घेणारा प्रत्येकजण वेगळा असतो.'

सायरा विचारात पडली. मंडलीक म्हणाले,

'प्रवासाला निघता, केवळ कागदावर छापलेला रोडमॅप मिळतो. विश्रामधाम, गावं, पेट्रोलपंप त्यांच्या जागा आणि मैल, इतकंच त्याच्यावर छापतात. रस्त्यावरचे खड्डे, ड्रायव्हर कसा आहे, ट्रॅव्हल कंपनीचा प्रामाणिकपणा आणि हल्ली विश्रामधामात चालणारे प्रकार, दुर्दैवानं वाटेत दरोडा पडला तर, अशा गोष्टी नकाशात छापत नाहीत. नकाशा म्हणजे थेअरी समज. प्रवासाचा अनुभव घेणारा प्रत्येक प्रवासी वेगळा. म्हणूनच आयुष्याच्या प्रवासात एकाची तत्त्वं दुसऱ्याला थेअरी वाटते.'

'सर, किती सोपं आणि छान बोलता.'

'आता खूप अवघड आणि कसोटी पाहणारं सांगू ?'

तिनं होकार दिला.

'एकांत शोध. भरपूर रडून घे. पंकजची योग्यता असो नसो. तू जर समर्पण केलं असलंस, तर संध्याकाळी लवकर ये. फ्रेश हो. पुष्पगुच्छ घे आणि पंकजच्या लग्नाच्या रिसेप्शनला जा. थांब...माझं सांगणं संपू दे. तिथं तुझं मनापासून स्वागत होणार नाही. पंकजचा बाप मोठ्या मनाचा आहे असं म्हणाली होतीस. तुझ्या मोठेपणाची तिथं नोंद होईल. माणसापाशी जे असतं तेच तो दुसऱ्याला देतो. तुझा फुलं देण्याचा अधिकार तू का घालवतेस ? हा मोठेपणा मिळवण्याचा क्षण घालवू नकोस. त्यासाठी प्रथम धाडस लागतं. ते मिळवता आलं तर धाडसाची चटक लागते आणि रियाज वाढला की मनाचा मोठेपणा, सहजधर्म होतो. तुझ्या प्रेमातली परीक्षा आत्ता आहे, वैफल्यात जा.'

।। दोन ।।

कामावर येताना तिला मंडलीकांचेच शब्द आठवत होते.

'जिवंतपणी मरणाचा अनुभव घ्यायचा असेल तर तुटून प्रेम करावं. प्रेमात आणि मरणात 'अहं' उरत नाही.'

पंकज प्रत्येक क्षणी पंकजच होता.

'परंपरा आणि क्रांती' ह्या विषयावरचं आपलं भाषण झालं. कॉलेजला ट्रॉफी मिळाली. टाळ्यांच्या गजरात, ट्रॉफीसहित आपण खाली उतरलो. चाहत्यांचा गराडा पडला. मग प्राचार्यांच्या ऑफिसात चहापान. कॉलेजच्या फाटकात पंकजनं थांबवलं.

'जस्ट अ मिनीट प्लीज. माझं नाव पंकज. ह्यापलीकडे माझ्याबद्दल सांगण्यासारखं काही नाही. ही गाडी माझ्या वडिलांची. माझी पुण्याई नाही. मी 'ऑल सो रॅन' पैकी. तरी मला तुमच्याशी बोलावंसं वाटतंय. आपण कुठं तरी कॉफी घेऊ, इफ् यू डोंट माईंड.'

विजयाची धुंदी रेंगाळत होती. स्वतःच्या विजयापेक्षाही आपण कॉलेजला काहीतरी मिळवून देऊ शकलो ह्याचा आनंद जास्त होता. त्याचवेळेला, जे जे बोलायचं ठरवलं होतं, त्यापैकी काय काय राहून गेलं, ह्याचाही शोध सुरू होता. त्याच मनःस्थितीत पंकजनं तिला विनंती केली आणि 'हो', 'नाही'चा विचार पक्का व्हायच्या आत ती त्याच्या गाडीत बसलीही.

एका ग्रेड वन् हॉटेलातलं कोपऱ्यातलं टेबल पंकजनं निवडलं. अशा हॉटेलात, मामुली ओळखीवर, एका श्रीमंत, तरुण मुलाबरोबर येण्याची ही पहिली वेळ. पण तसा कोणताही भाव मनात नसल्यामुळे गांगरून जाण्याचं कारण नव्हतं. तिनं पंकजकडे नुसतं पाह्यलं.

'मला तुमचे विचार पुनः ऐकावेसे वाटतात.'

कॉफीची ऑर्डर देऊन पंकजनं मागणी केली. सायरा मिळालेल्या टाळ्यांच्या नशेत होती. ट्रॉफी कॉलेजची होती. टाळ्या निश्चित तिच्या होत्या. ती उत्साहानं म्हणाली,

'आपण जवळपास एकाच वयाचे आहोत, पण तू मला 'तुमचे विचार' असं म्हणालास. ही परंपरा.'

‘तुमचं वय माहीत नाही, तोपर्यंत ‘ए’ म्हणायचं की...’

‘वय अत्यंत मामुली गोष्ट आहे, विचार महत्त्वाचे. मैत्री त्याहून श्रेष्ठ; आणि संवादाची महती सांगताच येणार नाही. तेव्हा बोल.’ पंकज भारावून म्हणाला.

‘मला ऐकायचेत् तुमचे...नो...तुझे विचार. परंपरा—क्रांतीचं नातं...’

सायरा ताज्या उत्साहानं बोलू लागली,

‘माणसाला परंपरा हवीच. ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, परंपरेचा माणसाला आधार वाटतो. आपण कोणत्या परिवारातले, घराण्यातले, कोणत्या देशाचे, हे सगळं आवश्यक आहे. आपण जिथं उभे आहोत त्या बिंदूपासून मागे एक काल्पनिक रेघ ओढावी. त्या रेघेवर ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेवाप्रमाणे शिवाजीमहाराज, झाशीची राणी, सावरकर, टिळक, वल्लभभाईंसारखी हिमालयासारखी माणसं आहेत. असं समजलं तर पुढच्या प्रवासाची दिशा उजळून निघते. मात्र ही रेघ केवळ पतंगाच्या मांजासारखी असावी. पतंगाला मुक्त आकाश विहारासाठी मोकळं असावं. परंपरेनं पतंगाचे पाय खेचता कामा नये. प्रगतीसाठी क्रांती अत्यंत आवश्यक. पण सतत क्रांतीचे नगारे पिटण्यात अर्थ नाही. समाजाची दिशा हरवते. तो खिळखिळा होतो. क्रांती करणारे हुतात्मे होतात. तिचं यशअपयश समाजाला पचवावं लागतं. म्हणून क्रांती करणाऱ्यांच्या मागेही दूरदृष्टी लाभलेल्यांची सत्प्रवृत्त परंपरा आवश्यक, असं काहीसं मी बडबडले.’

तिच्याकडे एकटक पहात पंकजनं विचारलं,

‘तुझं नाव ?’

‘सायरा.’

‘सायरा...अं...म्हणजे ?’

‘सायरा म्हणजे सायरा, जस्ट अ ह्यूमन बिइंग.’

पंकज विचारात पडला.

‘का, काय झालं ?’

‘मला तू आवडलीस. पण...’

सायरानं अचानक विचारलं,

'नाना पाटेकरचा 'प्रहार' चित्रपट पाह्यलास का तू ?'

'पाह्यला, आवडला, शेवटचा नेकेड मुलांचा क्राऊड वगळून...'

'अरेरे. तो सीन तुला न आवडणं. मोस्ट अन्फॉरच्युनेट पार्ट ऑफ इट्. जन्माला आलेलं मूल म्हणजे शुद्ध चैतन्य. रंग नाही, पंथ नाही, जात नाही, धर्म नाही. असा समाज निर्माण झाला तर पृथ्वीवर स्वर्ग येईल. मग 'पंकज' किंवा 'सायरा' सगळी त्याचीच रूपं होतील.'

'तू आणि मी हे मान्य करू एकवेळ. मलाही त्याचा अर्थ आत्ता समजला. मागच्या पिढीचं काय ?-ती परंपरावादी.'

'व्हॉट अबाऊट यू ? -फरगेट अदर्स.'

'मला ठरवता येत नाही.'

'ही अत्यंत वाईट अवस्था. निर्णय घ्यायलाच हवा. तू म्हण, मीही परंपरावादी, मला काही वाटायचं नाही. आपल्या ह्या ओळखीत आणि ती वाढली तर मैत्रीत बाधा येणार नाही.'

पंकज उतावीळपणे म्हणाला,

'मैत्री ? - निव्वळ मैत्री ? -आय् वुड् लव्ह यू ऑज अ लाइफ पार्टनर.'

हाच पंकज त्याच्या स्वतःच्या घरी सायराला न्यायला कचरत होता. सायरा खनपटीला बसली तेव्हा त्यानं दबकत दबकत विचारलं,

'फक्त एकदाच, माझ्यासाठी, पहिल्या वेळेला गुजराथी पद्धतीन साडी नेसून येशील का ?'

पंकजची मिठी सोडवून घेत सायरानं विचारलं, 'आईवडिलांना फसवण्यासाठी ?'

'अगदीच तसं नाही. त्या साडीत तू कशी दिसतेस, ते मला पहायचं आहे.'

'तशी साडी मी तुला आत्ता नेसून दाखवते. पण प्रथम तुझ्या घरी येईन तेव्हा नेहमीसारखी येईन. तुझी हिंमत नसेल तर स्पष्ट सांग.'

‘मी माझ्या भावांसारखा शेळपट नाही.’

‘मग साडीची अट का ?’

‘क्रांतीलाही पूर्वतयारी लागत नाही का ? क्रांतीकारक होणाऱ्या माणसाला मदत लागत नाही, म्हणून कुणी सांगितलं ? -‘मला स्वातंत्र्य नकोच आहे.’ - असं भारतमाता म्हणाली असती तर वासुदेव फडके, मदनलाल धिंग्रांपासून लोकमान्यांपर्यंत सगळ्या लोकांनी काय केलं असतं ?’

‘अरे पण....’

‘भारतमाता एक कन्सेप्ट आहे, असं तू म्हणशील. मी तर जिताजागता माणूस आहे ना ?’

सायरा निरुत्तर झाली. मनातल्या मनात आनंदली सुद्धा. पहिल्या भेटीत चाचरत बोलणारा पंकज, आत्ता समोरच्या पंकजपासून खूप अंतरावर गेला होता. तिला हवा तसा पंकज आकाराला येत होता. आता ह्या पंकजचं बळ वाढवणं आवश्यक होतं.

मग सायरानं कधी वाद केला नाही. तर्कवाद, युक्तिवाद, विवाद कशालाही थारा दिला नाही. तिला स्वतःचं अस्तित्व उरलं नाही. ती संपूर्ण पंकजमय झाली.

तरी तो लग्नाचं नाव काढीत नव्हता. ‘तुझ्या विचारांनी, व्यासंगानं, मी संपूर्ण बदललो. तुझं बोलणं मला नेहमीच समजतं असं नाही. तू गीतेपासून कबीरापर्यंत, जे. कृष्णमूर्तीपर्यंत. काय काय सांगतेस, समजत नाही. पण नशा चढते,’ असं तो म्हणायचा. पण त्याच्या साध्या साध्या हालचालीत, वागण्या बोलण्यात फारसा फरक पडला नव्हता. ‘लग्नानंतर बदलेल.’ असं सायरा मानत राह्यली.

आणि तिथंच ती फसली.

कबुतराला गरुडाचे पंख लावता येत नाहीत. कदाचित् लावता येतीलही, पण गगनभरारीचं वेड रक्तातच असावं लागतं.

आकाशाची ओढही दत्तक घेता येत नाही. पंकज नक्की कसा होता ?

परंपरावादी की क्रांतीवादी ?

की दोन्ही नाही ?

काही काही माणसं तात्पुरतीवादी असावीत.

त्यांच्या सगळ्या गरजा तेवढ्यापुरत्या. त्यात कष्ट नाहीत. हीच त्यांची स्वास्थाची व्याख्या.

प्राध्यापक मंडलीकांनी सांगितलं म्हणून आपण रडत आहोत का ? -खोटं खोटं का होईना, कुणी सांगितलं तर हसता येतं. फोटो काढताना 'स्माईल प्लीज.' नाही का म्हणत ?

यांत्रिक हालचालीनं हसता येतं. फोटोतली हसणारी व्यक्ती म्हणजे हसऱ्या व्यक्तीचा फोटो नव्हे. 'ह्या फोटोत तुम्ही किती छान हसत आहात.' असं कुणी म्हटलं, तर नव्यानं प्रसन्न कुठे वाटतं ?

आणि रडताना कुणी फोटो काढत नाहीत.

रडणं भोगायचं असतं.

हसणं उपभोगायचं असतं. ह्याच कारणासाठी आनंदाला परिवार हवा, सगेसोयरे हवेत.

आनंदाला सहल हवी, दुःखाला घर हवं.

कारणही हवं.

सायरा रडतही होती आणि का रडायचं असं वारंवार स्वतःला विचारीत होती. टेबलावर काचेखाली ठेवलेल्या कबीराच्या काव्यपंक्ती वाचण्याची आज सायराची इच्छा नव्हती. मनसोक्त रडायचं असं ठरवून ती कामावर लवकर आली. इथला एकांत हुकमी होता. स्वतःच्या घरात जे स्वातंत्र्य मिळत नाही ते चार कवड्या महिन्याकाठी देणाऱ्या व्यावहारिक जगतातल्या ऑफिसात मिळतं, ह्या न परवडणाऱ्या, न पटणाऱ्या समाधानात, ती रडून घेत होती.

भावनेच्या विश्वात भावना प्रकट करता येऊ नयेत आणि निर्लेप मनानं आयात-निर्यात करणाऱ्या रुक्ष-व्यवहारी वास्तूत रडण्याचं स्वातंत्र्य शोधावं लागावं, ह्याचेही काही अश्रू आज त्या पाणलोटात वाहणार होते; नव्हे वहातच होते.

मंडलीकांनी त्यांच्याजवळ रडू दिलं नाही आणि एकांतासाठी ऑफिसशिवाय स्थळ नाही. बेल् वाजल्याशिवाय शिपाई येणार नव्हता. बाकीचा स्टाफ कधीच वेळेवर येत नाही आणि साहेब जरी अचानक आले, तरीही ते आपल्या चेहऱ्याकडे बघणार नाहीत.

पाह्यलं तरी, 'व्हाट्स रॉंग वुइथ यू ?'

असा आपलेपणाच्या प्रांततला प्रश्न ते विचारणार नाहीत. स्टेनो म्हणजे स्टेनो. टाइपरायटरसमोर बसणारी एक वस्तू. बेल् वाजवल्यावर धावणारं एक यंत्र. सांगू ते लिहून घेणारी एक किल्ली दिलेली बाहुली. काचेच्या केबिनमध्ये बसणारी एक 'लाईफ् साईज डॉल.'

बस्.

इथं नातं संपलं.

खरं तर हे नातंच नाही.

हा निव्वळ व्यवहार. व्यवहाराला गंध नसतो. स्पर्श नसतो. सूर नसतो. गोंगाट असतो. रूचीच नसते मग अभिरूचीची बातच दूर.

ओंकारनाथांच्या टेबलावर म्हणूनच प्लॅस्टिकची फुलं आहेत. प्लॅस्टिकची फुलं सुकत नाहीत आणि ही तर इम्पोर्टेड फुलं. इम्पोर्टेड फुलांचे रंग विटत नाहीत. ही फुलं ज्यांना परवडतात त्यांच्या माना, त्या फुलांच्या देठासारख्याच ताठ राहतात. त्यांचं निर्माल्य होत नाही. जन्मच नाही, तिथं मरण कुठलं ?

ह्या फुलांना फक्त धुळीचा शाप. सर्फनं धुतली की झालं. पण नळाखाली धरल्यावर ती शहारून येत नाहीत. जन्म-मरणाचाच फेरा नसेल, तर शहारे-रोमांच, आसक्ती, विरह-मीलन, भय, सगळ्यातूनच मुक्ती. जिवंत फुलं स्वाभिमानी असतात. धुळीचा थर जमण्याआधीच मरण पत्करतात.

निर्माल्य म्हणजे हौतात्म्य.

धुळीचा पेहराव म्हणजे अमरता.

ओंकारनाथाची प्रत्येक गोष्ट अमर आहे. त्याला चैतन्याचा स्पर्श नाही. ह्या अवाढव्य सात मजली इमारतीचे ते मालक आहेत. इमारतीचे मालक असं म्हणणंही खरं तर चुकलंच.

ओंकारनाथ मालकच आहेत. इथं काम करणाऱ्या जित्याजागत्या ऑफिसर्सचेही मालक. बाकीचे गुलाम. गुलाम आणि मालक ह्यांच्यात कधीही प्रेम नसतं. मालक गुलामाच्या चेहऱ्याकडे कधी बघत नाही. त्याचे धडधाकट अवयव आणि मुकाटपणे हुकूम झेलणारा

मेंदू. ह्या गोष्टी महत्त्वाच्या. यंत्राला चेहरा असतो का ?

चेहरा म्हणजे भावना. डोळे म्हणजे शब्दातील भाव. स्पर्शाच्या-मोहाच्या राजधानीकडे नेणारी वाट. नजर चुकवली की पुढचा बराचसा प्रवास थांबवता येतो. स्पर्शाचा, मुक्कामाचा अखेरचा टप्पा टाळता येतो.

काहीही नाकारायचं असलं की नजरेला नजरच द्यायची नाही. मग इतिहास नाकारता येतो. भूतकाळ टाळता येतो, आणाभाकांशी फारकत घेता येते.

'आपल्याला सगळं विसरलं पाह्यजे.' हे जेव्हा पंकजनं सांगितलं, तेव्हा 'आपण' म्हणजे 'तू' हाच त्याचा अर्थ होता. तो सगळं विसरलाच होता. दोघांनाही विसरायला लावण्याची पाळी नियतीनं आणली असती तर आपल्याप्रमाणे तोही कासावीस झाला असता. मिठी मारून रडला असता. एकमेकांचे अश्रू पुसता पुसता दोघांना सुखद थकवा आला असता.

पण पंकज कोरडा होता. कोरड्या माणसाला कोणत्याही परिस्थितीचं तत्त्वज्ञान बनवता येतं. प्रवाहाला साथ देणारी व्यक्ती फक्त सागराशी एकरूप झाल्यावर तृप्त होते. पण समर्पणाचं धाडस नसलं म्हणजे जात-पात, समाज, आर्थिक परिस्थिती, तारतम्य, विवेक असे अनेक किनारे सापडतात.

'हे विसावं शतक आहे. समाज पुढे चालला आहे. जे माझ्या चार भावांना साधलं नाही, ते मी करून दाखवणार आहे.' हे म्हणताना ज्याला पुरुषार्थ वाटत होता, त्याच पंकजच्या मार्गात, चार भावांसकट विसावं शतकही आडवं आलं. कॉन्टेसा कार प्रेझेंट देणाऱ्या त्याच्याच जातीतल्या एका धनवानाला तो विकला गेला आणि परजातीतल्या मुलीशी लग्न करून दाखवण्याचा विक्रम, काश्मीरच्या हनीमूनमधे बर्फासारखा थिजून गेला.

'माझ्याशी लग्न करशील का ?' -हे पंकजनं नजरेत डोकावून विचारलं आणि 'माझं लग्न ठरलं आहे.' हे त्यानं नजर चुकवून सांगितलं.

मनसोक्त रडायचं ठरवून ती आली आणि आता तिला रडता येईना. अपमान-अहंकार दुःखापेक्षा ताठ असतो. आपले मौल्यवान अश्रू नालायक माणसासाठी गाळायचे नाहीत. आपण कशा मूर्खासारख्या फसलो, ह्या विचारानंही रडायचं कारण नाही. पंकजच्या सहवासातला प्रत्येक क्षण सुखद होता. त्या प्रत्येक क्षणी फसण्याचा प्रश्नच नव्हता. जे होतं ते स्वागत होतं. उत्सव होता.

'तरीही रडावंसं का वाटतंय ?' -ह्याचं उत्तर मिळायच्या आत सायराचं धरण फुटलं. ती

किती वेळ रडत होती, हे तिला समजलं नाही.

ती रडत होती. रडताना, का रडत आहोत ह्याचा अर्थही शोधत होती. पुनः डोळे भरून येत होते.

मधेच मंडलीकांच्या कोणत्या तरी विषयावरच्या गप्पा आठवत होत्या. कोणातरी विद्यार्थ्याशी ह्याच प्रेमभंगाच्या विषयावर बोलताना ते जे म्हणाले होते,

त्यातला शब्द न् शब्द आत्ता आठवत होता.

'बोल.'

'उज्ज्वलानं मला फसवलं, मी तुमचा निरोप घ्यायला आलोय.' गोडसे म्हणाला.

'म्हणजे ?'

'ज्यांनी ज्यांनी मला काही ना काही दिलं त्या सगळ्यांना भेटलो. आता पुनः भेट व्हायची नाही.'

'व्हॉट डू यू मीन बाय दॅट ?'

'मी सुईसाइड करणार आहे.'

मंडलीक शांतपणे म्हणाले,

'मी तुला हे दिलं नव्हतं.'

त्यानं नुसतं पाहिलं.

'जीवनापासून पळणारा मुलगा माझा विद्यार्थी होऊच शकत नाही.'

गोडसे पाय धरायला वाकला.

'शरण आल्यानं फरक पडत नाही. रियलायझेशन केवळ पाय पकडून होत नाही. क्षमा मागणारा माणूस जास्त धोकादायक. क्षमा मागणं, चूक कबूल करणं हा बहाणा असतो. पुनः पहिल्याच मार्गावर जाण्याचा परवाना असतो, कारण वाकावं लागलं ह्याचा खोलवर राग असतो. कुणाचा तरी अपमान केला, असभ्य उद्गार काढले, आपल्या प्रतिमेला तडा गेला, तो सांधण्यासाठी माणूस क्षमा मागतो. आपण मूळचे तसे नाही

आहोत, हे ठसवण्याचा तो दुबळा प्रयत्न असतो. क्षमा मागण्यानं पुनः पहिल्यासारखंच वागण्याची मोकळीक मिळते. त्याऐवजी विचार करावा.'

'सर, मी उद्ध्वस्त झालोय. उज्ज्वलापायी.'

'मग वेगळं मरण कशाला हवंय ? उज्ज्वला कोण ? ती उद्ध्वस्त कशी करील ? तिची हिंमत काय ? तिनं तुला मारलं नाही. तुझा अहंकार तुला मारतोय. मरण येणारच आहे. पहिला श्वास घेतलास तेव्हाच मृत्युला आमंत्रण दिलंस. जीवनाची हीच गंमत आहे. आपण प्रतिक्षणी मरतो आणि म्हणतो, 'जगतोय.'

'परमेश्वराला तेच सांगायला जातोय.'

'आपल्याला आयुष्यात काय मिळायला हवं हे जेव्हा तुम्ही परमेश्वराला सांगायला जाता, तेव्हा तुम्ही स्वतःला त्याच्यापेक्षा मोठा समजता. त्याला मार्गदर्शनाची गरज आहे असं तुम्हाला वाटतं. तुमचा छळ करण्यासाठी त्यानं तुम्हाला जन्म दिलेला नाही. तसं बघाल तर आपलं आयुष्य जेमतेम साठ-सत्तर वर्षांचं. पृथ्वीचं आयुष्य किती असेल ? आणि तिचं आत्ताचं वय ? -मला वाटतं, ह्या पृथ्वीनं नुकताच तारुण्यात प्रवेश केला असावा. म्हणून ती अशी हिरवीगार आहे. वृक्ष वाढताहेत, फुलं फुलताहेत, कोकिळा गाताहेत. लाखो, करोडो, अब्जावधी जीव जन्माला येताहेत, अचानक निरोपही घेताहेत. एवढ्या प्रचंड व्यापात आपण एक. कधी सुख, कधी दुःख. दोन्हीचं स्वागत करीन आणि तरीसुद्धा गात राहीन, असं म्हणा.' तू स्वतःला शंभर टक्के समजतोस. त्याच्या दृष्टीनं वाळूचा कणही नाहीस.'

'पण उज्ज्वला...'

'तिला गुरू मान. तिनं तुला जाग आणली. जित्याजागत्या, चालत्याबोलत्या माणसांवर प्रेम करणं हा आगीशी खेळ आहे. जिथं फसवणूक होणार नाही, दिशाभूल नाही, वंचना नाही, उलट केवळ दिलासा आहे, शांती आहे, शाश्वत सुरक्षितता आहे, असं वरचं प्रेम असतं. ते सुकत नाही, आटतविटत नाही, प्रतिक्षणी वाढत जातं, तुम्ही जेवढं द्याल तेवढं परत करतं, अशा प्रेमाची वाट शोधायची असते प्रेमभंगातून. ह्या आगीशी जरुर प्रत्येकानं खेळावं, पण त्यातून एक मशाल पेटवून घ्यावी, नव्या आणि वरच्या पायरीवरच्या प्रेमासाठी. मरायच्या गोष्टी विसर, देवळात जा आणि त्याला आनंदानं सांग. एक अवघड घाट मी पार केला. जाव भागो. उद्या पेढे घेऊन ये, गुरुदक्षिणा म्हणून.'

आत्ता हे आठवल्यावर स्वतःचं क्षुद्रपण जाणवून तिला रडायला आलं.

परिचयाची बेल् कानावर आली, तेव्हा ती भानावर आली. शिपाई अजून आलाच नव्हता पण अपेक्षा नसताना ओंकारनाथच लवकर आले होते. आता चेहरा एखाद्या 'शोकेस' प्रमाणे लखलखीत करायलाही सवड नव्हती आणि ओंकारनाथ गुलामांच्या चेहऱ्याकडे बघतही नाहीत.

सायरा तशीच उठली.

।। तीन ।।

'आर यू नॉट वेल ?' -ओंकारनाथांच्या अनपेक्षित प्रश्नानं सायरा गोंधळली. माणसं असाही विश्वासघात करतात ?

'रडलात की काय ?'

'नाही, सर्दी झालीय्.'

'तरी रडून घ्या. मोकळं वाटेल. तो कोण पंकज का कोण, तो वाहून जाईल.'

'सर...'

'दॅट कॉवर्ड, मला फोन करून सांगतो, सायराला माझ्या लग्नाचा निरोप द्या आणि तिला जरा संभाळा. मी सांगितलं, दॅट इज् नॉट माय जॉब; आपल्याला कुणाला सांभाळायला जमत नाही.'

'सर...'

'यू कॅन टेक लीव्ह.'

'मी ठीक आहे.'

'ठीक आहात ? -मग तुमच्या टेबलावर ताजी फुलं कशी दिसत नाहीत ? विसरलात की मिळाली नाहीत ?'

सायरा गप्प उभी राहिली.

'तुम्ही आमचं ऐका. ही प्लॅस्टिकची फुलं पाहा, सहा वर्ष झाली. तुमची अपॉइण्टमेंट होऊन किती दिवस झाले ?'

'सहा महिने.'

'ही फुलं सहा वर्षांची झाली. वाढत नाहीत. कोमेजत नाहीत. तुमचे गुलाब संध्याकाळी खाली पाकळ्या टाकतात.'

'म्हणूनच मी सर्दीचं खोटं कारण सांगितलं. पाकळ्यांचं काय किंवा माणसांचं काय, ते

दुःख तुम्हाला समजणार नाही.'

'यू कॅन गो.' ओंकारनाथ जरा स्वर चढवीत म्हणाले.

'आय ऑम सॉरी.' म्हणत सायरा जाग्यावर येऊन बसली.

निर्बुद्धातल्या निर्बुद्ध माणालाही, 'तुला ह्यातलं काही समजणार नाही' म्हटलं की संताप येतो. बुद्धिवान माणसाला अकलेचा अहंकार असतो तर मूर्ख माणसाला त्याचा मूर्खपणा जाहीर झाल्यानं त्याच्या गर्वाला धक्का पोहोचतो. ओंकारनाथ तर नक्कीच निर्बुद्ध नव्हते. शेअर बाजारात त्यांच्या नावानं वाकणाऱ्या बऱ्याच माना होत्या, कारण त्या बाजारातली जी काही नीतिमूल्यं असतील ती त्यांनी काटेकोरपणानं संभाळली होती. बापकमाईच्या दुप्पट त्यांनी आपकमाई वाढवली होती. कस्टम्समधे वजन होतं आणि एकदाही इन्कम टॅक्सची धाड पडली नव्हती. अशा असामीला यकश्चित स्टेनोनं, आपल्यालाही काही न समजणाऱ्या गोष्टी आहेत हे सांगणं म्हणजे विलक्षण उपमर्द. एखाद्या गोष्टीच्या अज्ञानाचं जितकं शल्य नसतं त्याच्यापेक्षा कितीतरी पटीनं जास्त त्या अज्ञानावर कुणी बोट ठेवलं तर होतं. हे बोट जर अधिकारी व्यक्तीनं ठेवलं तर जळजळ जरा कमी. निदान मग ती व्यक्ती किमान देखणी हवी.

पंकज हँडसम आहे.

'ही इज जस्टिफाइड.' सायरानं आरशात स्वतःचा चेहरा बघावा आणि पंकजनं इतके दिवस का होईना, प्रेम केलं. 'काफी हो गया.'; म्हणत गप्प रहावं.

अर्थात् इतका सगळा विचार करूनही ओंकारनाथांचा सल कायमच राह्यला. पण अज्ञानाचं निराकरण करून घेणंही अवहेलनेचं वाटत होतं. अंड्यात पिल्लू तयार झाल्यावर तेच प्रथम चोच मारून बाहेर येतं तसं गप्पांच्या ओघात आपोआप हा विषय निघायला हवा. म्हणजे ऑफिस कामाव्यतिरिक्त बोलणं आलं. वैयक्तिक पातळीवर यावं लागणार. त्यात आस्था डोकावणार.

म्हणजे प्रॉब्लेम. गुंतवणूक. ही सायरा मग रोज काही ना काही सांगत राहणार. मग एके दिवशी कसलीतरी सवलत मागणार.

काय करावं ?

ठरलं. घाबरायचं नाही. आपण ऑफिसर आहोत. ती स्टेनो. त्यात दिसायला मिडीऑकर. आपण काहीही नाकारू शकतो.

पंकजच्या आठवणीनं सातआठ दिवस तर नक्कीच रडेल. आज आपण सहज आलो. विनीता पैसे मागायच्या मूडमधे होती, त्यापूर्वी सटकणं जरूरीचं होतं, हेही कारण होतंच.

सायरा अचानक दिसली. पंकजनं नकार दिल्यामुळे हिला आता माणसांचा उबग आला असणार. एकांतासाठी ती इथं येणार. उद्या पण येईल. आपणही यायचं. सहानुभूतीचा सूर लावायचा. नंतर हवा तो राग सुरू करायचा. नुसता 'सा' लावल्यानं कोणता राग गायला जाणार आहे, हे कुठं कळतं ?

ओंकारनाथ आजही अचानक लवकर येतील हे सायराच्या ध्यानीमनी असणं कसं शक्य आहे ? तरीही ओंकारनाथांना पाहून ती जेवढी गोंधळली नाही, त्याच्या कितीतरी पटीनं जास्त ओंकारनाथ चक्रावले.

सायरा पूर्ववत् कामाला लागली होती. प्रेमभंगाऐवजी प्रेमपूर्ती व्हावी, अशा उल्हासानं ती तिचा फ्लॉवरपॉट सजवीत होती.

आता सांत्वनाचा सूर लावणार कसा ? -पण ओंकारनाथ चतुरच. शेअरबाजारातला चढ-उतार अंगवळणी पडला की बचावाचं धोरण कधी आणि आक्रमक पवित्रा कधी हे आपोआप समजतं.

सांत्वन नाही तर अभिनंदन, त्यांनी सायराला हाक मारली.

'बसा.'

ती डिक्टेशनच्या तयारीत बसली; आणि त्या अपेक्षेनं तिनं ओंकारनाथांकडे पाह्यलं.

'मी डिक्टेशनसाठी बोलावलं नाही. तुम्ही आजही लवकर आला असाल त्या अंदाजानं आलो. कारण...'

'मी कालच्या फाईल्स सह्यांसाठी आणते.'

सायरा लगबगीनं उठत म्हणाली.

'कामाचं नंतर बघू. मी तुमच्यासाठी आलो.'

सायरा चमकली.

'मी समजूत घालण्यासाठी आलो होतो पण आता अभिनंदन करतो.'

‘कशासाठी ?’

‘तुम्ही सावरलात म्हणून.’

बोलावं की नको, हा संभ्रम सोडवून घेत सायरा म्हणाली, ‘मी सावरलेलीच असते. कायम.’

‘मग कालचं रडणं...’

‘आयुष्यातले काही दिवस बेहोषीत गेले. त्या दिवसांना ते कृतज्ञतेचं अर्घ्य होतं.’

‘यू आर स्ट्रेंज.’

‘मी कशी आहे ते सर, तुम्हाला समजणार नाही. काल पाणी वाहून गेलं. आज मी पूर्ववत् ताजी आहे. मी फाईल्स आणते.’

‘प्लीज वेट. थोडी कॉफी घेऊ.’

ओंकरनाथांनी शिपायाला बोलावून कॉफी मागवली. समोरच्या उडपी हॉटेलातला वेटर जाड काचेच्या ग्लासमध्ये कॉफी घेऊन आला. समोरच्या शो-केसमधली बोन चायनाची कपबशी काढण्यासाठी सायरा उभी राह्यली. तोपर्यंत ओंकारनाथांनी ग्लास तोंडाला लावलाही. साहेबांना काय बोलायचं असेल, ह्या कुतूहलापेक्षाही, ह्या माणसाला आज दुसऱ्या माणसाशी संवाद करावासा वाटतोय् याचं सायराला जास्त आश्चर्य वाटत होतं. संधी मिळेल तेव्हा खरं तर तिलाही ओंकारनाथांना खूप सांगायचं होतं. सांगण्यापेक्षा सुनवायचं होतं. पण बॉस आणि स्टेनो हे नातं आणि सायराची स्वतःची वृत्ती, हेच मधे येत होतं.

कटू वाटणारं सत्य अनेकदा जिभेच्या टोकाशी येऊनही न दुखवणाऱ्या वृत्तीची ज्योत तेवत असली की वाणी ओठांशी थांबते.

सहाच महिन्याच्या कालावधीत ‘सीअर्स’ कंपनीचे सर्वेसर्वा, ओंकारनाथ कसे आहेत, हे सायरानं जाणलं होतं...तरी ती गप्प होती. पण सरांनीच विषय काढला तर ?

स्पष्ट बोलण्याचं धाडस व्हावं, म्हणून सायरानं कबिराची प्रार्थना केली.

‘आता बोला.’ ओंकारनाथांनी प्रारंभ केला.

‘काय बोलू ?’

‘तुम्ही आज इतक्या शांत कशा ? प्रेमभंग ही काही साधीसुधी बाब नव्हे.’

‘तुम्ही ह्या अनुभवातून कधी गेला आहात ?’

‘बेभरवशाच्या गोष्टीमागे मी कधी धावत नाही.’

‘मग तुम्हाला कसं कळणार ?’

‘मी तर्क करू शकतो आणि म्हणूनच आजवर यशस्वी ठरलोय्.’

सायरा झोंबेल असं हसली. ओंकारनाथांचा चेहरा बदलला. सायरा उठून उभी राह्यली आणि म्हणाली.

‘सर, आय् रिक्वेस्ट यू. तुम्ही मला काही विचारू नका. कारण माझी उत्तरं तुम्हाला झेपणार नाहीत.’

‘झेपणार’ शब्दात जास्त डिवचणं होतं. सायरानं तो शब्द जाणूनबुजून वापरला होता.

ओंकारनाथ हुकमी आवाजात म्हणाले,

‘इथं बसा, स्पष्ट बोला.’

‘यू में गेट् ऑफेण्डेड.’

‘डोण्ट वरी अबाउट इट्.’

‘सर, तर्कावर शेअरबाजारात यशस्वी ठरता येतं. तर्कावर भिस्त असलेल्या माणसांसाठी प्रेमाचा जन्म झालेला नाही. तुम्हाला प्रेमच माहीत नाही मग प्रेमभंग कसा असतो, ते तुम्हाला कसं समजणार ?’

‘मी प्रेम करत नाही म्हणून तुम्हाला कुणी सांगितलं ?’

‘करतही असाल, पण अशाच गोष्टींवर.’

‘अशा म्हणजे ?’

‘प्लॅस्टिकच्या फुलांवर करता त्याप्रमाणे.’

‘व्हॉट यू मीन बाय दॅट ?’

‘ज्या गोष्टींवर प्रेम करण्यात रिस्क नाही अशा गोष्टींवर प्रेम करणारी माणसं खूप असतात. खरं तर ते प्रेमच नाही. त्याला मालकी म्हणतात. कारण ते प्रेम सुरक्षित असतं. तिथं समर्पणाचा प्रश्न उद्‌भवत नाही; प्रतिसादाची पण त्या वस्तूकडून अपेक्षा नसते.’

‘म्हणजे काय ?’

‘ही प्लॅस्टिकची फुलं तुम्ही आत्ता फेकून द्यायला निघालात तर ती ‘फेकू नका.’ असं ओरडणार नाहीत.’

‘तुमची रोज संध्याकाळी माना टाकणारी फुलंसुद्धा ओरडत नाहीत.’

‘ती डुलत असतात तेव्हा आपलं निर्माल्य होणार आहे हे विसरू शकतात. म्हणूनच सुगंध देऊ शकतात. चैतन्याचा स्पर्श आणि वावर जोपर्यंत आहे, तोपर्यंत आपण उपयोगी पडतो की उपद्रवी ठरतो हे पाहणंच महत्त्वाचं आहे. हिंदू धर्मात म्हणूनच निर्माल्याचा आदर करतात. निर्माल्य नदीत टाकतात. त्याला पुनः चैतन्याच्या सहवासात सोडतात. मी सुद्धा निर्माल्य रोज पिशवीत भरून नेते. वेस्टपेपर बास्केटमध्ये टाकत नाही. रोज चौपाटीवर जाऊन समुद्रात सोडते.’

‘त्यानं काय होतं ?’

‘त्यांनी काही क्षण आपलं नातं सुगंधाशी जोडलं होतं, त्या क्षणांशी कृतज्ञ राहण्याचा आनंद.’

‘निर्माल्यापर्यंत तो भाव पोहोचतो का ?’ ओंकारनाथांनी काहीशा चेष्टेनं आणि खोडसाळपणानं हा प्रश्न विचारला खरा, पण त्याचवेळेला आपल्या पायातला बूट अकारण घसरतोय असं त्यांना वाटू लागलं. सायरा म्हणाली,

‘माना टाकून, शेवटचा श्वास घेतल्यावर आपण प्रेतावर घातलेले हारही प्रेतापर्यंत पोहोचत नाहीत. तरीसुद्धा त्या माणसाच्या हयातीतले मनस्तापाचे क्षण विसरून, सुखाच्या क्षणांची ती पूजा असते आणि सर, हे सगळं करायचं असतं ते आपलं जिवंतपणीच निर्माल्य होऊ नये म्हणून. त्यासाठी पदार्थांऐवजी जित्याजागत्या माणसावर प्रेम करावं लागतं.’

खुर्ची सरकवून सायरा उठली. ऑफिसही सुरू झालं होतं. दारापाशी थांबत सायरा

म्हणाली,

‘पार्डन मी. मी फार बोलले. दॅट इज नॉट माय नेचर. इन्स्पाईट ऑफ दॅट, सर, एकच विचारते, तुम्ही मनापासून कुणावर प्रेम करता ? आज तुमच्यासाठी जीव गहाण ठेवायला कोण तयार आहे ? -एखाद्या व्यक्तीचं नाव सांगाल ?’

‘दोन मिनीटं थांबा, सांगतो.’

सायरा ओंकारनाथांसमोर बसली.

‘तुम्ही विचारलेल्या प्रश्नावर विचार करण्याची वेळ माझ्यावर आत्तापर्यंत आली नाही आणि म्हणून माझं कधी अडलंही नाही.’

सायरानं नुसतं पाह्यलं. ओंकारनाथ बूट घट्ट पकडीत म्हणाले,

‘सकाळी आठ वाजता मी उठतो. मला बेड्-टी लागतो. विनीतानं अंघोळ केल्याशिवाय चहा करायचा नाही, अशी माझी ऑर्डर आहे. चहाबरोबर टाइम्स. नऊ वाजेपर्यंत मी फोन कॉल्स घेत नाही. नऊ ते साडेनऊ माझी कामं, आंघोळ वगैरे. कोणत्या वारी कोणते कपडे ते नोकरांना माहीत आहे. ते हँगरवर तयार असतात. अकरा ते साडेसहा ऑफिस. आठवड्यातले चार वार मीटिंग्ज. रात्री पावणे दहापर्यंत घरी. त्यावेळी विनीतनं फ्रेश असायला हवं. मग जेवण. वाटलं तर टीव्ही. नाहीतर डोळे मिटेपर्यंत वाचन. आणि तरीही झोप आली नाही तर विनीता, अँड नथिंग इज मोस्ट क्रेडीटेबल, विनीता नेव्हर सेज नो टू मी.’

सायरा विलक्षण अर्थानं हसली. ओंकारनाथ आवेशानं म्हणाले, ‘शी हॅज टु बी लाइक दॅट. तिला दर रविवारी ओबेरायचं जेवण लागतं. मग काही ना काही शॉपिंग. मी गाडीत बसून राहतो. मूव्हीला जायचं म्हणाली तर मूव्ही. तिला कोणताही पिक्चर चालतो. मी बसल्या बसल्या छान झोपू शकतो. ह्या सगळ्या टाइट शेड्यूलमध्ये प्रेमाचा प्रश्न कुठे आड येतो ?’

सायराला आता अशक्य झालं. ती पुनः हसली. त्यात कीव होती, सहानुभूती होती की उपहास की त्रिवेणी संगम...ठरवणं अशक्य होतं.

ती जाण्यासाठी उठली.

‘व्हाय आर यू ब्लिकिंग ?’

निग्रहानं ठरवून सायरा म्हणाली,

'बोथ ऑफ यू आर यूझींग इच अदर.'

ओंकारनाथ या वाक्यानं उडालेच. त्यांना क्षणभर प्रतिप्रश्नही सुचेना. ते कावरेबावरे झाले.

साशंक मनानं त्यांनी विचारलं,

'यू मीन, आय् अॅम् ऑलसो बिईंग यूज्ड ?'

सायरा उत्तर न देता बाहेर पडली.

आपण इतकं बोलू शकतो ? कशा ? आपल्यात हे बळ कसं आलं ? कुणी दिलं ? साहेबांनाही हे ऐकवण्याचं सामर्थ्य ? सामर्थ्य की उद्धटपणा ? त्यांनी सगळं ऐकून घेतलं. आपल्यासारख्या सामान्य स्टेनोकडून. जे जे आपण बोललो, त्यावर आपण इतका विचार कधी केला होता ?

स्वतःला हे प्रश्न विचारता विचारता सायराला अचानक जाणवलं, हे धैर्य आपल्याला कालच्या पंकजच्या रिसेप्शननं दिलं. पंकजच्या वडिलांनी, नवीनभाईंनी सायराचं आपलेपणानं स्वागत केलं. पंकज आपल्या शब्दाबाहेर, परंपरा तोडून बंड करू शकला नाही, म्हणून सायराचं प्रेम ठोकरलं गेलं आणि तरी ही पोरगी पुष्पगुच्छ घेऊन येते, म्हणजे काय ?

नवीनभाईंनी आपली माफी मागितली. पंकज तोंड चुकवीत होता आणि त्याच्या भावांच्या कपाळावर आठ्या होत्या. तर पंकजची आई काहीतरी बहाणा करून निघून गेली.

आपण शांत होतो, 'स्वतःजवळ जे असतं तेच माणूस दुसऱ्याला देऊ शकतो.' हेच खरं.

ह्या विविध प्रतिक्रियांपेक्षाही, आपण निर्लेप मनानं गेलो आणि म्हणूनच परतीच्या वाटेवर पिसासारख्या तरंगत आलो. समर्पणात अफाट शक्ती असते आणि जातिवंत प्रेम, ज्वलंत प्रेम केलं असेल तर ते प्रियकराला मुक्त करतं. प्रियकर मुक्त झाला, पण पंख आपल्याला फुटले. मातीला अश्रू दिले की फुलांचं वेडं पीक येतं.

हे बळ नुसतंच केवळ रिसेप्शनला जाऊन आलो, ह्यातून मिळालं का ?

नक्कीच नाही.

तिथून परत आल्यावर मंडलीकांनी वृत्तांत विचारला. तो ऐकून त्यांनी विचारलं,

‘आता तुझी प्रतिक्रिया सांग.’

‘मला मोकळं वाटतंय्. नको वाटणाऱ्या परिस्थितीत आपण होऊन सामील व्हायला वेगळं धैर्य लागतं; अर्थात् तुम्ही प्रवृत्त केलंत, म्हणून मी गेले.’

मंडलीक काही वेळ गप्प बसले.

‘सर, काय झालं ?’

‘मी जबरदस्ती केली का ?’

‘मुळीच नाही. तुमच्या सांगण्यामागे काहीतरी निश्चित भूमिका आहे असं वाटलं, तेव्हाच मी गेले.’

‘माझी निश्चित भूमिका आहेच. तुझं व्यक्तिमत्त्व निर्भीड असावं. रोखठोक पण सरळ, बाणेदार तरीही नम्र आणि त्याहीपेक्षा पारदर्शक. अर्थात विलक्षण धैर्य असल्याशिवाय हे रूपांतरण संभवत नाही.’

‘सर, ह्यात धैर्याचा प्रश्न कुठे येतो ?’

‘आपल्या मनात वेगळ्या भावना असतात, पण चेहऱ्यावर त्याचा थांगपत्ता आपण लागू देत नाही. प्रेयस आणि श्रेयस ह्यात आपलं नेहमी युद्ध चाललेलं असतं. प्रेयसकडं आपला कल असतो. श्रेयसला तरीही प्राधान्य द्यावं लागतं आणि स्वतःच्या प्रगतीसाठी तेच आवश्यक आहे. माझी भूमिका आणखीन थोडी वरची आहे.’

‘मला जरा सोपं करून सांगा.’

मंडलीक म्हणाले,

‘मनात काटे सलत असताना, तू चेहऱ्यावर वरवरची प्रसन्नता आणून रिसेप्शनला गेली होतीस ना ?’

आपण मानेनं ‘हो’ म्हणालो.

‘आता ह्याच्यावरची पायरी म्हणजे अभिनयाचा त्याग करायचा. मनातल्या भावनांवर

सामाजिक आचरण लादायचं नाही. मनातल्या भावासहितच प्रकटपणे वागायचं.'

'हे कसं शक्य आहे ?'

'हे अवघडच आहे. मनात जे आहे तेच चेहऱ्यावर वागवायचं ठरवलं, तर त्यासाठी मन घासूनपुसून किती लख्ख ठेवावं लागेल, ह्याचा विचार कर. वापरलेलं भांडं त्याच क्षणी धुतलं तर पाणी कमी लागतं.'

'ह्याचा अर्थ सातत्यानं समाजाचाच विचार करायचा का ?'

'तेच नेमकं करायचं नाही. महावीर, कबीर, येशू, बुद्ध, तुकाराम, रामदास आणि अशा स्थानांपर्यंत पोहोचलेल्या सगळ्या मोठ्या माणसांचं वागणं लोकवत् नव्हतं. स्वतःला जे पटलं तेच त्यांनी मांडलं.'

'म्हणूनच समाजानं त्यांचा छळ केला ना ? ते एकटे पडले.'

'तुझ्या या विधानात पुनः समाजाचाच विचार आहे. ही थोर मंडळी एकटी पडली असतील पण ती निर्भय झाली होती हेही ध्यानात घ्यायला हवं.'

'पण तरीही....'

'मनाला पटेल असं वागायचं ह्याचा अर्थ सगळ्यांशी वैर असा थोडाच आहे ? उलट सगळ्यांवर प्रेम करण्याची ही साधना आहे. मन शुद्ध करण्याचा अभ्यास आहे.' तुकोबा वेगळं काय सांगतात ? -'मन करारे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ।।'

आपण भारावून विचारलं,

'आणि हे असे विचार समाजानं पाण्यात बुडवले ना ?'

'ज्ञानी माणूस हयात असतो, तोपर्यंत तो धोकादायकच असतो. तो ढोंगांवर प्रहार करत राहतो. तो गेल्यावर त्याच्यापासून कसलाच वैचारिक उपद्रव नाही. मग त्याच्या आरत्या गायच्या, अभंग म्हणायचे, शेवटी पुतळे उभे करायचे. ज्ञानी माणसांना त्यांच्या हयातीत आणि मेल्यावरही कावळ्यांच्याच सहवासात राहावं लागतं.'

'माझ्या लक्षात आलं नाही ?'

'जिवंतपणी चोचा मारणारी माणसं आणि पुतळ्यांच्या नशिबी...'

आपण मनापासून हसलो; आणि हसता हसता आपले डोळे भरून आले.

'काय झालं ?'

'तुमच्यासारख्या विचारवंत—त्याहीपेक्षा सर-गंगेच्या प्रवाहाला सोडून सगळे दूर का गेले ?'

'कुटुंब, परिवार, नातेवाईक ह्यांचे संकेत मी झुगारून दिले म्हणून. मला त्यांच्यासारखे खोटं, कृत्रिम वागता आलं नाही. अगदी क्षुल्लक कारणासाठी, वेळ निभावून नेण्यासाठी माणसं इतकं खोटं बोलतात की तो त्यांचा स्वभावधर्म बनतो. अशी माणसं सतत मग तणावाखाली वावरतात. मी मुक्त आहे. माझी भूमिका ज्यांना पटते, अशी मोजकीच माणसं मला भेटत राहतात आणि त्या भेटीगाठी, गप्पा चिरंतन राहतात. सायरा बेटा, महावीर नग्न उभा राह्यला ह्याचा अर्थ निर्वस्त्र असा घेण्याचं कारण नाही. तो स्वच्छ मनासकट प्रकट झाला.'

आपल्याला बळ आलं ते आपण कृती केली म्हणून आणि मंडलीकांनी स्वच्छ मनाची व्याख्या सांगितली म्हणून. तरीसुद्धा ओंकारनाथांशी हे इतकं बोलली ती सायराच होती का ? ती सयाराच असेल, तर त्या बोलण्याचं विश्लेषण करणारी आत्ताची सायरा कोण आहे ?

ओंकारनाथ खरं तर सुखी आहेत. वस्तुंवर प्रेम करतात. केव्हातरी कोणतंही कारण नसताना ऑफिस डोक्यावर घेतात. कुणालाही फायर करतात आणि त्याक्षणी ऑफिस सोडून कुठेही जातात.

आपण ह्या माणसाला, कोषातून बाहेर का काढायचं ? लेट द कपल् यूज इच अदर. त्यात त्यांना आनंद वाटतो. एकमेकांना देण्याची त्यांची तेवढीच कपॅसिटी असेल. आपण त्यांना जित्या जागत्या दुनियेवर प्रेम किंवा विचार का करायला लावायचा ? त्यांना खुशाल एकमेकांचा वापर करू दे. मला काय अधिकार ? -ओंकारनाथ बॉस. आपण स्टेनो.

।। चार ।।

सतत प्रत्येकाचा वापर करणाऱ्यांच्या आयुष्यातला सर्वात अपमानास्पद क्षण कोणता ?

आपलाही वापर केला जातो, हे सांगणारा क्षण. सायरानं उल्लेख केला आणि ओंकारनाथ अस्वस्थ झाले. त्यांचं कामात लक्ष लागेना. आपण अस्वस्थ आहोत. ह्याचा अर्थ सायराच्या बोलण्यात तथ्य आहे. जे आपल्याला जाणवलं नाही ते तिनं ओळखलं.

ह्याचा अर्थ ती आपल्यापेक्षा हुशार आहे.

नो !

मुंबईच्या बसेसमध्ये बसायला जागा मिळणारी माणसं जेवढे पैसे खर्च करतात तेवढेच पैसे उभ्यानं प्रवास करणारेही भरतात. आणखी वेगळा समान नागरी कायदा कशाला हवा ? अचानक एखादा बसलेला माणूस उठतो म्हणून एखाद्या कोळणीला जागा मिळते. ह्याचा अर्थ कदाचित तिच्यामागं उभ्या असलेल्या एखाद्या चार्टर्ड अकौंटंटपेक्षा तिला बुद्धिमान समजायचं काय ?

तिला ती जागा दिसणं हा योगायोग.

ओंकारनाथ काहीसे स्थिरावले.

भगवद्गीतेत कृष्णानं अहंकाराचा इतका निषेध का केलाय् हेच ओंकारनाथांना कधी समजलं नाही. जी गोष्ट कळत नाही तिचा आपण इन्कार करतो. अर्जुन गोंधळलेलाच होता. त्याचा रथ चालवणं सोपं. कृष्णानं केव्हातरी आपली गाडी चालवावी. चार हॉर्सपॉवरचा रथ चालवण्याऐवजी अकरा हॉर्सपॉवरची फियाट चालवताना नव्या रस्त्यावरचे ताजे खड्डे, वाट्टेल तसे चालणारे पादचारी, मोकाट गुरं, हे सगळं चुकवताना कृष्ण गोंधळेल आणि मी त्याला, अहंकार असला की कुणाचाही मोठेपणा नाकारून, आनंदात कसं राहता येतं, हे सांगेन.

आयुष्य सोपं आहे.

आपला अहंकार ज्यांना खपत नाही अशी माणसं स्वतः अहंकारी असतात. ती आपोआप अंतरावर राहतात म्हणून आपण मुक्त आणि आपल्यावर जी अवलंबून असतात, ती नम्रतेनं वागतात. त्यांचाही उपद्रव नाही. माझा वापर कोणीही करू शकत नाही आणि विनीता तर नाहीच नाही. परस्वाधीन माणसं बलवानांचा वापर कसा करतील ?

हे सगळं झालं तरीही ओंकारनाथांचं मन शांत होईना. गुन्हा घडलाय पण कोणताही पुरावा मिळेनासा झाला म्हणजे निष्ठावंत पोलिस ऑफिसरला, 'ट्रु बट् अनडिटेक्टेड'चा शिक्का मारून फाईल बंद करताना ज्या यातना होत राहतात, तशी ओंकारनाथांची अवस्था झाली.

टेलिफोन ऑपरेटरला, 'कोणताही कॉल जोडून देऊ नको.' असं सांगून त्यांनी सायराला बोलावलं.

तिनं डिक्टेशनच्या अपेक्षेनं पाह्यलं. 'ते काम नाही.' अशा अर्थाची खूण करीत ओंकारनाथांनी श्वास घेत विचारलं,

'तुमचा मघाचचा कॉमेंट माझ्या लक्षात आला नाही.'

वाक्य निसटलं आणि ओंकारनाथांना जाणवलं, ह्याचा अर्थ 'कोळीण स्मार्ट ठरली.' असा होतो.

ते घाईघाईनं म्हणाले,

'म्हणजे समजलंय, पटलं नाही.'

सायरानं पटकन विचारलं,

'तुमचं लव्ह मॅरेज ?'

'प्रपोज्ड.'

'मला वाटलंच होतं.'

'प्रेम करायला सवडच झाली नाही.'

'सर त्याला सवड लागत नाही, जिगर लागते.'

ओंकारनाथ म्हणाले,

'जिगर नव्हे, मूर्खपणा म्हणा, डोकं गहाण ठेवणं.'

'अगदी योग्य बोललात. पागल झाल्याशिवाय प्रेम संभवतच नाही. जिथं हिशोब नसतो, विचार नसतो, संयम नसतो, तिथंच प्रेमाचा उगम होतो. प्रेम महापुरासारखं असतं.

तिथं किनारे हरवतात. जिथं तर्क आहे, तिथं स्वतःचा बचाव आला. माणसानं बुद्धी वापरावी पण जगावं मनानं.'

'लग्न झाल्यावर प्रेम करता येत नाही, म्हणून कुणी सांगितलं ?'

'तुम्ही करता ?'

'दिवसातून किमान दोनतीनदा विनीतला 'तुझ्याशिवाय मी जगू शकणार नाही.' म्हणतो.'

'त्या काय म्हणतात ?'

''मी तिचं सर्वस्व आहे.' असं तीही मला जाता येता म्हणते.'

'ऑबव्हिय्सली' सायरा उपहासानं म्हणाली, ओंकारनाथांच्या नजरेचा अर्थ ओळखून ती तिरकसपणे म्हणाली,

'संसारात असं वारंवार ठसवावंच लागतं, आणि तेही सतत; कारण प्रेम संपलेलं असतं.' ओंकारनाथांनी पुन्हा पाह्यल्यावर सायरा म्हणाली, 'ज्या गोष्टीची कमतरता आयुष्यात जाणवायला लागते, त्याची तूट शब्दांनीच भरून काढावी लागते. एकमेकांना वारंवार दिलासा द्यावा लागतो.'

'मिस् सायरा, तुम्ही लग्न केलं नाहीत अजून. तेव्हा...'

'लग्न म्हणजे सोशल स्टेटस. कोणत्याही अर्जावर 'मॅरीड' की 'अनमॅरीड' ह्यापैकी एक शब्द खोडायला लावणारी स्थिती. मी कुणाचीही पत्नी नाही. पण प्रेयसी नक्की आहे.'

'मग पत्नी का झाला नाहीत ?'

'पुन्हा तेच सांगावं लागेल. प्रेम नसेल तर पत्नी म्हणजे मंगळसूत्र अडकवण्याचा हँगर. हँगरपेक्षा हँगओव्हर जास्त मौल्यवान दागिना आहे. मी अजून प्रेयसीच आहे.'

'विनीता माझ्यावर प्रेम करीत नाही, हे कुणी सांगितलं ? माझ्याजवळ पैसा आहे आणि मला पर्सनॅलिटी आहे. हे तुम्हीही मान्य कराल. इतरांचं राहू दे. तुम्हाला मी आवडत नाही ? मोकळेपणी सांगा.'

'तुम्ही प्लॅस्टिकच्या फुलांसारखे आहात.'

‘व्हॉट यू मीन बाय् दॅट ?’

‘रंग आहे, गंध नाही. आकर्षक आहात, चैतन्य नाही.’

‘भले, जिवंत असल्याशिवाय आत्ता आपण बोलत आहोत का ?’

‘वस्तुत्त्वानं असणं आणि अस्तित्त्वानं असणं ह्यात फरक आहे.’

‘मी तुम्हाला आवडतो की नाही इतकंच मला सांगा; मला ह्यापेक्षा मोठी भाषा समजत नाही. बोला.’

‘वस्तुंवर, पदार्थांवर प्रेम करणाऱ्या आणि माणसांपेक्षा चैतन्यशून्य गोष्टींवर जीव टाकणाऱ्या माणसांवर प्रेम करू नकोस असं माझ्या गुरुनं मला सांगितलंय.’

‘तुमचा गुरू कोण ?’

‘कबीर.’

‘कबीर बेदी ?’

‘ह्या नावापलीकडे तुम्ही जाणार नाही हे मला माहित होतं. मी भक्त कबीराबद्दल म्हणतेय.’

‘अच्छा. तुमच्या टेबलावरच्या काचेखाली काहीतरी संदेश आहे, तोच ना ? —कबिरानं काय सांगितलं आहे ?’

सायराला बरं वाटलं. ओंकारनाथांना अनेक दिवस जे ऐकवण्याची तिची इच्छा होती ते ऐकवण्याचा क्षण आला होता.

‘आयुष्यात कुणीही कुणाचं नाही.’ हे तिला प्रामुख्यानं सांगायचं होतं. स्वतःच्या वडिलांनी धर्म आणि रूढीचा आधार घेऊन तलाकही घेतला. जाता जाता घेतला होता आणि नंतर दोन बायकाही घरात आणल्या होत्या. स्वतःच्या सुखापल्याड अन्य विचार नाही.

ओंकारनाथ जरा वेगळे. पण सगळा जीव जडवस्तूंमध्ये गुंतलेला. जित्याजागत्या दुनियेत रस नाही. त्यापेक्षा बाप बरा. एका बाईवरचं प्रेम उडालं तर दुसरीवर तरी करतो.

पंकजनं तसंच केलं का ?

सगळीच माया.

पण त्यातून मिळालेला सुखाचा, दुःखाचा, अपेक्षा-उपेक्षांचा अनुभव कधीच खोटा नसतो. कोणताच अनुभव नको असेल तर 'एकला चालो रे' हेच खरं.

'एकला चालो रे' हे ऐकायला गोड वाटतं. मात्र माणूस जेव्हा हा मंत्र आचरणात आणतो तेव्हा ते तत्त्व पटतं म्हणून की आपोआप परिवारापासून फेकला जातो म्हणून नाइलाजानं स्वीकारतो ?

त्यानं आपण होऊन ती अवस्था-एकट्याची वाट स्वीकारली असेल तर त्याची महती इतरांना सांगायच्या फंदात तो पडणार नाही. तो जेव्हा ही धडपड करतो तेव्हा त्या मार्गावरही त्याला सहप्रवासी हवा असतो. स्वतःच्या सावलीची सोबत पुरेशी वाटत नसली तरीही सावलीइतका स्वामीनिष्ठ सोबती दुसरा कोणी नाही. कबीराची महती आणि त्याचा संदेश ओंकारनाथांपर्यंत का पोहोचवायचा ?

ओंकारनाथांनी पुन्हा तो प्रश्न विचारल्यामुळे सायरा म्हणाली,

'कबीर सांगतात, माणूस आत्मवान् आहे, म्हणूनच त्यांनी आत्म्यापेक्षा कमी मौल्यवान गोष्टींसाठी जीव टाकू नये.'

'अॅग्रीड, व्हॉट अबाऊट मी ?'

'सर, प्रेमाचं एक तत्त्व आहे. तुम्ही एखाद्या व्यक्तीवर, कुणावरही...म्हणजे मित्र म्हणा, पत्नी, प्रेयसी...कोणीही...एकचित्तानं प्रेम केलं असेल आणि तुम्हाला तितकाच उत्कट प्रतिसाद मिळाला असेल...'

अस्वस्थतेनं ओंकारनाथांनी विचारलं,

'तुम्ही मला का मधे आणता ?'

'आय अॅम सॉरी. दॅट वॉज नॉट माय कन्टेन्शन. मी म्हणते, कोणत्याही दोन व्यक्तींनी असं कोसळणारं प्रेम एकमेकांवर केलं असेल, तर त्यांचं वागणं-हसणं-बोलणं, एकमेकांसारखं होतं. कालांतरानं त्यापैकी काहीजण एकमेकांसारखे दिसायला लागतात. प्रेम ही एक प्रचंड शक्ती आहे. जिथं संपूर्ण समर्पण केलं जातं तिथं प्रेम तुमच्यात परिवर्तन घडवून आणतं. निव्वळ वस्तूंवर जान कुर्बान करणारी माणसं वस्तूंसारखीच दिसायला लागतात. त्यादृष्टीनं सर, तुम्ही आरशात स्वतःला पहा.'

ओंकारनाथ गप्प राहिले. हे काहीतरी वेगळं होतं. आजवर हे असं कधी आपण ऐकलं नव्हतं. सहाच महिन्यांपूर्वी आलेली ही स्टेनो. नाव सायरा. मराठी अस्खलीत बोलते. मराठी माध्यमात शिकली. हिला हिचा धर्म, परिवार, रूढी आवडत नाहीत, म्हणे. आपण हिच्याशी कधी गप्पागोष्टी केल्या नाहीत. कुणाशीच बोलत नाही, तसं हिच्याशीही बोलत नाही. हिनं आपल्याला एवढं हेरलं कधी ? अचूक पट्ट्यांवर हिची बोटं फिरतात आणि लावलेला सूर ऐकणाऱ्याला रूचेल की नाही, ह्याची हिला चिंता नाही. 'तुम्ही माझं सर्वस्व आहात.' असं विनीता रोज ऐकवते तेव्हा ती आपल्या चेहऱ्याकडे टक लावून बघते. विनीता विलक्षण देखणी आहे. अर्थात त्याशिवाय ती आपल्या घरात आलीच नसती. आयुष्य संपेपर्यंत जिच्याबरोबर रात्रंदिवस राह्यचं आहे, ती व्यक्ती केसांपासून पायाच्या नखापर्यंत देखणी हवी.

सायरा अत्यंत मामुली.

पण हिनं आपल्या व्यक्तिमत्त्वाचं हे वर्णन करावं ? आपण तिला आवडतो की नाही ह्याचं डायरेक्ट उत्तर तर हिनं दिलंच नाही. विनीता इज डिफरंट.

प्रॉपर मॅच. शी नव्हेर सेज नो. सायराची आणि विनीताची भेट घडवली पाह्यजे. म्हणजे सायराला माझ्यात जे दिसलं नाही ते विनीता तिला दाखवून देईल.

'सर, आय वॉज अननेसेसरीली ब्लंट, सॉरी टू हर्ट यू.'

'तुम्ही एकदा घरी या. विनीताला भेटा.'

'त्यांना चालेल ?'

'शी नेव्हर सेज नो टू एनीथींग.'

'आय वुईल हॅव टु थिंक.'

'का ?'

'जी व्यक्ती सगळ्या गोष्टींना 'होच' म्हणते तिच्या होकारात काय उरलं असेल आणि म्हणूनच मग अशा व्यक्तीला नकारात जे सामर्थ्य असतं त्याची ओळख कधी होईल ?'

ओंकारनाथांनी, 'मी तुम्हाला आवडतो की नाही ?' —ह्या प्रकारचा प्रश्न का विचारावा, ह्याच्यावर विचार करीत सायरा समुद्र किनारी बसली होती.

निसर्गानं सौंदर्याचं वरदान न दिलेल्या मुली पुरुषांना आवडतात, ह्याचा नेमका अर्थ

काय असेल ?

पंकजची गोष्ट वेगळी. श्रीमंतांच्या मुलांना स्वतःच्या पराक्रमावर काही मिळवण्यासाठी बापजाद्यांनी जागा ठेवलेली नसते. काहीतरी सनसनाटी करून दाखवण्याकडे त्यांचा कल म्हणूनच जात असेल. पण कृती करण्याचं धाडस जर नसेल तर वैचारिक पातळीवरच क्रांतीचे झेंडे लागतात. एखादे वादळ आल्याप्रमाणे विचार आले गेले तर हे झेंडे 'हाफ मास्ट' व्हायला वेळ लागत नाही.

पण काहीसे वयस्कर आणि विवाहीत पुरुष असतात. त्यांना तरुण मुली का आवडतात ?

सायराला एकाएकी शुभाची आठवण झाली. शुभा सिस्टर. तिनं सांगितलं होतं. 'मेडिकलच्या इंटर्न्सकडून जेवढा त्रास होत नाही, त्याच्यापेक्षा जास्त धोका, लग्न होऊन पंधरा-वीस वर्ष झालेल्या पुरुषांकडून होतो आणि त्यासाठी मुलगी देखणी असावी अशी पण गरज नसते. तू फिलॉसॉफीबरोबर सायकॉलॉजी कर आणि असं का असेल त्याचं तूच उत्तर दे.'

आपण उत्तर दिलेलं होतं.

'सगळ्या वेदशास्त्रात, श्रुती आणि स्मृती ह्याच्यावर भर दिलाय. श्रुती म्हणजे ऐकलेलं आणि स्मृती म्हणजे लक्षात ठेवलेलं. दोन्हीत अनुभवाचा उल्लेख नाही. श्रुती-स्मृतीपेक्षा अनुभूती श्रेष्ठ आणि माणूस महाचतुर. तो सायकॉलॉजीची स्वतःपुरती फिलॉसॉफी बनवतो.'

ओंकारनाथांनी हा प्रश्न का विचारला असेल ? माझ्यासारख्या सामान्य दिसणाऱ्या मुलीला आपण आवडतो का, हे त्यांना का हवं असेल ?

'होकारार्थी' उत्तराची अपेक्षा त्यांनी देखण्या बाईकडून करावी.

मी 'हो' - 'नाही' म्हटलं तर काय फरक पडतो ?

सायराचे विचार थांबले.

बाहेर हॉलमध्ये ओंकारनाथ कुणावर तरी आकारण चिडले होते. नेहमीसारखा आरडाओरडा करून ते बाहेर पडले.

सायरा भानावर आली.

आपण अजून ओंकारनाथांच्या त्याच एका प्रश्नाभोवती फिरत आहोत. आपल्याला काल समुद्र दिसला नाही. लाटा दिसल्या नाहीत. विचारलाटा आतून मेंदूला झोडपत होत्या. त्या सूक्ष्म पारदर्शक विचारलाटांनी समुद्राच्या सगुण साकार लाटांचंही अस्तित्व नाहीसं केलं होतं.

खरंच,

वस्तू जेवढी सूक्ष्म तेवढी स्फोटक.

सर्वात सूक्ष्म काही असेल तर ते विचारच. म्हणूनच अस्वस्थ, उद्ध्वस्त करण्याची त्यांची शक्ती अफाट.

आपण त्यांच्या स्वाधीन का होतो ? मग मंडलीकांच्या शिकवणुकीचा काय उपयोग ?

विचारांची काही चूक नाही.

आपणच त्यांच्या स्वाधीन होतो. ज्यांच्यापासून अंतरावर राह्यचं त्यांना आपण घरातच जागा देतो.

आपल्यापेक्षा ओंकारनाथ सुखी. विचार वगैरे भानगड नाही. कुणावरही चिडतात, बाहेर जातात, शांत झाले की परत येतात. आपण त्यांच्या प्रश्नावर इतका विचार केला, करीत आहोत, हे त्यांच्या गावीही नसेल. आपणच त्यांना त्यांचा अर्थ विचारला अन् ते पटकन म्हणाले, 'इट वॉज जस्ट अ कॅज्युअल क्वेश्चन' तर ? ...छे. काही खरं नाही. प्रा. मंडलीक सांगतात ते आचरणात आणायलाच हवं.

।। पाच ।।

‘काय म्हणतंय ऑफिस ?’ प्रा. मंडलीकांनी नेहमीचा प्रश्न विचारला.

‘आमचं ऑफिस काही म्हणत नाही, हाच मुख्य प्रॉब्लेम आहे. अमेरिका, जपान ह्या राष्ट्रांवर आपला राज्यकारभार. त्यापैकी आमचं एक ऑफिस म्हणजे साबुदाण्याचा एक दाणा.

आपल्याला आपला आवाज आहे का ?’

‘ऑफिसला आवाज असतो ना. बॉस म्हणजे बॉस.’

सायरा गप्प झाली. मंडलीकांनी सहज विचारलं,

‘तुझा साहेब नक्की कसा आहे ?’

‘अजून मला नीट समजले नाहीत. अंदाजावर अंदाजाचे मनोरे उभे करून मेंदू शिणवायला मला आवडत नाही. समोरची व्यक्ती करील तेव्हा आपल्याला ती गोष्ट समजणारच आहे असं म्हणत मी गप्प बसते.’

‘छान, सुपर्ब.’

‘सर, ही दीक्षा तुमच्याकडून मिळाली.’

‘मी अनेकांना हीच दीक्षा दिली.’

‘मला माहीत आहे.’

‘तुझा माझा सहवास गेल्या चारपाच वर्षातलाच. मी मात्र ही दीक्षा...’

‘नातेवाईकांपासून सगळ्यांना दिलीत असंच ना ? -ही मंडळी बोलतात तेव्हा कळतं ना.’

‘मंडलीकांकडे जा. ते सगळ्यांना एकच सांगतात. परवा अशाच एका तुमच्या स्टुडण्टला मी राहवलं नाही म्हणून एकच वाक्य ऐकवलं. तो गप्प बसला.’

‘काय सांगितलंस ?’

‘झाड आंब्याचं आहे म्हटल्यावर, मोहर येणं बंद होईतो, ते आंबेच देणार; आणि म्हणूनच ते आंब्याचं झाड म्हणून ओळखलं जातं. ती त्याची आयडेंटीटी आहे. अनेक माणसांना, शंभरापैकी नव्वद लोकांना त्यांची आयडेंटीटी सांगता येईल का ?’

‘हे सगळं बोललीस का ?’

‘छे, छे, त्याला मी एकच वाक्य ऐकवलं. त्यानं वाद केला असता तर हेच विचारणार होते. रिअलाईज् झालं म्हणून तो गप्प बसला की बोलणं टाळायचं म्हणून, ह्याच्यावरही मी विचार केला नाही.’

‘लोकांना आयडेंटीटी असते की. डॉक्टर, वकील, आकउंटंट...’

‘ती त्यांची डिग्री झाली आणि नंतर व्यवसाय झाला. ह्याच यादीत मग नेते, पुढारी, आमदार, खासदार, मंत्री, पत्रकार सगळ्यांना टाकता येईल. नगरसेवकांपासून थेट काही काही मंत्र्यांपर्यंत तर शिक्षणाचाही संबंध नाही. आयडेंटीटीचं नातं माणसांशी आहे असं मी मानते. सुशिक्षितांपैकी अनेकांची ओळख ते त्यांचा व्यवसाय कोणत्या तऱ्हेनं करतात हे समजलं की तिथेच होते. मग त्यांच्यातल्या माणसाशी नातंच ठेवू नये, हे समजतं. व्यवसायाचा वेळ वगळला तर मागं उरणाऱ्या कालावधीत तुम्ही जे असता, ती तुमची आयडेंटीटी. त्यामुळे एरवीही कुणाच्या तरी आठवणीनं मनानं कात टाकावी, अशी फार थोडी माणसं उरतात. अनेक माणसांचा आपण निष्कारण विचार करतो आणि मेंदू शिणवतो. ही वाया जाणारी मेंदूची शक्ती वाचवली तर आपण कितीतरी टवटवीत राहू, ही तुमची शिकवण सर, उभ्या आयुष्याची शिदोरी आहे.’

मंडलीकांचे डोळे पाणावले.

‘सर, काय झालं ?’

‘आनंद.’

सायरा बघत राह्यली.

‘बी पेरल्यापासून शेतकऱ्याची तगमग सुरू होते. पहिली सर कोसळली की मातीप्रमाणे त्याचं मन शांत, तृप्त होतं. पहिला कोंब फुटला की त्याचे डोळे भरून येतात. आकाशातल्या पाण्याबरोबरच, कोंबाला ह्या धाराही आवश्यक असतात.’

सायरानं मंडलीकांचा हात हातात घेतला. मंडलीक म्हणाले,

‘कोंब आणि माणूस सारखाच. बी जमिनीत सुरक्षित असतं. अंकुर उघड्यावर पडतो. कुणीतरी ओरबाडेल, कुणाचा तरी पाय पडेल, अशा दहशतीत त्याचा प्रवास सुरू होतो. माणसाचंही तसंच. आईच्या गर्भात मूल सुरक्षित असतं. श्वासही घेण्याचे कष्ट नाहीत. पोटापाण्याचा प्रश्न नाही. जन्म झाला की सगळं सुरू, त्यातही कुणाच्या ललाटी कोणता प्रवास...’

‘सर जाऊ दे. निराश करणारे विचार कशासाठी ? -एक नवीन कॅसेट आणली आहे. ऐकणार ?’

दोनतीन दिवस ओंकारनाथ गप्प गप्प होते. आपण अलिप्त असतो. तेच छान. सायराशी जितक्यास तितकं ठेवायचं. ती काही सांगते ते पेलत नाही, डावलता येत नाही. स्वीकार करावा, इतकं ती अफाट बोलते, पण ते झेपत नाही.

संथ जलाशयात दगड टाकला म्हणजे जे गोल तरंग किनाऱ्यापर्यंत जातात ते बघताना अंगावर तशीच वलयं निर्माण होतात. पण असा अकारण आणि अचानक दगडांचा आघात होताक्षणी, जलाशयाला काय वाटत असेल, त्याचा कुणी विचार करतं का ?

जलाशय काहीही बोलत नाही. शिवी दिली तरी एखाद्या संतानं हसून पहावं त्याप्रमाणे वर्तुळाकृती तरंगांचा जलाशय आहेर करतं. आपण जलाशय नव्हेत.

संत तर नाहीच नाही. सायराचं का ऐकून घ्यायचं ? -तिचं बोलणं वेगळं आहे. शांत सुरात, सहजी बोलते. पण नाही सहन होत.

मग ही सर्कस कशासाठी ?

मी प्लॅस्टिकसारखा असेन किंवा अॅक्रिलीकसारखा असेन. हिला माझ्याशी काय करायचं आहे ?

मी बॉस. ती स्टेनो.

दिवसभर ओंकारनाथ स्वतःला बजावीत राह्यले. आपण असं स्वतःला का सांगत आहोत, असा स्वतःलाच जाब विचारताना सायराच्या टेबलावरची फुलं दिसत होती. ती सायरासारखीच प्रसन्न होती. त्यांनी सायराकडे पाह्यलं. ती फुलांसारखी टवटवीत होती. ‘हिला आपल्याशी काहीचं करायचं नाहीए.’-

हे ध्यानात आल्यावर ओंकारनाथ अस्वस्थ झाले. आपला रुबाब, पैसा, पत, प्रतिष्ठा ह्याला काही अर्थ आहे की नाही ? -

ओंकारनाथांनी सायराला बोलावलं.

'येस सर.'

त्यांनी तिच्याकडे पाह्यलं आणि काही न सुचून ते म्हणाले,

'आय वुईल कॉल यू लेटर ऑन.'

त्या संबंध दिवसात असं दोनतीन वेळा झालं आणि त्याचाच ताण सहन न झाल्यामुळे अत्यंत अस्वस्थ मनःस्थितीत ओंकारनाथ वरळीला परतले. राजवाड्यासारख्या स्वतःच्या वास्तूकडे पाहून आज त्यांची छाती भरून आली नाही. नटूनथटून सामोऱ्या आलेल्या विनीताला त्यांनी कमरेभोवती हात टाकून जवळ ओढून घेतलं नाही. तिलाही काही वाटलं नाही.

कपडे बदलता बदलता ओंकारनाथांचं लक्ष समोरच्या फोटोकडे गेलं. त्यांचा पामेरियन, 'सनी' त्यांच्या खांद्यावर लडिवाळपणे मान टाकून बसला होता. ओंकारनाथांनी घरात पाऊल टाकताक्षणी पंधरा मिनिटं फक्त त्याचं कौतुक करायचं. विनीतानं त्यांना मिठी मारलेलीही सनीला खपायचं नाही. सनीच्या ह्या कोसळणाऱ्या प्रेमाला घाबरून ओंकारनाथांनी सहा महिन्यांत सनीला विकून टाकलं. रोज त्या फोटोकडे त्यांचं लक्षही जात नसे. घरात त्या त्या जागी नेहमीच्या गोष्टी असतात, ह्याचा एकदा सराव झाला, की त्या त्या वस्तूचं अस्तित्व संपलं. ज्या वस्तूची गरज लागेल ती पुनः सचेतन होते.

सनीचा फोटो आजच नव्यानं दिसला.

का ?

-केवळ विनीताच्या डिटॅच्ड हालचालीमुळे.

आलिंगनाचा इन्कार केला तरी विनीताला काही वाटलं नाही. स्टॉपवर बस थांबली नाही की, बसमध्ये जागा नसेल हे आता मुंबईकर गृहीत धरतात, तसं. आपला मूड असो-नसो, सनी सळो की पळो करायचा. आपलाही गेलेला मूड येत असे. थकवा जात असे. ते निर्व्याज प्रेम आपण विकून टाकलं. आता सनीचा हा नुसता फोटो आपल्याला काय देणार ? ...ह्या हॉलच्या एका भिंतीला आपण भिंतीच्या आकाराचा बागेचा वॉलपेपर लावलाय. सीझन बदलला तरी त्या झाडांची पानं पिकत नाहीत आणि त्याला नवी पालवीही फुटत नाही. ह्या झाडांच्या सावल्या लांबवर जात नाहीत. तशा नाहीशा सुद्धा होत नाहीत. सूर्यकिरणांशी ह्याचं नातच नाही.

चैतन्याचा स्वीकार करायला चेतनमनच हवं. ओंकारनाथ अभावीतपणे आरशासमोर उभे राह्यले. पण आजचं उभं राहणं वेगळं होतं. आपलं रोजचं आरशासमोर उभं राहणं हाही रूटीनचा भाग असतो. न्याहाळणं कधीकधीच असतं. भांग पाडणं, सवयीचा भाग, पण केसांना कलप लावण्याचा दिवस असला की ते पहाणं वेगळं. ओंकारनाथ रोजच आरशात पाहायचे पण आज ते त्यांना स्वतःला दिसले.

आपण खरोखर एखाद्या पदार्थासारखे दिसतो ? -आपण वस्तुत्त्वानं आहोत ? -अस्तित्त्व नाही ? हा हॉल, हे अफाट फर्नीचर, परफ्यूम आणि क्युरिओजनं भरलेली कपाटं, सातआठ प्रकारची रिस्टवॉचेस, गरज नसतानाही घेतलेले शेकडो शो-पीसेस, ह्यापैकी आपण एक ? -ह्या सगळ्या गोष्टी आपण एका दिवसात फेकून दिल्या तर त्या ओरडणार नाहीत. आपण घराचं म्युझियम केलं आहे. अट्टाहासानं घेतलेल्या एकाही वस्तूकडे, त्याची शोकेसमध्ये स्थापना केल्यावर आपण दुसऱ्यांदा पाह्यलं पण नाही. म्युझियमची इमारत किती मजल्यांची आहे आणि त्याला किती दालनं असतात, ह्याला महत्त्व नाही. प्रत्येक पर्यटक स्वतःच्या आवडीच्या महालात रेंगाळतो. आपण नक्की कुठे रेंगाळतो ?

ह्या प्रश्नासरशी ओंकारनाथ कमालीचे बिथरले. आपणही वस्तूच ? वस्तू वस्तूंकडे बघत नाहीत. ओंकारनाथांनी पुनः आरशात पाह्यलं. पण आज आरसा काही सांगेचना. तेवढ्यात आरशातूनच त्यांना विनीता खोलीत येताना दिसली. सकाळी ऑफिसला येताना, विनीतानं संध्याकाळी कोणत्या साडीत तयार राहायचं ? हे सांगितलेलं ओंकारनाथांना आत्ता आठवलं.

ही विनीता माणूस आहे का मेनू कार्ड ?

ओंकारनाथ प्रथमच स्वतःवर चिडले.

'निघायचं ना ?' विनीतानं विचारलं.

'मला मूड नाही.'

'ओके' म्हणत विनीता तिच्या खोलीत गेली. अनुकूल-प्रतिकूल, पसंती-नापसंती, उत्सुकता-अलिप्तता-कोणतीही प्रतिक्रियाच नाही.

ओंकारनाथांची पिसाळल्यासारखी अवस्था झाली. अशी अवस्था कुणी केली ? -येस्-यःकश्चित स्टेनोग्राफरनं. मिडीऑकर लुक्स, टाइमबार थॉट्स.

भक्त कबीर हिचा गुरू. त्याचा जन्म किती वर्षापूर्वीचा हे ओंकारनाथांना माहीत

नसल्यामुळे, सायरासकट कबिराला कोणत्या शतकात ढकलायचं हेही त्यांना कळेना.

आपण कुणाशीही पर्सनल लेव्हलवर बोलत नाही तेच योग्य. सायराशी इतकं का बोललो ?

शी इज् रिस्पॉन्सिबल फॉर ऑल धिस्. मला नकाराचं सामर्थ्य पटवायचा प्रयत्न करते. शी शुड् बी टेकन् टू टास्क.

ओंकारनाथांनी प्रथमच सायराला रिक्वेस्ट नंबरवर फोन केला. फोन उचलला गेला. 'जस्ट अ मिनीट' म्हणत कुणीतरी सायराला बोलवायला गेलं असावं. 'ही बया नेमकी समुद्रावर निर्माल्य टाकायला गेली नसली म्हणजे मिळवलं.' असं म्हणत ते वाट पहात राह्यले.

'सायरा हियर.'

'सॉरी, डिस्टर्ब केलं.'

'नॉट अॅट ऑल. एनी अर्जंट वर्क?'

ओंकारनाथ घुटमळत म्हणाले,

'नकारात सामर्थ्य असतं म्हणालात, त्याचं नवल वाटलं.'

'इट वॉज जस्ट अ स्टेटमेंट.'

'तुमच्या इतर बोलण्याचा विचार केला तर हे स्टेटमेण्ट सहज येणार नाही.'

सायरा हसत म्हणाली, 'माझ्याकडे अशी भरपूर स्टेटमेण्ट्स आहेत. तुम्ही कशाला विचार करता ? इफ यू आर हर्ट, फरगीव्ह मी.'

'मी हर्ट झालोय, पण कारण वेगळं आहे.'

'सांगा.'

'मला बोलण्याची सवय नाही. विचार येतात, पण कन्फ्यूजन होतं. ट्रॅन्झॅक्शन, डिबेंचर्स, शेअर्स, इम्पोट - एक्सपोर्ट ह्याच्याबाहेरचं वेगळं जमत नाही.'

'हं.'

‘तुम्ही हे विषय वगळून लाइफलाच भिडता. हे कसं काय ?’

‘कारण माझा शेअरऐवजी शेअरींगवर जास्त विश्वास आहे.’

ओंकारनाथ गप्पच झाले.

‘शल् आय कीप द फोन ?’

‘नकाराचं काय ते सांगा.’

‘त्यानं अहंकार जागा होतो आणि तुम्हाला त्याच्याशी युद्ध पुकारता येत नाही. कारण तो आपल्यातच राहतो.’

चोरून ऐकणं हा विनीताचा स्वभाव नव्हता. चैनीव्यतिरिक्त आयुष्याकडून तिचं काही येणं नव्हतं. आणि आपण तिचं भरपूर देणं लागतो हे आयुष्याला मान्य होतं. फक्त तिच्याकडून आपण इतकं कर्ज कधी काढलं होतं, हे त्या बिचाऱ्याला आठवत नव्हतं. ओंकारनाथांच्या माध्यमातून ते कर्ज फेडत होतं. ओंकारनाथ बाहेर यायला तयार नाहीत म्हटल्यावर अशाच एका, खाना-पिना जीना तत्त्वावर जगणाऱ्या, त्यालाच सत्यं-शिवं-सुंदरम् मानणाऱ्या मैत्रिणीला विनीता फोन करायला बसली. ओंकारनाथ आणि सायरा ह्यांचा पूर्ण संवाद तिनं ‘सायरा हियर’ इथपासून ऐकला.

‘नकारात सामर्थ्य असतं असं ह्या बाईनं का म्हणावं ? काळी का गोरी माहीत नाही, तरुण आहे की विवाहित बाई आहे, पत्ता नाही. तरीही ओंकारनाथांनी हिच्याकडे काय मागितलं असेल ? -हिला ‘शेअरिंग’ समजतं. नकारानं अहंकार डिवचला जातो.

कुणाचा पण ?-

ओंकारनाथांचा ? -त्यांना अहंकार आहे कुठे ? मी नाचवीन तसे नाचतात. सौंदर्यापुढे वाकतात. दिवसभर कामात गाडून घेतात. झोप येईपर्यंत टीव्ही बघतात. कंटाळतात. साहजिकच आहे. टीव्हीचे कार्यक्रम. एका डोळ्याने पहायचे, दुसऱ्या डोळ्याने सोडून द्यायचे. मग चार ओळी वाचायच्या आणि शेवटी आपल्याला जवळ ओढून घ्यायचं. डायझेपाम म्हणजे लार्पोज, कॉम्पोज, व्हॅलियमऐवजी बायकोचं शरीर. ती दहा मिनिटं सहन केली की उरलेली तेवीस तास पन्नास मिनिटं आपलीच. रात्री कस्टम ड्यूटी भरायची मग दिवसभरच्या चैनीची चौकशी नाही. खरेदीची छाननी नाही. ‘हे कशाला हवं होतं घ्यायला, अशी उलटतपासणी नाही. कुणाला फोन केलास ? कोणाचा फोन होता ?’ असं नाक खुपसणं नाही. अपेक्षा माफक, कोणत्या ? -तर सकाळी अंघोळ करून ‘बेड् टी’ द्यायचा; एवढीच. आंघोळ केव्हातरी करावी लागतेच. सकाळी टबमध्ये,

टेपरेकॉर्डर लावून वेळ मस्त जातो. आपणही मधेच घुसावं आणि थोडा रोमान्स करावा असले विचार त्यांना शिवत नाहीत. स्वतःजवळ कल्पनाविलास नाही तर काही तरी पाहून शिकावं, तर थिएटरमधे मस्त झोपतात. आपलं काही त्यानं बिघडत नाही. 'आपलं काहीही, केव्हाही कुणावाचूनही न अडणं.' ह्याचंच नाव सुख.

ओंकारनाथ सायराकडे काय मागत असतील ? -काही का मागेनात. कोणताही पुरुष बाईजवळ मागून मागून काय मागणार ? एखादं चुंबन मागितलं असेल. तिनं नकार दिला. मूर्ख आहे. चुंबन दिल्यानं ओठ नाहीसे होत नाहीत, मागं निशाणी उरत नाही. तसं असतं तर एव्हाना मी उरलेच नसते. टबबाथ घ्यायचा आणि कात टाकायची.

विनीताचे विचार ओंकारनाथांच्या हाकेनं थांबले. ते फिरायला जाण्याच्या तयारीत होते. दॅट्स फाईन.

कस्टम ऑफिसर असला तरी किती काळ रूबाब करील ?

विनीताला कोणत्यातरी शॉपिंग सेंटरवर सोडायचं आणि सरळ सायराकडे जायचं असं ओंकारनाथांनी ठरवलं.

पण का? -लगेच दुसऱ्या मनानं विचारलं. आपण आपल्या आयुष्यात दुसऱ्या माणसाला इतकं महत्त्व कधी दिलं ? आपण कुणाला कधी काय विचारायला गेलो ? आपला सल्ला मागतच आजवर सगळे आले. सायराकडे गेलो तर तिला येण्याचं काय कारण सांगायचं ? तिच्याच विधानांचा अर्थ विचारायचा ? कोणतं विधान ?

नकारानं अहंकार जागा होतो, हेच विधान. हे खोटं आहे का ? -नसेल तर पुढचं तिचं म्हणणंही सार्थ आहे. त्याच्याशी युद्ध करता येत नाही. म्हणजे कायम हा शत्रू जवळ बाळगायचा. मनस्ताप करून घ्यायचा. मनस्ताप ?

आजवर कधी झाला होता ? -मनस्ताप कोण देतं ? -तर माणसं. त्यांना आपण जवळच करीत आलो नाही.

फक्त प्रेमच करील, असं कोण असतं ? सनी होता. त्याच्या फोटोतल्या नजरेतही प्रेम दिसतं. विश्वास दिसतो.

ते प्रेम का पेललं नाही ? -आपण त्याला का विकला ? -विनीता तेव्हा मधे का आली नाही ?

'सनीला विकून टाकू.' म्हटल्यावर तिच्याजवळ उत्तर तयार होतं. 'विकून टाका,

त्याच्याही खाण्यापिण्याच्या वेळा फार सांभाळाव्या लागतात.'

'त्याच्याही म्हणजे ?

'तुमच्याप्रमाणेच. त्याला खायला देण्यापूर्वी फक्त अंघोळ करावी लागत नाही.'

'व्हॉट रॉट यू आर टॉकिंग ?'

'तुम्ही चूळही न भरता चहा घ्यायचा आणि मी मात्र तो अंघोळ करून द्यायचा.'

'माझं मॅरीड लाइफ कसं असावं, हे मी ठरवलेलं आहे. तू माझ्यावर उपकार करीत नाहीस.'

सनीवरून झालेला हा संवाद.

पायाखाली मखमलीच्या पायघड्या घातल्या तरी विनीताची ही भाषा. आपण त्याची पर्वा करीत नाही. ते सोडा. आपण कुणाचीच फिकीर बाळगीत नाही आणि फार काळ कुणावर विचार करीत वेळ बरबाद करीत नाही. मग सायराकडे मी का जातोय ? - कोण नेतंय ? -ही गाडी ? -छे, ही निर्जीव आहे. हा शोफर ?-नो. हा नोकर आहे.

मग ?

आपली अस्वस्थता. पण आपण अस्वस्थ का आहोत ? -आय् अॅम हर्ट. पण व्हॉट फॉर ? -'मी तुम्हाला आवडतो की नाही ?' ह्याचं सरळ उत्तर सायरानं दिलं नाही, म्हणून ? -एका मिडीऑकर असिस्टंटकडे आपण का चाललो आहोत ? -तिचा 'होकार' घ्यायला ? -आणि तिनं तो नाही दिला तर ? ती आत्मवान् गोष्टींना मानते. आपण तिच्या लेखी प्लॅस्टिकचे, चैतन्यशून्य.

आपण चैतन्यहीन ?

मग हे जळतंय् ते काय ? -ही लाहीलाही कसली ? -अहंकाराची ?

'साहेब, गाडी थांबावायची का ?' -शोफरनं मधेच विचारलं. ओंकारनाथांनी बाहेर पाह्यलं पण नेहमीचा परिसरही ओळखायला येत नव्हता.

'आपण कुठे आलोत ?' -त्यांनी गोंधळून विचारलं.

'नेहमीप्रमाणे झोपला असाल ?' -विनीतानं शेरा मारला. ओंकारनाथ मनात म्हणाले,

‘कृष्ण कशाला हवा ? -साध्या शोफरलाही, ‘मला कुठे ने-’ ते मला सांगता येत नाही. त्या सुदर्शनधारीचं बरोबर आहे. अहंकारच मला दिशा दाखवू शकत नाहीए.

।। सहा ।।

‘काय म्हणतोय् साहेब ओंकारनाथ ?’

आज मंडलीकांनी ऑफिस शब्द वापरला नाही. हातातली पर्स शेजारच्या साइडटेबलावर ठेवत सायरा म्हणाली,

‘जरा बिथरल्यासारखे वाटतात. मी सुद्धा अंदाज करतेय.’

‘तू तसं करत नाहीस ना ?’

‘माझा प्रयत्न चालतो. नेहमी यश मिळतंच असं नाही आणि सतत डोळ्यांसमोरच तो विषय असला की जास्त कठीण जातं.’

‘दॅट्स ट्रु.’

‘बोलावणं पाठवायचं, डिक्टेशनच्या तयारीनं जावं तर ‘पुनः बोलावीन’ म्हणायचं.’

‘काही सांगायचं असेल.’

‘ते त्यातले नाहीत.’

‘काही विचारायचं असेल.’

‘विचारून झालंय.’

‘काय पण ?’

‘ते मला आवडतात की नाही ते.’

‘रिअली ?’

सायरानं जे घडलं ते सांगितलं; शुभाच्या अनुभवासहित.

‘शुभा खोटं बोलायची नाही. विवाहीत पुरुषांबद्दल हा अनुभव का येतो ?’

मंडलीक म्हणाले,

‘सांगणं आवघड आहे.’

‘तुम्हालाही ?’

‘मी एक पुरुषच आहे ना ? -निसर्गानं स्त्री आणि पुरुष असे दोनच घटक निर्माण केले. ह्या दोघा घटकांचं वस्तुनिष्ठ चित्रण करण्यासाठी तिसरा घटक हवा, तर योग्य उत्तर मिळेल.’

‘निर्लेप मनानं एखादी स्त्री किंवा पुरुष सांगू शकणार नाही ?’

‘बाई नॉर्मली म्हणेल पुरुष लंपट असतातच आणि पुरुष सांगू लागला तर ते समर्थन ठरेल.’

‘ह्या व्यतिरिक्त तिसरी प्रतिक्रिया कुणीच सांगू शकणार नाही ?’

काही वेळ विचार करीत मंडलीक म्हणाले,

‘विवाहीत स्त्री-पुरुषांच्या बाबतीतच हे असं काही घडतं, असं तू समजू नकोस. आई, बाप, भाऊ, बहिण, नवरा, बायको, सासरची माणसं, मित्रमैत्रिणी-जितक्या साखळ्यांनी माणूस माणसाला जोडला जातो त्या सगळ्या धारणेतून मी बोलतोय. भावाभावांचं, भावा-बहिणीचं एकमेकात पटलं नाही तर, आई-वडिलांना सोडून मुलं पळाली तर, स्वतःच्या मुलाला कुणी घराबाहेर काढलं तर लोकांना फारसं बिघडलंय् असं वाटत नाही. पण कुणी घटस्फोट वगैरे घेतला तर विलक्षण बोलबाला होतो.’

‘तसं का पण ’

‘पति-पत्नी हे कुटुंबाचे, संसाराचे मूलाधार आहेत. ते नुसतंच सेक्सचं नातं नाही, म्हणून. एकमेकांच्या अपार विश्वासाचं प्रतीक म्हणून, नैसर्गिक नियम म्हणून, पति-पत्नीनं शारीरिक टाहो ऐकून प्रतिसाद देणं, हे शेवटचं टोक समज. आयुष्यातलं गौरीशंकर म्हणू. तेवढी एकच फ्रिक्वेन्सी असते का ?’

सायरा मानेनं ‘नाही’ म्हणाली.

‘एखाद्या माणसापाशी असंख्य पातळ्यांवरून ह्या विराट जीवनाला कडकडून भिडण्याची, स्पर्शून घेण्याची क्षमता असते. शिखरावर पोहोचताना प्रत्येक वळणावर, प्रत्येक उंचीवर त्याचं गौरीशंकर असतं. तो अशा ठिकाणी थांबतो. वळून पाहतो. हाकारे तोंडावर हात ठेवतात तसे तोंडावर हात ठेवून तो हाका घालतो. ‘मी एवढी

उंची गाठली.' हे त्याला सांगायचं असतं. त्या टप्प्यावर त्याला 'शाब्बास' हा प्रतिध्वनी हवा असतो. त्यानंतरच त्याला वरच्या फ्रिक्वेन्सीवर जावंसं वाटतं. कोणत्या माणसाला कोणत्या आणि किती उंचीवर विश्राम घ्यावासा वाटेल, 'शाब्बास'चा पाठीवर हात हवासा वाटेल, हे सांगता येत नाही. जेवढं उंच शिखर निवडाल तेवढे सोबती कमी. आयुष्यात मित्रमैत्रिणी येतात, दुरावतात. संघर्ष नसताना, वितुष्ट न येता लांब जातात- 'का ?' हया प्रश्नाचं उत्तर माहीत आहे ?'

'नाही.'

'कधी आपल्याकडून त्यांना प्रतिध्वनी मिळत नाही, कधी त्यांच्याकडून येत नाही, मग दुसऱ्याचा शोध.'

'हा कृतघ्नपणा म्हणता येईल का ?'

'फसवणूक नसेल तर नाही. संवेदनाक्षम मन म्हटलं की ही प्रोसेस अटळ आहे. प्रत्येक पुरुष, स्त्री, लहान मूल ह्यांची ही प्रगतीची गरज आहे. मित्र असेच निवडले जातात. वेगवेगळ्या वृत्तीचे. फक्त पति आणि पत्नी ह्या नात्याची साखळी गळयात पडली की संपलं.'

'तेच का ?'

'तीच संसाराची ट्रॅजेडी आहे. लग्नाला जेवढी जास्त जास्त वर्ष होत जातात, तेवढे संघर्ष जास्त.'

'अंडरस्टॅण्डींग वाढायला नको ? कॉम्प्रमाईज नावाची गोष्ट असते ना ?'

'तडजोड आणि संवेदना ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ज्या व्यक्तीला संसारात जोडीदारासाठी सतत तडजोड करावी लागते तेव्हा संवेदनांचा छाप त्याला सलत राहतो. त्याला किंवा तिला. सहनशक्ती जितकी चिवट तितकी वर्ष संसार चालतो. नाण्याच्या दोन्ही बाजूला, तडजोडीचाच शिक्का उमटायला लागतो, तेव्हा प्रतिध्वनींचा शोध अन्यत्र सुरू होतो. त्या मार्गावर कधी एकच व्यक्ती परिपूर्ण भेटते, तर कधी कधी वेगवेगळ्या कलात्मक, मागण्यांसाठी, वेगवेगळ्या व्यक्तींची चाचणी सुरू होते. इथं समाजाकडे एकच तराजू असतो. स्त्री आणि पुरुष, दोघांसाठी एकच मापदंड, 'चार दिवस ही, किंवा हा', आता तिला सोडली', किंवा 'हल्ली दुसराच कुणीतरी तिच्याबरोबर' असतो, असं म्हणायला मिळालं की समाज खूष.'

'पण ही बक्बक् विवाहीत माणसांच्याच मागे का '

‘‘सॅमसन अँड डिलायला’ पिक्चर पाह्यलं आहेस का ?’

‘पाह्यलंय.’

‘सॅमसन फक्त मुख्य दोनच खांब पाडतो, पण संपूर्ण मंदिर पडतं, गाव उद्ध्वस्त होतं. तसं संसारात, पतिपत्नीचं असतं. म्हणून तर अनेक जीव, दोन्ही बाजूला तडजोडीचा छाप असलेलीच नाणी वापरतात. प्रतिध्वनीचं मंदिर चुकवतात. एखाद्याला ह्या प्रवासात सगळ्या संवेदनांना प्रतिध्वनी देणारी आणि व्यक्तिमत्त्वाच्या सगळ्या फ्रिक्वेन्सीज झेलणारी व्यक्ती मिळतेही. अप्सरेसारखी बायको सोडून, किंवा राजबिंडा आणि शब्द झेलणारा नवरा सोडून, ह्या शूर्पणखेत किंवा म्हसोबात ह्या माणसांनी काय पाह्यलं, अशा चर्चा सुरू होतात. गौरीशंकरपेक्षा, पंचावन्न फुटावरची टेकडी विलोभनीय का वाटली, हे सगळ्यांना कोण सांगत बसणार ?’ सायरानं आश्चर्यानं विचारलं,

‘पंचावन्न फूटच का ?’

‘एको म्हणजे प्रतिध्वनीसाठी कमीत कमी तेवढं अंतर लागतं. अशाच कोणत्या तरी, स्वतः ओंकाराथांनाही अज्ञात असलेल्या फ्रिक्वेन्सीवर सायरा उभी असेल.’

‘अज्ञात का म्हणता ?’

‘जो प्राणी अकारण चिडतो, आरडाओरडा करतो, ती तडफड ‘काय हवं आहे.’ ते सापडत नसल्याची असते.’

सायरा विचारात पडली.

‘मी तुम्हाला आवडतो की नाही ’ -ह्या प्रश्नाकडे फार गंभीरपणे पाहण्याची गरज नाही. तो उपेक्षित माणूस असावा.’

दुसऱ्या दिवशी ओंकारनाथ आपल्या केबिनमधे आले आणि बघतच राह्यले. त्यांच्या टेबलावरच्या प्लॅस्टिकच्या फुलांच्या ठिकाणी निशिगंधाची टवटवीत फुलं होती. त्यांच्या मंद सुगंधानं केबिन शहारली होती. ताज्या फुलांनी जरी नसलं तरीही वेगळेपणापायी ओंकारनाथांना हलकं वाटलं. आदल्या दिवसाचं सावट काहीसं दूर झालं. हे काम सायराचं ह्यात वादच नाही. ह्या फुलांच्या रूपानं, ‘आपण तिला आवडतो.’ हे तिला सुचवायचं असेल का ?

विचारलं पाह्यजे. तर्क करायला हा शेअर बाजार नाही. निम्मी फुलं आपल्याला देणं हे

शेअरींग आहे.

सायरा तशी फार मिडीऑकर नाही.

पेपर्सवर सह्या घेण्यासाठी सायरा आली, तेव्हा ओंकारनाथांनी विचारलं,

'फुलं तुम्ही आणलीत ?'

'आज मी आणली, उद्यापासून वेगळी व्यवस्था केली आहे.'

'एखाद्या व्यक्तीला फुलं देण्यामागचा संकेत तुम्ही जाणता ना ?'

रोख समजून सायरा म्हणाली, 'निसर्गासारखं टवटवीत राहण्याचा संदेश त्या माणसापर्यंत पोहोचावा, हा माझा वैयक्तिक संकेत आहे. निसर्गातील चैतन्याचं सर्वात छोटं प्रतीक म्हणजे फूल. एका फुलात पृथ्वीवरची सगळी जमीन उतरलेली असते.'

ओंकारनाथ हिरमुसले, ते पहिल्या वाक्यानं. नुसते हिरमुसले नाहीत, तर काहीसे चिडले सुद्धा. मनातल्या मनात त्यांनी पुनः तिला मिडीऑकर म्हणून घेतलं. पण नंतर त्यांना तिचं सांगणं संपू नये, असं वाटायला लागलं. सायरानं ते ओळखलं पण आणखी सगळं बोलावं की नाही, हे तिला कळेना. ओंकारनाथ म्हणाले, 'तुम्ही सांगता ते पटकन् समजत नाही, पण ऐकताना छान वाटतं.'

त्या फुलांना कुरवाळीत सायरा म्हणाली,

'फूल म्हणजे मातीचा हुंकार; पावसाच्या प्रत्येक थेंबाला दिलेला प्रतिसाद. म्हणून एक फूल एकदाच जन्माला येतं. टेलिफोनवरच्या प्रत्येक वाक्याला आपल्याला ऐकणाऱ्याकडून कमीत कमी 'हुंकार' हवा असतो, तसं. हुंकाराच्या अलीकडे उच्चारच संभवत नाही. ह्या फुलातला सुगंध म्हणजे आकाशतत्त्व.'

'का. आकाशच का ?'

'त्याला अंत नाही म्हणून. सुगंधाचा प्रारंभ आणि शेवट शोधता येत नाही. म्हणून वाऱ्याचा एक हलकासा झोका त्याला जिथपर्यंत नेईल तिथपर्यंत त्याचं आकाश. वारा म्हणजे जमीन आणि आकाश ह्यांचं मीलन अंकुरीत झालं हा संदेश माणसांपर्यंत नेणारा दूत. एका फुलात, मला इतकं दिसतं.'

ओंकारनाथ त्या सगळ्या कल्पनाविलासात काही काळ हरवले. इतके, की त्यांना वारा ह्याचं प्रयोजन ऐकूच आलं नाही. ते लगबगीनं म्हणाले,

‘वाऱ्याचं काय म्हणालात ?’

‘तुमच्या भाषेत सांगते, वारा म्हणजे पब्लिसिटी ऑफिसर.’

‘छे, तुम्ही काहीतरी वेगळं म्हणालात. मी जरा मधे ब्लँक झालो, सॉरी.’

‘त्यात काय मोठंसं, माझंही तसं होतं. एखादं आवडतं गाणं संपूर्ण. म्हणजे ओळ न् ओळ ऐकायची, असं मी ठरवते आणि ते गाणं संपल्यावर मला कळतं, की मी मधलं कडवं ऐकलंच नाही.’

इतकं सांगून सायरानं शांतपणे फाईल् सहीसाठी पुढे केली.

दुसऱ्या दिवशी ओंकारनाथांना त्यांच्या टेबलावर नेहमीची प्लॅस्टिकची फुलं दिसली. ते प्रथम काही बोलले नाहीत. पण त्यांची नजर सतत सायराच्या फ्लॉवरपॉटकडे वळत होती. मधेच काही कामाचे कागद घेऊन टिपणीस तिच्या टेबलापाशी गेली तेव्हा तिनं खाली झुकून त्या फुलांचा वास घेतला. प्रसन्नतेनं टिपणीसनं डोळे मिटले. दुसऱ्यांदा खाली वाकून तिनं त्या फुलांचं चुंबन घेतलं. ओंकारनाथांना सायराची कालची सगळी वाक्य आठवली. त्यांनी मग त्यांच्या, माना न टाकणाऱ्या प्लॅस्टिकच्या फुलांकडे पाह्यलं. माती, आकाश, मीलन, अंकूर, दूत ह्याऐवजी त्यांना त्या फुलात पॉलीप्रॉपिलान, पॉलिथिलीन, पॉलिएथिलीन एम. एच. डी. पी. इ. असले घटक दिसायला लागले. त्यांनी सायराला बोलावलं.

‘इफ् यू डोण्ट माइण्ड, ही फुलं तुम्ही घ्या आणि तुमची फुलं इथं माझ्या टेबलावर ठेवा-’

‘शुअरली-’

‘तुम्ही काहीतरी वेगळ्या व्यवस्थेबद्दल म्हणालात ते...’

‘हां, माझी एक मैत्रीण आहे, एवढ्यात यायला हवी. तिचा बिझीनेस आहे. मोठमोठया हॉटेल्समधून आणि प्रायव्हेट ऑफिसातून ती रोज फ्रेश फुलं घेऊन जाते. इकेबानाचा कोर्स केलाय. एक दिवसाआड ती फ्लॉवर-अॅरेंजमेण्ट करून जाते.’

‘अजून का आली नाही ?’

‘तुम्हाला त्या फुलांची ओढ निर्माण झाल्याचं मला जाणावल्याशिवाय ती कशी येणार ? तुम्ही आपण होऊन विचारलंत् तर मी फोन करणार.’

ओंकारनाथ घुटमळत म्हणाले,

‘तुम्ही तुमच्याप्रमाणे माझ्यासाठी रोज फुलं आणावीत असं मला वाटतं. तुमच्या त्या मैत्रिणीचा बिझीनेस आणि टेकनिक् मला मान्य आहे, पण ह्या फुलांच्या बाबतीत तरी किमान, बिझीनेस ट्रॅन्झॅक्शन नको.’

त्यानंतर दोनच दिवसांनी ओंकारनाथांनी ऑफिस सुटता सुटता सायराला बोलावलं. तिच्या हातातल्या पेपरमध्ये गुंडाळलेल्या फुलांकडे निर्देश करीत ओंकारनाथांनी विचारलं,

‘तुमच्या फुलांबरोबर ह्याही फुलांना समुद्रस्नान घडवाल का ? -येताना बरोबर आली तशी जाताना सोबतीनं जातील.’

सायरानं न बोलता सगळी फुलं एकत्र केली.

‘लेट अस गो टुगेदर, अर्थात तुमची हरकत नसेल तर. फक्त कुठे जायचं सांगा.’

‘कंपलसरी गेट-वेवर जावं लागतं. उरलेला सगळा किनारा राज्यकर्त्यांनी विकून टाकलाय. ह्या देशात खाणाऱ्यांना तोटा नाही. पहाल तिथं भेळपुरीवाले आणि खाणारी तोंडं. केवळ, त्या अथांग समुद्रासाठी कुणीच जात नाही. भरतीतल्या अनेक उसळणाऱ्या लाटा ह्या उपेक्षेपोटी असतील. ओहोटीसुद्धा अशा खाबू शहराचं दर्शन नको म्हणून येत असेल.’

पायऱ्या उतरून दोघंही जितकं समुद्राच्या सान्निध्यात जाता येईल, तितकी गेली. दहा मिनीटं दोघंही गप्प होती. सायरानं काहीतरी बोलावं ह्या अपेक्षेनं ओंकारनाथ तिच्याकडे पहात होते. तिचं समुद्राव्यतिरिक्त कुठेही लक्ष नव्हतं.

‘असंच गप्प बसायचं ?’

‘इथं आले की माझी अशीच अवस्था होते.’

‘कशी ?’

‘समुद्राचं ऐकावं, बाकी काही करू नये. ह्या विराट अस्तित्त्वाच्या समोर क्षुद्र वाटेल, असं सगळं टाळावं; स्वतःचा आवाजही ऐकू नयेस वाटतं, नेहमीच.’

‘आजच्या दिवस तुमचा नियम मोडा. मी तुमचं बोलणं ऐकण्यासाठी आलो. ऑफिसात

बोलता तसं काहीतरी.'

'ऑफिसची गोष्ट वेगळी.'

'कशी काय ?'

'ऑफिस म्हणा, घर म्हणा, तिथं वास्तुपेक्षा आपण मोठे असतो. मालकीचा अहंकार तिथं बोलतो. आपण क्षुद्र आहोत ह्याची जाणीव स्वतःला करून देण्यासाठीच समुद्राजवळ बसायचं असतं. निसर्गाची प्रत्येक निर्मिती भव्यच असते.'

'तरीसुद्धा, तुमच्या मते अतिभव्य काय ?'

'माणूस.'

'आता एवढ्यात तर तुम्ही क्षुद्र म्हणालात.'

'त्याची निर्मिती ह्या अर्थानं अतिभव्य. म्हणजे कसं ?-समोरच पहा. हा महासागर, ते क्षितीज, आकाश, मोजता येणार नाही. पण आपल्या एवढ्याशा डोळयाला ते दिसतं. रेटिना केवढास्सा, ब्रेनला संदेश देणारी ऑप्टिक नर्व्ह केवढीशी असेल ? -ती मेंदूला काय नेमकं सांगत असेल ? मेंदू हेच एक प्रचंड विश्व आणि त्याच्याही पलीकडे मन. प्रत्येक माणूस वेगळा आणि प्रत्येक माणूस एकदाच. महाभारताच्या आधीपासून तो माणसं घडवतोच आहे. पण रिपीटेशन नाही. डुप्लिकेशन नाही.'

ओंकारनाथ आश्चर्यानं सायराकडे पहात होते. त्यांना आता समुद्र दिसत नव्हता. सायराला समुद्र दिसत होता. ओंकारनाथांना अस्तित्त्व नव्हतं.

'एक विचारू ?'-हा प्रश्नही समोरच्या अथांग सागराकडून आल्यासारखा सायराला वाटलं. माणूस तर सागरापेक्षा अथांग, समुद्राच्या लाटांना शब्दरूप देणारा नाद.

'अवश्य.'

'तू एवढी विचारी, पंकजमध्ये कधी फसलीस ? कधी म्हणण्यापेक्षाही, कशी ?' -आपण सायराला 'ए' कसं म्हणालो, ह्याचं ओंकारनाथांना नंतर नवल वाटलं.

'तो आवडला म्हणून.'

'त्यानं फसवल्यावर सावरलंस कसं ?'

‘सर, पहिली गोष्ट म्हणजे त्यानं फसवलं नाही. तो त्याला झेपेल तसं वागला. कोणत्याही माणसाला फसवणारा दुसरा माणूस नसतो. कुणाची हिंमतच नसते. आपण गुलाम व्हायला तयार असतो, तिथं फसतो. कोणत्याही क्षणी आपण आपलं मालक असलो पाह्यजे.’

हे ओंकारनाथांना पटकन् समजलं. तरीही सायराचं वय आणि प्रेमभंगाचा फटका ही सांगड घालणं अवघड होतं. ते म्हणाले,

‘मिस् सायरा, हा तुमचा आजचा विचार झाला. आमच्या आयुष्यात प्रेम वगैरे भानगड नाही, पण तो भयानक अनुभव असला पाह्यजे.’

‘दोन ओळीत सांगते.

‘आग आहे इष्क, दुसरी काय उपमा द्यायची ! पेटुनियाही ह्यात नसते राख होऊ द्यायची.’

‘ग्रेट. असं कुणी म्हटलंय ?’

‘शायरीकार पाटणकरांनी.’

‘प्रेमात हे शक्य आहे का ?’

‘त्यालाही उत्तर आहे. पण तेही कवितेत.’

‘सांगा.’

‘उम्र जलवोंमें बसर हो

यह जरूरी तो नही

हर शबें गम की सेहेर हो

यह जरूरी तो नही

सबकी नजरों में हो साकी

यह जरूरी है, मगर

सबपे साकी की नजर है

यह जरूरी तो नही

इथं साकीचा अर्थ, परमेश्वर असा आहे.'

ओंकारनाथ म्हणाले, 'आम्हाला सगळाच अर्थ जरूरी आहे.'

सायरानं हसून तो अर्थ सांगितला. ओंकारनाथांनी अगदी मनापासून विचारलं,

'ज्या व्यक्तीवर आपण मनापासून प्रेम केलं, ती दुसऱ्याची झालेली तुम्हाला चाललं ?'

'सर, प्रेम ही एक शिडी आहे. तिचं एक टोक नरकाकडे असतं तर दुसरं टोक स्वर्गाकडे नेणारं असतं. प्रेमात अधिपत्याचा भाव आला की प्रवास खालच्या दिशेनं सुरू झाला, असं मानावं आणि प्रेमात संपूर्ण समर्पणाव्यतिरिक्त अन्य धारणा आली नाही तर ती वाट स्वर्गाकडे जाते. स्वर्ग म्हणजे आनंद आणि नरक म्हणजे मालकी हक्क, अहंकार. अहंकार म्हणजे स्वामित्त्व. स्वामित्त्व अट्टाहासानं मिळवता येत नाही. दुसरी व्यक्ती ते झुगारून देऊ शकते. मग त्याचं निर्माल्य व्हायला वेळ लागत नाही. समर्पण म्हणजे आनंद, प्रेमाचा महोत्सव.'

ओंकारनाथांनी मधेच विचारलं,

'महोत्सव कधी एकट्याला साजरा करता येतो का ? -कंपनी नको ?'

'कशाला ?' -सायरानं मुद्दाम विचारलं.

ओंकारनाथ म्हणाले,

'दिवाळीत साधी फुलबाजी लावतानाही, मित्र लागतो. फुलबाजीच्या आनंदापेक्षा जास्त आनंद, मित्राच्या हातातली फुलबाजी अगोदर संपली ह्याचा असतो.'

सायरा पटकन् म्हणाली, 'मान्य आहे. पण दुसऱ्यानं आपली ज्योत त्या दीपोत्सवात आपण होऊन लावायची असते. प्रेम करता करता त्या बेहोषीतही होष टिकवला तर दुसरी व्यक्ती समर्पणाचं माहात्म्य जाणते की भ्याडपणाने शिडीकडेच पाठ फिरवून पळते समजायला लागतं. शिडीपासून स्वतःचा बचाव करणारी नरकापासून जरूर वाचेल पण स्वर्गालाही वंचित होते.'

'पंकज कसा होता ?'

‘प्रथम क्रांतीकारक वाटला.’

ओंकारनाथांचा चेहरा बदलला तेव्हा सायरा म्हणाली,

‘क्रांती म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर लगेच झेंडा, लपवलेली हत्यारं असं काही काही येतं. स्वतःच्या विचारांप्रमाणे जगता येण्याचं स्वातंत्र्य म्हणजे क्रांती. स्वतःच्या कुटुंबातल्या माणसांना प्रेमानं किंवा विचार करायला लावून जिंकणं, ही सुद्धा क्रांतीच. पंकजसारख्यांना ती झेपली नाही. मी त्याला समर्पित झाले होते, संपूर्ण. त्याचा आनंद ही माझी प्रायॉरीटी होती. आकांडतांडव करून प्रेम मिळवता येत नाही. प्रेमापेक्षा पैशापुढे वाकणाऱ्या पंकजसारख्या माणसापासून मी मुक्त झाले, ह्या समाधानात तर मी आहेच. पण त्याच्या आनंदासाठी माझ्या प्रेमाची मी आहुती देऊ शकले, त्यामुळे माझ्यातल्या शक्तीचीही मला ओळख झाली. मी शिडी सोडली नाही, दिशा बदलली.’

‘ही तुमची भूमिका झाली, शक्ती समजू, पण पंकजला हे शोभलं नाही.’

‘जित्याजागत्या माणसांपायीच आपण कमजोर आहोत की बलवान, हे आपल्याला समजतं. निर्जीव वस्तूंकडून हे शिकता येत नाही. वस्तूंचा संग्रह जितका वाढवत न्यावा तितका अहंकार वाढत जातो. सगळे संतमहात्मे संग्रहाच्या विरुद्ध आहेत ते काय उगीच ? परमेश्वराचं नामस्मरण करता करता ते शेवटी परमेश्वराचीही मागणी करीत नाहीत.’

संध्याकाळच्या संधीप्रकाशातही लखलखीत प्रकाश पडतोय् असं ओंकारनाथांना वाटू लागलं. आता त्यांनाही सायरा दिसेना. फक्त समुद्र दिसायला लागला. ते हरवले.

‘निघू या ना ?’

सायराच्या प्रश्नानं ते भानावर आले.

‘जाण्यापूर्वी आणखी काही सांगा.’

सायरा म्हणाली,

‘माझ्या आठवणीप्रमाणे कबीराचाच दोहा आहे हा.’

‘माला फेरके जुग भयो

पंडीत हुआ न कोय

ढाइ अक्षर ‘प्रेम’ का पढे

सो पंडीत होय.'

सर, प्रेम म्हणजे अडीच अक्षरं फक्त. 'भक्ती' सारखीच, भक्ती म्हणजे प्रेमाची पुढची पायरी, इतकाच फरक.'

।। सात ।।

गेटवे वरच्या त्या संध्याकाळच्या प्रसंगांनंतर चार दिवसांनी एक वेगळा विष्य निघाला. सायरा नेहमीप्रमाणे सह्यांसाठी फाइल्स घेऊन आली आणि ओंकारनाथांनी रोजच्या सारखंच तिच्याकडे बॉलपेन मागितलं. सायरानं आज सरळसरळ ओंकारनाथांच्या टेबलावरचं इम्पोर्टेड बॉलपेन उचलून त्यांच्या हातात दिलं.

'ह्याचा सन्मान करा.'

नाखुषीने सह्या करून झाल्यावर ते म्हणाले, 'मिस् सायरा, ह्या क्रॉस पेनसेटची आज मुंबईत अडीच ते तीन हजारापर्यंत नक्कीच किंमत असेल. आजकाल पार्कर, शेफर्सना कुणी विचारीत नसेलही. म्हणून मी...'

सायरा मधेच म्हणाली, 'शो-पीस म्हणून टेबलावर ठेवता. का ? तर टेबलावर कायम तीन हजार रुपये ठेवता येत नाहीत म्हणून ?'

ओंकारनाथांनी नुसतं सायराकडे पाह्यलं.

'आय् अॅम सॉरी.'

'बोला, तुम्हाला आणखीनही काही ऐकवायचं असेल.'

'खूप छान काहीतरी सांगायचं आहे.'

'माझ्यावर काही बेतलेलं नसेल तर जरूर ऐकवा.'

'माणूस कोणताही विचार नाकारू शकतो, तेव्हा त्यानं ऐकण्यावर बंधन घालून घेऊ नये, असं मला वाटतं. ऐकलेलं अंमलात आणलंच पाह्यजे, अशी सक्ती नाहीए म्हणून दासबोधाच्या इतक्या आवृत्त्या निघतात.'

ओंकारनाथ गप्प राह्यले. सायरा तशीच निघाली.

'अरे सांगा ना, नुसतं मधाचं बोट काय लावता ?'

सायरा थांबत म्हणाली,

‘मधाचं बोट म्हणालात ना ? आता सांगते सर.’

‘व्यवस्थित बसा आणि सांगा. क्षणभर थांबलो ते एवढ्यासाठीच की विचार केला, आत्ता ऐकावं की संध्याकाळी गेटवेवर ऐकावं ?’

तोपर्यंत सायरा समोर बसली.

‘एक संन्यासी आणि त्याचा शिष्य यात्रेला निघाले होते. गावोगावी जायचं. धर्मशाळा दिसली की मुक्काम करायचा. कधी भजन, कधी प्रवचन, कधी विषयावर चर्चा, असं चाललं होतं. हिमालयात जाऊन स्थायिक व्हायचं, असा विचार. एका गावात, अशाच एका धनिकानं त्यांचा आदरसत्कार करून, त्यांना एक छोटीशी सोन्याची वीट भेट दिली. त्या संन्याशानं ती सन्मानपूर्वक परत केली. पण शिष्यानं मोह न आवरून, गुरूचं न ऐकता ती वीट ठेवून घेतली. तेव्हापासून शिष्याचं ध्यान-धारणा, प्रवचन सगळ्यातून लक्ष उडालं. चोवीस तास सोन्याची वीट ठेवलेल्या झोळीचा ध्यास. कापडावर कापडं गुंडाळून ती वीट झोळीत ठेवलेली. धर्मशाळेत मुक्काम पडला की त्याची झोप उडायची. बाहेरून हात लावून, जातायेता त्या गाठोड्याला स्पर्श करून, तो स्वतःशी हसायचा. एके दिवशी संधी साधून, त्या गुरूनं ती वीट फेकून दिली. शिष्याला पत्ता लागला नाही. कारण गुरुनं त्याच आकाराचा फरशीचा तुकडा त्याऐवजी ठेवला होता. मधे सहा सात महिने गेले. एके दिवशी त्या शिष्याला तो सोन्याचा तुकडा पहावासा वाटला. त्यानं गाठोडं सोडलं आणि तो आक्रोश करायला लागला. गुरूनं समजावलं, ‘आपण संसाराकडे पाठ फिरवलेली माणसं, धनलोभ कशासाठी ? आता ऐक. सोन्याची वीट मी सहा नव्हे-आठ महिन्यांपूर्वी फेकून दिली.’ शिष्यानं विचारलं, ‘ह्याचा अर्थ हा फरशीचा तुकडा मी सोन्याचा समजून इतके महिने ऐटीत हिंडलो का ?’ असं म्हणून तो पुनः आक्रोश करू लागला. मग गुरूनं विचारलं, ‘आपल्यापाशी सोनं आहे ह्या केवळ कल्पनेवर जर तू आठ महिने राहू शकतोस तर उरलेले दिवस घालवू शकणार नाहीस का ? तू अकारण ओझं फिरवत होतास, मला ते बघणं अशक्य झालं. त्यापेक्षा दहाच्या दहा बोटात अंगठया तरी करायच्या होत्यास.’ शिष्य जे समजायचं ते समजला.’

त्यानंतर एका आठवड्यानं टिपणीस सायराला म्हणाली, ‘एक गंमत सांगते. खूप खास आहे अशातला भाग नाही. वेगळी आहे म्हणून सांगते. आपला साहेब सही मागायला जाणाऱ्याचंच बॉलपेन जातायेता मागतो. तुला माहितच आहे. पण गेल्या आठ दिवसांत त्याची ती खोड गेली. सरप्रायझिंग.’

सायरानं आश्चर्यानं पाहिल्यावर टिपणीस म्हणाली,

‘तो क्रॉसचा सेट वापरायला लागला.’

दुसऱ्याच दिवशी ऑफिसच्या पोर्चमधे इम्पाला पाहून सायरा चक्रावली. ह्या जाग्यावर ओंकारनाथांव्यतिरिक्त अन्य कुणाची गाडी उभी करायची नाही, हा दंडक होता. वॉचमन आपण होऊन म्हणाला, 'साहेबांचीच गाडी आहे.'

ऑफिसात येताक्षणी सायरानं साहेबांना विचारलं,

'सर, खाली तुमच्या गाडीच्या जागेवर...'

'माझीच गाडी आहे.'

'मग ती फियाट...'

'मिस् सायरा, तुमच्या त्या संन्यासी आणि सोन्याची वीट, ह्या कथेवर मी आठ दिवस विचार करीत होतो. ते थांबता थांबेनात. शेवटी इम्पाला चालू झाली तेव्हा विचार थांबले. आयुष्य काढणं आणि जगणं, ह्यात खूप फरक आहे.'

ओंकारनाथांमध्ये इतका फरक पडलेला पाहून, पुष्कळ दिवसांपासून मनात असलेला एक प्रश्न सायरानं विचारला,

'सर, एक रिक्वेस्ट करू ?'

'अवश्य.'

'माझ्या परिचयातल्या काहीजणांना मला पार्टी द्यायची आहे. पण माझ्या घरी तेवढी जागा नाही आणि जी आहे ती डीसेण्ट नाही. एकूण एक खर्च माझा, फक्त जागा तुमची.'

'इटस् माय प्लेझर, त्यापूर्वी घर तर बघायला या.'

'आय फील ओब्लाइज्ड.'

नेहमीप्रमाणे चहाची वेळ झाल्यावर ओंकारनाथांनी बेल् वाजवली. ओंकारनाथांच्या शिपायानं चहाचा सुरेख ट्रे समोर आणून ठेवला. ओंकारनाथांनी विचारलं,

'हे काय ?'

'सायराबाईंना विचारा.'

सायराला आमंत्रण अपेक्षितच होतं.

‘हा काय प्रकार आहे ?’

‘आवडला नाही का ?’

‘तसं नाही, पण...’

‘इम्पोर्टेड कारमधून फिरणाऱ्या, स्वतःचं संपूर्ण ऑफिस असणाऱ्या माणसानं, ग्लासातून चहा प्यायचा म्हणजे....तुमच्या कधी मनातही आलं नाही ? मला खटकतं ते. टी बॅग्ज, साखर, मिल्क पावडर, सगळं आणून ठेवलंय, अर्धा डझन कपबशाही आणल्या आहेत. आजपासून हवा तेव्हा चहा इथंच होईल.’

‘कोण करणार ?’

‘माझ्यासकट सहा लेडीज इथं आहेत. शिवाय शिपायाला शिकवलाय.’

‘तू...तुम्ही म्हणजे....’

‘कपबशा आवडल्या का तेवढंच सांगा.’

‘बोन चायनाचा सेट कुणाला आवडणार नाही ? तरीही लहानपणाचे संस्कार...’

‘चांगले असतील ते जपावेत. वर्तमानकाळाच्या आड येतील ते सोडावेत. इतपत क्रांती पेलेल ना ?’

बड्याबड्यांच्या गाड्या समोर उभ्या राह्यलेल्या पाहून ओंकारनाथ चक्रावले. पण ह्याच गाड्या पाहून विनीताला समाधान वाटेल, हेही ओंकारनाथांना वाटलं. सायराला त्यांनी संमती दिली त्याच दिवशी ओंकारनाथांनी, आपल्या घरी पार्टी असल्याचं सांगितलं होतं.

‘घरी का ? हॉटेलात का नाही ?’

‘मी तसा शब्द दिलाय.’

‘कुणाला ?’

‘सायराला.’

त्यानंतर 'सायरा' कोण वगैरे फार सांगावं लागेल असं ओंकारनाथांना वाटलं. हीच ती नकारघंटावाली, हे विनीतानं ओळखलं.

चला त्या निमित्तानं ती बया दिसेल. 'पण हिला शब्द देण्याचं कारण काय ?'

विनीतानं तसं विचारताक्षणी उत्तर मिळालं.

'तिची जागा एवढी चांगली नाही, पार्टी तीच देणार आहे.'

'पार्टी तिची आणि जागा आपली. असंच ना ?'

'येस.'

'त्या सगळ्या वीस-बावीस माणसांचं करणार कोण ?'

'सगळी जबाबदारी तिची.'

'ही सायरा कोण ?'

'माझी स्टेनो-सेक्रेटरी; सबकुछ.'

विनीताचा पुढचा प्रश्न तयार होता.

'ह्या सबकुछमध्ये काय काय आहे ?'

'तुला जेवढ्या गोष्टी बसवता येतील तेवढ्या सगळ्या, कळलं ?'

'कळलं. आपल्या घराचा राडा झालेला मला खपणार नाही, हे तिला सांगा.'

'आणखी काही ?'

'मला काहीही करावं लागता कामा नये.'

'तुझ्याकडून मी कसलीच अपेक्षा आजवर केली नाही.'

'नवराबायकोचं नातं असंच निरपेक्ष असावं.'

विनीताकडून हे विधान ऐकल्यावर ओंकारनाथांच्या अंगावर शहारा आला.

‘पक्षांतर करणं वाईटच हे निवडून येऊन पार्टी बदलणाऱ्या उमेदवारानं म्हटल्यासारखं ओंकारनाथांना वाटलं. हे वाक्य सायराला शोभलं असतं. खरंच ‘कोण बोलतं ?’ ह्याला फार वजन आहे.

बड्याबड्यांच्या गाड्या दिसल्यावर विनीता आपण होऊन, नटूनथटून ओंकारनाथांशेजारी येऊन स्वागतासाठी उभी राहिली. नटूनथटून हे तिला कधीच सांगावं लागत नसे. ‘थटून’ किंवा ‘नटूनथटून’ ही दोन रूपं तिला माहीत होती. दोन तास अगोदर, पूर्वतयारीसाठी आलेल्या सायराचा चेहरा पाहून, आपल्या घरी आता झोपडपट्टीतली, किंवा एखाद्या मोहोल्ल्यातली माणसं कोसळणार असं विनीताला वाटलं होतं. ओंकारनाथ पण चक्रावले होते. कारण निमंत्रितांपैकी बरीचशी मंडळी त्यांच्या व्यवसायातली होती. त्यांच्यापैकी सातआठ जण आठवड्यातून दोन-तीन वेळा तरी हटकून ह्या ना त्या पार्टीत भेटत असत. गिरीश सावंतनं तर मिठीच मारली.

‘आय् वॉज शॉक्ड.’ शेकहॅण्ड करीत तो, हात न सोडता म्हणाला.

‘का बुवा ?’

आमंत्रणपत्रातल्या दोनतीन ओळींखाली गिरीशनं लाल रंगाची रेघ मारली होती. ओंकारनाथांनी त्या ओळी वाचल्या.

‘फॉर इअर्स टुगेदर, अवर अॅक्वेन्टन्स वॉज रिस्ट्रिक्टेड टू अवर बिझीनेस ट्रॅन्झॅक्शन्स ओन्ली, वुईच् वॉज पिंचिंग मी. ऑन धिस् ऑकेजन, लेट अस् मीट अॅण्ड वर्क लाईक अ फॅमिली. लेट् द टू स्ट्रीम्स मीट.’

मनातल्या मनात ‘धिस् इज सायरा.’ असं म्हणत ओंकारनाथ वरकरणी म्हणाले,

‘अरे बाबा, किती तरी दिवस हे माझ्या मनात होतं.’

तेवढ्यात कामत म्हणाला,

‘तू बाईले घेऊ येतलो म्हण खबर नाशीले.’

‘मराठीत बोल बाबा.’

‘बायकोसहित आमंत्रण करशील, असं वाटलं नव्हतं.’

‘अच्छा, बाईले म्हणजे बायको काय ? मला वाटलं बाई.’

तो प्रासाद बांधल्यावर आज प्रथमच गजबजला असावा. विनीता मिरविण्याचं काम करीत होती. सायरा फक्त काम करीत होती. विनीतानं साड्यांच्या कपाटापासून ज्या ज्या पद्धतीनं ऐश्वर्य आणि संग्रह ह्यांचं दर्शन होईल त्या त्या गोष्टी दाखवल्या. सायराला महत्त्व देण्याचं कारण नव्हतं. ती एक नोकर, सेक्रेटरी हे तिचं आडनाव फारतर.

तेवढ्यात कुणीतरी म्हटलं,

'ओंकारजी, बाकी सगळा रुबाब आहे. पण सेक्रेटरी त्यामानानं शोभत नाही तुला.'

'तेच बरं नाही का ?' -कुणीतरी परस्पर चॅप्टर मिटवून टाकला आणि विनीताकडे पाह्यलं. ती म्हणाली,

'ह्यांनी कुणाशीही अफेअर केलं तरी आपली हरकत नाही.'

'अशी बायको हवी.'

'अरे बाबा, ज्यांची अफेअर करायची हिंमत नसते, अशांनाच हे सांगणाऱ्या बायका मिळतात.'

ओंकारनाथांना 'अरे-तुरे' करू शकणाऱ्या मित्रानं म्हटलं,

'ओंकारचं अफेअर कुणाबरोबर आहे ते मला माहित आहे.'

'जरूर सांगा.' विनीता म्हणाली.

'प्रॉपर्टीशी.'

'असो, सायराशी नाही ना !'

'तिच्यात आहे काय ?'

गेट-वे डोळ्यासमोर आलं. सायराची विचारांची झेप ओंकारनाथांना उंच घेऊन गेली आणि पटकन् म्हणाले,

'शी इज् व्हेरी ब्युटिफूल.'

चारपाचजणांचे प्रश्नांकित चेहरे पाहून गिरीश म्हणाला,

‘लैलाको देखनेके लिये मजनूकी आँखे चाहिये.’

नंतरच्या टाळ्यांसकट सायरानं हे सगळं ऐकलं, पण तसं न दर्शविता तिनं विनीताला विचारलं,

‘डिशेस् हव्या होत्या.’

विनीतानं सायराच्या हातात पेपरडिशेस् ठेवल्या. सायरानं आश्चर्यानं विचारलं,

‘मेलॅमिनचा डिनरसेट चांगला दिसतो.’

विनीता उपहासानं म्हणाली,

‘बोन-चायना वापरण्याची ऐपत असताना मेलॅमिन कशाला ? पण ह्या गर्दीत त्या सांभाळायच्या म्हणजे...’

तेवढ्यात ओंकारनाथ पुढे आले आणि त्यांनी शोकेसच्या किल्ल्याच सायराच्या हातात ठेवल्या.

बाहेरच्या निमंत्रितांबरोबर, ओंकारनाथांच्या स्टाफसमोर हे सगळं घडलं, तरीही सायरा विचलीत झाली नाही.

पार्टी रंगात आली आणि अचानक झालेल्या एका आवाजामुळे सगळ्यांच्या गप्पा थांबल्या. गिरीशच्या हातातून बशी पडली. फुटली. काश्मिरी गालिचावर पदार्थ विखरून पडले. सायराकडे आणि फुटलेल्या बशीकडे आळीपाळीनं पाहात विनीता सायराला म्हणाली, ‘एवढ्यासाठीच पेपरडिशेस् वापरायच्या असतात.’ इतकं बोलून तिचं भागलं नाही. ती सरळ पार्टी सोडून बेडरूममध्ये गेली. पार्टीचा मूड जातोय म्हटल्यावर सायरा पुढे आली. तिनं सगळ्यांना हातानं खूण केली आणि एक कवितेचा चरण ऐकवला.

‘जीवनमें मधु का प्याला था
तुमने तनमन दे डाला था
वह टूट गया तो टूट गया
मदिरालयका आँगन देखो
कितने प्याले हिल जाते है
गिर मिट्टीमे मिल जाते है
पर बोलो, टूटे प्यालोंपर

कब मदिरालय पछताता है ?
जो बीत गयी,
सो बात गयी.'

टाळया वाजल्या, कुणीतरी म्हणालं,

'और कुछ सुनाइये,'

मैफलीचा एक जाणकार म्हणाला,

'इर्शाद.'

त्याला मुजरा केल्याचा अभिनय करीत त्यालाही टाळया घेत सायरा पुढे म्हणाली,

मृदुमिट्टीके है बने हुए
मधुघट फूटाही करते है ।
लघु जीवन लेके आये है
प्याले टूटाही करते है ।
फिरभी मदिरालय के अंदर
मधु के घट है, मधुप्याले है ।
जो मादकता के मारे है
वो मधु-लुटाही करते है ।
जिनकी ममता घट-प्यालोंपर
वो कच्चा पीनेवाला है ।
जो सच्चे मधु से जला हुआ
कब रोता है, चिल्लाता है ?
जो बीत गयी
सो बात गयी।

।। आठ ।।

त्यानंतर चारच दिवसांनी गिरीश सावंत अचानक ओंकारनाथांच्या ऑफिसमधे आला. सायरा डिक्टेशन थांबवून बाहेर जायला लागली. गिरीश गडबडीनं म्हणाला,

'बसा, बसा, मी लगेच जाणार आहे.'

गिरीशच्या मागे त्याचा शोफर उभा असावा. त्याच्या हातात एक भला मोठा बॉक्स होता. तो त्यानं ओंकारनाथांच्या टेबलावर ठेवला. ओंकारनाथ आणि सायरा आश्चर्यानं पाहात राहाली. गिरीश फुलला होता. त्याचे डोळे आनंदानं चमकत होते. सायराला तो आनंद, नजरेतला उत्सव पाहून असं वाटलं, एखाद्या सुगंधी झाडाप्रमाणे निसर्गानं माणसाला वरदान का नाही दिलं ? तसं असतं तर ह्याक्षणी गिरीशच्या सर्वांगातून मोगऱ्याचा सडा पडला असता. ओंकारनाथांनी काही विचारण्यापूर्वीच गिरीश म्हणाला,

'सगळी मुंबई ह्या चार दिवसात पिंजून काढली. मोठ्ठाली दुकानं पालथी घातली आणि हा सेट शेवटी एका साध्या दुकानात मिळाला. सेम पॅटर्न.'

'डिझाइन तुमच्या ध्यानात होतं ?' -सायरानं हे विचारताक्षणी गिरीशनं कोटाच्या खिशातून फुटलेल्या बशीचा तुकडा, सँपल म्हणून नेलेला दाखवला.

'अरे बाबा, सेटमधील एक बशी फुटली तर त्याचं इतकं काय ?'

'आपला एवढा साडेतीन हात देह, पण पायाच्या करंगळीचं नख जरी जास्त कापलं गेलं तरी सगळं शरीर ठणकत असतं, त्याप्रमाणे संपूर्ण सेटमधला एखादा पीस जरी फुटला तरी मग संपूर्ण सेट जखमी होतो. चलता है. वहिनींना नमस्कार सांगा.'

इतकं सांगून गिरीश बाहेरही पडला. ओंकारनाथ त्या बॉक्सकडे आणि बॉक्सवर ठेवलेल्या फुटलेल्या तुकड्याकडेच पहात होते. एखाद्या मुलाप्रमाणे भेदरले होते. मग ते जरा सावरले. इंटरकॉमवरून त्यांनी चीफ अकाउंण्टण्ट सरवटेंना बोलावलं.

'गिरीश सावंताची इनव्हॉइस व्हाउचर्स केलीत का ?'

'तीच करतोय.'

'फायनल् बिल् पाठवाल तेव्हा दोन हजारांचा डिस्काउण्ट वाढवून पाठवा.'

सरवटे गेले. ओंकारनाथ जरा सैलावले.

'सर....' सायरानं अशा सुरात हाक मारली की त्यामुळे ओंकारनाथ कावरेबावरे व्हावेत. त्यांनी तिच्याकडे बघायचं टाळलं. सायरा न बोलता निघाली. तिच्या संभाव्य कॉमेण्टस्पेक्षा तिचं गप्प राहणं जास्त काळ मागे रेंगाळणार ह्याची धास्ती वाटून ते म्हणाले,

'तुम्ही काहीतरी विचारणार होतात का ?'

-सायरा घुटमळत म्हणाली,

'न विचारता समजलं म्हणून जाते.'

'काय समजलं ?'

'सर, तुमची नजर जेव्हा बॉक्सवर होती तेव्हा मी मि. सावंतांच्या डोळ्यांतून फुलांचा सडा सांडताना पहात होते. आपल्या दोघांत इतकं अंतर आहे. माझं बोलणं तुमच्यापर्यंत पोहोचणार नाही.'

'म्हणजे काय ?'

'आनंदाश्रूंची व्हाउचर्स फाडता येत नाहीत सर.'

'जस्ट अ मिनिट...'

सायरा थांबली.

'तुम्हाला नेमकं काय म्हणायचं आहे ?'

'गिरीश व्यापारी आहे. तुम्ही दिलेल्या सवलतीचा अर्थ त्याला समजणारच. तो तुमची तेव्हा किती कीव करील ते लक्षात येऊन मी न बोलता निघाले होते. हा डीनर सेट जसा तुम्हाला महाग नाही, तसाच गिरीशलाही. पण तुम्हाला जे प्रचंड प्रमाणात महाग आहे, न परवडणारं आहे, ते गिरीशनं जाताजाता केलं. मधमाशीला फुलांनी सहजी मध द्यावा तसं.'

ओंकारनाथांनी नुसतं वेगळ्या नजरेनं पाह्यल्यावर सायरा म्हणाली,

'तुम्हाला प्रेम परवडत नाही, म्हणून तुम्ही गिरीशच्या नजरेतल्या महोत्सवाला पारखे

झालात.'

ओंकारनाथांनी बेल् वाजवली. समोर आलेल्या शिपायाला परस्पर परतवून सायरा म्हणाली,

'दोन हजारांची सवलत देणं न देणं सर, दोघांनाही गौण आहे. त्यापेक्षा, आपण प्रेमाला इतकं का घाबरतो ह्याचा शोध घेणं मला जास्त जरूरीचं वाटतं. जगातला सर्वोच्च आनंद निर्भयतेत आहे आणि माणसाला निर्भय करण्याचं सामर्थ्य फक्त प्रेमात आहे. सर, फक्त अडीच अक्षरं प्रेम आणि भक्ती.' भावना अनावर झाल्यानं सायराला भक्ती हा शब्दही स्पष्ट उच्चारता आला नाही. ती आपल्या केबिनमध्ये न जाता सरळ ऑफिसच्या बाहेर पडली. समोरच्या डिनरसेटच्या बॉक्समधे आपलेच तुकडे होऊन पडलेत असं वाटून ओंकारनाथांनी डोळे मिटून घेतले.

दोन दिवस सायरा कामावर आली नाही. तिनं सरवटेंना फोनवरून तसं कळवलं. समोरचा फ्लॉवरपॉट रिकामा होता. 'चैतन्य' ह्या शब्दाचा खरा अर्थे दोन दिवस ओंकारनाथांना जाणवत राह्यला. सतत डोळ्यांसमोर सायरा दिसू लागली. ती काहीतरी ऐकवत आहे असा भास होऊ लागला. तिच्या स्पष्ट, क्वचित परखड, कायम आपल्याला निरुत्तर करणाऱ्या अहंकाराला डिवचणाऱ्या बोलण्यात काहीतरी झपाटून टाकणारं आहे. ते बोलणं ऐकताना तिचा राग येत होता की स्वतःचा हे कोडं सुटलं नाही.

आपण खरोखर प्रेमाला घाबरतो का ? प्रेम करायला घाबरतो की स्वीकारायला ? का दोन्हीला ? प्रेम म्हणजे नेमकं काय ? आपण विनीताला रोज दोनतीनदा. 'तुझ्याशिवाय मी जगू शकणार नाही-' असे ऐकवतो. हे प्रेम का ? आता तर इथं आपण विनीताशिवाय जिवंत आहोत. दिवसाच्या चोवीस तासांपैकी वीस तास तर आपण तिच्यावाचून जगतो. ऑफिसात आल्यावर तर विनीताची आठवण सुद्धा होत नाही. आपण रोज तिला जवळ घेतो आणि नेहमीचं वाक्य ऐकवतो. ओंकारनाथांनी आत्ताही ते सरावाचं वाक्य उच्चारलं आणि तसं करताना हातांनी बोटं मोडून शब्द मोजले.

चौदा अक्षरं.

छे. जोडाक्षर धरून साडेचौदा अक्षरं. ह्यात 'प्रेम' ही अडीच अक्षरं आहेत ? प्रेम नाही. भक्ती तरी ? -सायरा म्हणते. प्रेमाची वरची पायरी म्हणजे भक्ती.

ओंकारनाथ कावरेबावरे झाले. आपल्याला सायराची आठवण आली. रात्री झोप येतायेता फटकन् पर्वा न करता विनीता खोलीतला दिवा लावते. तशी सायराची आठवण कोसळली.

आठवण म्हणजे प्रेम ?

स्मृती म्हणजे भक्ती ?

आपण तिला आवडल्याचं तिनं अजून नाही सांगितलं. आपल्याला शब्द हवाय. का पण ? सनीला कुठे बोलता येत होतं ?

तरी आपण त्याला विकलं, तो प्रेम मागत नव्हता. विनीताच्या खांद्यावर निर्विकारपणे थोपटतो तसं नुसतं त्याच्या मानेखाली गोंजारलं तरी तो हॉलभर नाचायचा. तो प्रेमाचा वर्षाव करत होता. आपल्याला ते निरपेक्ष प्रेम पेललं नाही. आपल्याला गिरीश समजला नाही. विनीता म्हणाली, 'ही हॅज डन् हिज ड्यूटी'

गिरीशचं प्रेम आपण दोन हजारात तोललं आणि सायरानं 'हो' म्हटलं नाही तर आपण तिला त्यादिवशी फोन केला.

आपल्याला काय हवंय ?

आपल्याला सायरा हवी आहे का ? ती तर आहेच. आपली सेक्रेटरी, म्हणजे नोकरच. सेक्रेटरी हा मोठा शब्द. पादुका म्हणजे पादत्राण. पायात घालायची वस्तू.

नो. मन किती भरकटत जातं. साधना करून विश्वाचं रहस्य ओळखणारा महात्मा त्याच्या चपला स्वतःच्या डोक्यावर ठेवणार नाही. ज्या पादत्राणावर समाजाला माथा टेकवावा असं वाटलं, त्याच्याच पादुका होतात. सायरा इज सेक्रेटरी, बेल् वाजवल्यावर ती धाव घेते. तिनं बेल वाजवल्यावर आपल्याला जावं लागत नाही. बेल् टेबलावरची असेल किंवा इंटरकॉमची असेल. शेवटी बेल्ची व्याख्या काय ? -एक नाद.

ह्या विचाराशी, केवळ 'नाद' ह्या शब्दाशी त्यांना ठेच लागली. 'नाद' ह्या शब्दाचं नातं ध्वनीशी असेल तर ठीक, पण त्या शब्दाची सोयरीक 'छंद' ह्या वृत्तीशी-वेडाशी जमली तर ? -

सायरा...सायरा...असं का दोन दिवस होतंय ? छे, सगळ्या बेल्स दिसतातच असं नाही. तरीही ही अदृश्य बेल. सायरा का हवी आहे ते सांगत नाहीये. इंटरकॉम बेल् स्टेनोग्राफर सायराला बोलवते. ही मनातली न थांबणारी बेल् काय मागत आहे ?

सायराचा स्पर्श ? शरीर ? -रूप ?

नो. शी इज् मिडीऑकर.

आपण तिचा विचार करीत आहोत की तिच्या विचारांचा विचार ? नाद कसला लागलाय ?

ओंकारनाथांनी स्वतःच्या मनाची कस्टम ऑफिसरप्रमाणे झडती घेतली. तिथं त्यांना वासनेचा लवलेश आढळला नाही. सायरा सौंदर्यावर त्यांना जिंकूच शकणार नव्हती. मग ओढ कसली लागली आहे ? तिनं विचारांच्या बळावर जिंकलं.

आपण सगळं मिळवलं. म्हणजे काय ? उदंड पैसा. त्याच्या जोरावर सुंदर पत्नी, तरीही काहीतरी हरवलं होतं. पुष्कळ दिवस काही हरवलं आहे, हेच माहीत नव्हतं. काहीतरी हरवलं आहे हेही सायरानं दाखवून दिलं, तेव्हा समजलं आणि तिचे वेगवेगळे विचार ऐकल्यावर काय हरवलं आहे, ते नेमकेपणानं समजलं.

हरवलेली गोष्ट देण्याची तिची जी धडपड चालली आहे त्यासाठी आपली ही तडफड होत आहे.

पूर्वी केव्हातरी थ्री-डायमेन्शनल चित्रपट लागला होता. तो पाहण्यासाठी प्रेक्षकांना एक चष्मा देत असत. तो लावला नाही तर पडद्यावर दोनतीन रंगात काहीतरी हालचाल जाणवायची, पण पत्ता लागत नसे. चष्मा लावताक्षणी सगळा पडदा जिवंत होत असे. सायरा भेटली आणि चित्र स्पष्ट झालं. आपली कोणती भूक अपूर्ण राहिली होती ते समजलं.

आणि ही दोन दिवस कामावर आली नाही. सायरा नोकरी सोडेल का ? माणूस आत्मवान् आहे तेव्हा त्यानं आत्म्यापेक्षा खालच्या पायरीवर उतरू नये. सायराला अजून आपण प्लॅस्टिकच्या फुलांसारखेच वाटतो का ? मग निसर्गात परतत्त्व शोधणारी ही पोरगी इथं कशी रमणार ?

आत्मा वगैरे भानगड आपल्याला आयुष्यात समजणार नाही.

मन तरी समजलंय का ?

आपण सनीला विकून टाकलं आणि विनीताला साडेचौदा अक्षरं ऐकवतो.

आपण प्रेमाला घाबरतो. मग सायराची ओढ वाटते, त्याला कोणतं नाव द्यायचं ?

आयुष्यात इतका विचार भावनात्मक पातळीवर करायची ओंकारनाथांना सवय नव्हती. व्यावहारिक जगाचे ते सम्राट. सोळा असिस्टंटस्च्या ठिकाणी चोवीस माणसं. काही कामचुकार माणसांचं प्रमाण गृहीत धरूनच हा जास्तीचा स्टाफ ठेवलेला. मोजकी

माणसं नेमून त्यांना शिस्त वगैरे लावण्यात वेळ कोण घालवणार ? ऐपत आणि ऐदीपणा, 'गोज हॅण्ड इन हॅण्ड.' व्यवहारात चोख म्हणवणारी माणसं कधीकधी बेहिशोबी होतात, ती डोक्याला तेवढाही शिणवटा नको म्हणून. हाताखालच्या चोवीस माणसांनी एकमेकांत, कामं चुकवण्याचं बेमालूम शेड्यूल आखलं होतं. साहेबाची बेल् वाजली की कोणी ना कोणीतरी समोर उभं राह्यलं की झालं. सायराचं आगमन झाल्यापासून मात्र चित्र बदलायला लागलं होतं. सायराजवळ समोरच्या व्यक्तीशी बौद्धिक आणि भावनात्मक पातळीवरचा संवाद साधण्याची क्षमता होती आणि तरीही ऐकणाराचा रथ सहा इंच अधांतरी चालवण्याची ताकद होती. स्केटींग करणाऱ्या माणसांना एरवी नुसतं चालताना जसं कंटाळवाणं वाटत असेल, त्याप्रमाणे सायराच्या गैरहजेरीपायी बहुतेकांना तसं वाटत होतं.

विचार करून करून ओंकारनाथ थकले. कावले. त्यांनी सरवट्यांना बोलावलं. सरवट्यांनी दांडी मारली होती. ओंकारनाथांनी पाच मिनीटं ऑफिस डोक्यावर घेतलं आणि ते चिडून, लिफ्टनं खाली आले.

लिफ्टच्या बाहेर पडले तर समोर सायरा.

'गुड् मॉर्निंग सर.'

ओंकारनाथ तिला जाणवावं म्हणून म्हणाले,

'गुड् आफ्टरनून.'

तिकडे लक्ष न देता सायरानं विचारलं,

'शेअर बाजारात जाताय का ?'

'माझा मी स्वतंत्र आहे, मी कुठेही जाऊ शकतो. समजलं ?'

'मीही स्वतंत्र आहे. मे आय अॅकंपनी यू ?'

ओंकारनाथांनी गाडीचा दरवाजा उघडला. सायरा दुसऱ्या बाजूला थांबली म्हणून ते दार त्यांना आतून उघडावंच लागलं. मात्र एक अक्षर न बोलता त्यांनी गाडी सुरू केली. सिग्नलपाशी गाडी थांबवावी लागल्यावर सायरा खिडकीबाहेर पाहून हसायला लागली. ओंकारनाथांचं लक्ष होतंच.

'हसायला काय झालं ?'

‘आपल्याला वाटतं तितके आपण स्वातंत्र नसतो.’

सिग्नल हा रहदारीचा एक भाग आहे. तो मिळाला की पुढे किंवा कुठेही जायला मला पोलिसची परवानगी लागणार नाही. मी सिनेमाला जाऊ शकतो. बागेत जाऊन बसू शकतो.’

सायरा जास्तच हसायला लागली. ओंकारनाथांनी प्रश्न विचारण्याऐवजी गाडी फुटपाथपाशी उभी केली. ते ओळखून सायरा म्हणाली,

‘तुम्ही सिनेमाला जाण्यापूर्वी कुणीतरी तो प्रोड्यूस केलेला आहे. असंच कुणीतरी थिएटर बांधलेलं आहे. प्रोजेक्टर चालवणारा कुणीतरी आहे. बागेत जायचं ठरवलंत तर बागही अगोदर कुणीतरी फुलवली आहे. आत्ता ज्या गाडीत आपण बसलो आहोत, ती गा..’

‘समजलं, माणूस स्वतंत्र नाही, असंच ना ? गप्प एका ठिकाणी नुसता शांत बसलो तर ?’

‘किती वेळ बसाल ?’

‘जिवंत राहीन तितका वेळ.’

‘तेही तुमच्या हातात नाही. तुमचा श्वास तुम्ही घेताय असं वाटतं तुम्हाला.’

ओंकारनाथांनी गाडी सुरू केली.

‘कुठे जायचं ?’ सायरानं विचारलं.

‘तुम्ही म्हणाल तिकडे.’

‘सरवटेच्या घरी चला.’

‘नॉन्सेन्स. त्यानं आज दांडी मारली. अत्यंत टॅलण्टेट आहे. मनात येईल तेव्हा वाघासारखं काम करतो, पण बेभरवशाचा. कधी दगा देईल भरवसा नाही. स्टाफच्या बोडक्यावर एवढा खर्च करतो. पण जाणीव एकालाही नाही.’

‘सरवटेच्या मुलाला अॅक्सिडेण्ट झालाय.’

‘आं, तुम्हाला काय माहीत ?’

‘त्यांच्या बायकोला रजा मिळत नाही. म्हणून दोन दिवस मी त्याच्या मुलाजवळ बसले. आज मी कामावर आले म्हणून सरवटे लेकाजवळ थांबलेत.’

ओंकारनाथ न बोलता सायरा सांगेल त्या दिशेनं गाडी चालवीत राह्यले. मधेच एका दुकानापाशी थांबून सायरानं एक मोठा कॅडबरी चॉकलेटचा डबा घेतला आणि ती ओंकारनाथांना म्हणली,

‘हा डबा तुम्ही त्याला द्या.’

ओंकारनाथांचा एक हात, ड्रायव्हिंग करता करता पाकिटाकडे गेला. सायरा पटकन् म्हणाली,

‘मी तुम्हाला वेगळं मानीत नाही.’

ओंकारनाथांनी पटकन् तिच्या हातावर हात ठेवून तो दाबला. सायरानं हात सोडवूनही घेतला नाही आणि प्रतिसादही दिला नाही. हात काढून घेत ओंकारनाथ म्हणाले,

‘आय् अॅम् सॉरी.’

सायरा हसून म्हणाली, ‘एखाद्या तानेला कडाडून टाळी दिल्यावर कुणी सॉरी म्हणत नाही. उत्कट आशय, आविष्कारासाठी पटकन् शॉर्टकट शोधतो. टाळी म्हणजेही रसिकांनी मनातल्या मनात कलावंताला केलेला तो स्पर्शच असतो.’

सरवटे त्या दिवसापासून संपूर्ण बदलला. त्या दिवसापासून म्हणण्यापेक्षाही, तो आठ दिवस कामावर आला नसतानाही त्याला मस्टरवर गैरहजर मांडलेलं नव्हतं हे पाहून तो बदलला. कामावर आला आणि तसाच तो ओंकारनाथांसमोर मस्टरसकट गेला.

‘सर, मी आठ दिवस घरी असूनही...’

‘मला माहीत आहे सगळं. नियमांवर बोट ठेवायला आणि सोयीप्रमाणे बोटांवर नियम नाचवायला हे सरकारी ऑफिस नाही.’

त्या दिवसापासून सरवटेनं कात टाकली. आठ दिवसांचं तुंबलेलं काम त्यानं फायली घरी नेऊन तीन दिवसांत संपवलं. सायरा केव्हातरी म्हणाली,

‘सगळ्या माणसांना पैशानं बांधून ठेवता येत नाही. जे हवं असतं ते प्रथम द्यावं लागतं.’

केवळ सरवटेनंच नव्हे, तर त्या दिवसापासून ओंकारनाथांनी पण कात टाकली. एके

दिवशी सायराच्या लक्षात आलं ते ओंकारनाथांनी तिच्याकडून सहीसाठी बॉलपेन मागितलं तेव्हा. त्यांचा 'क्रॉस' सेट टेबलावर नव्हता.

सायरानं त्या रिकाम्या स्टॅण्डकडे पाह्यल्यावर ओंकारनाथ म्हणाले,

'महेश कंपनीचा डायरेक्टर आला होता. त्यानं विचारलं, हा सेट कुठे मिळतो ?'

मी म्हणालो, 'इथेच. आणि दिला.'

जरा वेळ थांबून ते पुढे म्हणाले,

'रोज वापरुन वापरुन तो सेट इतका परिचयाचा झाल्यानं त्याच्याबद्दलची लालसा कशी कुणास ठाऊक कमीच झाली.'

ओंकारनाथांच्या चांगुलपणानं सरवटे इतका भारावून गेला होता की त्यानं केव्हातरी त्यांची जन्मतारीख शोधून काढली. सगळ्यांकडून वर्गणी काढली आणि सगळ्या स्टाफनं त्यांना क्रॉसचाच सेट दिला. ही योजना सायराचीच असं समजून ओंकारनाथांनी तिला तिची जन्मतारीख विचारली. ती पटकन म्हणाली,

'तुमच्या वाढदिवसाचं श्रेय तुम्ही मला देऊ नका. ती सगळी सरवटेची कल्पना होती. एकट्याची. मी फक्त कॉंट्रीब्यूशन दिली.'

'प्रेझेण्ट तुम्ही सुचवलं असेल.'

'माझ्याप्रमाणे सगळ्या स्टाफला तुमच्या टेबलावर सेट दिसत नाही, हे समजलं होतं.'

'ओ. के. आय्. बिलीव्ह धिस्, तरीही तुम्हाला तुमची बर्थडेट सांगायला काय जातं ?'

'स्टाफमधल्या प्रत्येक जणाची विचारा. मग माझी सांगते.'

'प्रत्येकाचा बायो-डेटा चेक् करा आणि हे काम तुम्हीच करा.'

'आणखी एक सुचवू ?'

'अवश्य.'

'सगळ्यांना त्यांच्या अडनावानं हाक न मारता त्यांच्या स्वतःच्या नावानं बोलावीत जा. अंतर कमी होईल.'

आज प्रथमच आपला नवरा सगळ्या शोकेसेस् उघडून काय शोधतोय् ते विनीताला समजेना.

'काय शोधताय ?'

'आपण एक वॉकमन् घेतला होता ना ?'

'आपल्याकडे चार आहेत.'

'कुठे आहेत ?'

विनीतानं निर्देश केलेलं कपाट ओंकारनाथांनी उघडलं. त्यातले दोन वॉकमन तर रेपरसकट पडले होते. त्यातला एक ब्रीफकेसमधे ओंकारनाथांनी ठेवल्यावर विनीतानं विचारलं,

'त्याचं काय करणार आहात ?'

'उमेशचा आज वाढदिवस आहे.'

'उमेश कोण ?'

'माझा असिस्टंट.'

'त्याला आडनाव नाही वाटतं ?'

'आडनाव सगळ्या फॅमलीला असतं. नाव फक्त ज्याचं त्याचं असतं.'

'सायरासारखं म्हणा की.'

'तसं समज.'

'उमेशचं वय काय ?'

'असेल चाळीशीच्या आत.'

'इतक्या मोठ्या माणसांचे वाढदिवस आणि त्यासाठी प्रेझेंण्ट, गंमतच आहे.'

'तुझ्या त्या प्रत्येक हिंदी सिनेमातल्या घोड्यांसारख्या हिरॉइन्सचे वाढदिवस पाहताना

तुला गुदगुदल्या होतात ना ?'

'प्रेझेंटचा खर्च करावा लागत नाही म्हणून.'

'तिकीटं फुकट मिळतात का ?'

'परवडतात म्हणून जातो. तुमचं वाया गेलं तरी.'

'मग हेही परवडतंय्.'

'तुम्हाला परवडत असेल.'

'चार वॉकमन्पैकी एकदा तरी त्यातला वापरलास का ?'

'सगळेच वापरायला हवे होते, म्हणजे घरातन असे गेले नसते.'

।। नऊ ।।

लाटांबरोबर मागेपुढे होणाऱ्या निर्माल्याकडे पाहात ओंकारनाथ म्हणाले,

'सायरा, मला आज तुझ्याबद्दल सगळी माहिती हवी आहे.'

'एकदम आज ह्या विषयावर आलात ?'

'तुझे सगळे विचार ऐकून. विचाराइतकं देखणं दुसरं काही नाही. तसं का हे कळत नाही. तेही तूच सांगशील असं मला वाटतं.' ओंकारनाथांचा आजचा नूर आणि सूर वेगळाच होता.

काय सांगणार ? -एखादा प्रश्नच पुष्कळदा त्या दिशेचा शोध घ्यायला प्रवृत्त करतो. शिक्षणानं सगळी उत्तरं मिळत नाहीत. मेंदूतल्या आळसावलेल्या पेशींना शिक्षण फक्त जाग आणतं. वस्तू, माणसं, आकडे, इतिहास ह्यांची कोठारं म्हणजे मेंदू. स्मरणशक्ती, स्मृती ह्यांचं प्रचंड गोडाऊन म्हणजे मेंदू. किडलेलं धान्य, विचार, आठवणी फेकून देण्याचं सामर्थ्य प्राप्त झाल्याशिवाय शिक्षणाचं ज्ञानात रूपांतर होत नाही. शिक्षण म्हणजे पोपटाचा पिंजरा. ज्ञान म्हणजे राजहंस. नीर-क्षीर भेद समजल्याशिवाय अनावश्यक माहितीनं बेजार झालेला मेंदू टवटवीत राहणार नाही. नव्या शुद्ध विचारांसाठी त्या करोडो पेशी रिकाम्या हव्यात आणि प्रेम-भक्तीसाठी मनाचे, कमळाच्या पानाचे द्रोण निर्लेप हवेत. अशा रिकाम्या जागी जो उतरतो तो निसर्गच असतो, ह्याची खुद्द सायरालाही प्रथम अनुभूती आल्यामुळे तिला स्वतःलाच खूप हलकं वाटलं. एकदम मोकळी होत ती म्हणाली, 'सगळेच विचार देखणे नसतात. माणसाचं मन हे त्याला लाभलेलं वरदान आहे, तसाच तो शापही आहे. आपल्याला कारण नसताना जेव्हा हलकं-फुलकं वाटतं तेव्हा अख्खा निसर्ग तुमच्या मनात उतरलेला असतो. चैतन्याचा तो नुसता संचार नसतो तर महोत्सव असतो. विचार तेव्हा देखणे वाटतात. प्रकट होण्यासाठी निसर्गानं ते शेवटचं माध्यम निवडलेलं असतं.'

'म्हणजे कसं ?'

'स्थूल रूपानं अस्तित्वाचा साक्षात्कार घडवण्याचा निसर्गालाही कंटाळा येत असावा. नॅशनल जिऑग्राफीच्या दूरदर्शनवर तुम्ही काही मालिका पाहिल्या असतील तर आपण कल्पनाही करू शकणार नाही असे किडे, प्राणी आपल्याला दिसतात. तिथं पडद्यावर ते फक्त दिसतात. त्यांचा स्पर्श कसा असेल तो अंदाजसुद्धा करता येत नाही. त्यांचे आवाज रेकॉर्ड झाले तरी ध्वनी कळतो. पण गंध कळत नाही. स्थूल आविष्काराच्या मर्यादा

संपल्या की निसर्गही सूक्ष्म रूपाकडे वळतो आणि विचारांच्या इतकं सूक्ष्म दुसरं काही नाही. तिथं सौंदर्यच आहे. त्यांचं कृतीत रूपांतर झाल्यावर जर आनंदाची निर्मिती झाली तर माणसातलं देवत्व प्रकट होतं आणि क्लेश निर्माण झाले तर सैतानाचा जन्म होतो असं मानावं. विचार व्यक्तीला घेरून टाकतात, आचार समाजावर आघात करतात आणि समाज फक्त प्रतिध्वनी करतो. म्हणूनच सर, विचार कसेही असले तरीसुद्धा, जे मिळवावंसं वाटतं, ते प्रथम द्यावं लागतं.' ओंकारनाथ सद्गदित झाले. पुनः तिचा हात हातात घेऊन ते म्हणाले,

'किती विलक्षण, अलौकिक बोललीस.'

'हे मी बोलले नाही. प्रगट होण्यासाठी निसर्गानं सायराला वाणी दिली.'

ओंकारनाथ गप्प झाले. अजून सायरा स्वतःबद्दल बोलायला तयार नाही. हळूहळू अंधार वाढत होता. समुद्रात पडलेल्या दिव्यांची प्रतिबिंब हालत होती. खरं तर परतायची वेळ झाली होती. पण सायरानं तिचं आत्मवृत्त सांगितल्याशिवाय आज इथून उठायचं नाही असं ओंकारनाथांनी ठरवलं होतं.

'निघायचं ?'

'नाही.'

'इथंच रात्र काढायची का ?'

'तेही शक्य नाही.'

'मग चला.'

'तुझी सगळी माहिती तू सांगितल्याशिवाय आज मी तुला घरी सोडणार नाही.'

'माझा पूर्वेतिहास फार रूक्ष आहे. मी काय काय सांगणार ?'

'तू आत्तापर्यंत मला एकदाही घरी का येऊ दिलं नाहीस ?'

'मी जिथं राहते, ते घर माझं नाही.'

'म्हणजे ?'

'सगळं सांगायला हवंच का ?'

‘जबरदस्ती नाही. जिज्ञासा आहे.’

‘जिज्ञासा कशासाठी ? तुम्ही बॉस. मी एम्प्लॉयी. मॅटर एण्ड्स.’

‘ह्या नात्यातूनच मी प्रत्येकाशी वागत आलो. स्वतःच्या फॅमिलीच्या बाबतीतही. मी नवरा आणि विनीता पत्नी. माझ्या काही जबाबदाऱ्या आहेत, तिची काही कर्तव्यं आहेत. मॅटर एण्ड्स.’

‘मग माझ्याबद्दल हे कुतूहल का ?’

‘तुझ्या विचारांनी भारावून गेलो म्हणून.’

‘एखाद्या संन्यासिनीप्रमाणे मी डोक्यावरून पदर घेऊन, रूद्राक्षांची माळ घालून पांढऱ्या शुभ्र साडीत वावरल असते तर ?’

‘तर...तर कदाचित् मी तुझ्या वाऱ्यालाही उभा राहिलो नसतो. त्या पेहरावातल्या व्यक्तीकडून वेगळं काही ऐकायला मिळणार नाही, ह्याची प्रथमदर्शनीच तयारी होते.’

‘विचारांचं नातं कपड्यांशी जोडण्याइतकी, विचारांची दुसरी अवहेलना नाही. ह्या प्रकाराचं शल्य अनेक सामान्यं ठरलेल्या माणसांना सलत असेल.’

‘म्हणजे कसं ?’

‘रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, दयानंद महर्षींपासून जे. कृष्णमूर्तीपर्यंत कुणाच्याही बाबतीत, ही थोर माणसं वयाच्या तिसऱ्या वर्षापासून वेगळीच वाटत होती, असं कुणी म्हटलं तर माणसं विश्वास ठेवतात आणि तशी ती होती सुद्धा. सायरा नावामागं कसली परंपरा ? कसलं वलय ? -प्रेमप्रकरणात फसणाऱ्या हजारो मुलींपैकी एक. तिनं फार तर, ‘तुम क्या जाने, तुम्हारी यादमे हम कितने रोये.’ ह्यासारखी गाणी म्हणत हिंडावं, आणि निसर्गानं फारच थैमान घातलं तर किंवा सोशल स्टेटससाठी, कुणाच्या तरी नावाचं लोढणं म्हणून गौरवानं चार काळ्या मण्यांचा क्रूस गळ्यात अडकावावा, असंच ना ?’

‘तुला मी इतकं कमी मानलेलं नाही.’

‘सर, माझं विसरून जा. समोर येणाऱ्या प्रत्येक माणसाच्या आत उतरा. अष्टवक्राचा साक्षीभाव मनात जपणारा माणूस कोणत्या पोशाखात समोर उभा असेल किंवा शेजारून जाईल, ह्याचा पत्ताही लागणार नाही.’

‘तो पत्ता कसा लावायचा ?’

‘पुनः तेच सांगेन. ‘ढाओ अक्षर प्रेम का पढे.’ समोरच्या माणसावर प्रेम करावं, जगण्यावर भक्ती करावी, म्हणजे आयुषय उधळावं असं वाटत नाही. वेळ हीच संपत्ती; आत्ताचा क्षण म्हणजे अलिबाबाची गुहा.’

सायराच्या डोळ्यात सरळसरळ पहात ओंकारनाथ म्हणाले,

‘माणसांवर प्रेम केलं तरी माणसं मोकळी होत नाहीत.’

‘म्हणजे मागचं बोलत नाहीत, असंच ना ? -आपला प्रवास असाच का व्हावा, ह्याचा शोध प्रत्येक जण घेत असतो. आपण नेमून दिलेली भूमिका वठवण्यासाठी आलो आहोत, हे नाटक आपली एन्ट्री होण्यापूर्वी सुरू झालेलं आहे आणि आपल्या एक्झिटनंतरही चालू राहणार आहे, हे जेव्हा अचानक समजतं तेव्हा रंगमंचावरच्या प्रकाशातही चाचपडायला होतं. अशा वेळी म. भा. चव्हाणांच्या ओळी आठवतात आणि मागचं कुणालाच काही सांगावंसं वाटत नाही.’

‘हरकत नाही. त्या चार ओळी ऐकवायला तर संकोच वाटणार नाही ना ?’

‘भेकडांनी सांगू नये

मला त्यांचा इतिहास

लपाछपीच्या खेळाला

कोण म्हणेल प्रवास ?’

ओंकारनाथांनी पटकन् विचारलं,

‘लपाछपीचा खेळ कुणी आपण होऊन खेळतं काय ?’

‘तुमच्यावर तशी वेळ कशाला येईल ?’

‘उमेशला मी वॉकमन दिला तर विनीतानं दोन दिवस अबोला धरला. त्यानंतर चारच दिवसांनी टिपणीसचा वाढदिवस होता तेव्हा माझ्या घरातला, मीच विकत घेतलेला परफ्यूम मला चोरून आणावा लागला. स्वतःच्या बायकोपासून लपाछपी, डावपेच.’

सायरा म्हणाली, ‘सर, बायको परकीच असते. मला जन्मदात्या आईबापांना फसवावं

लागलं.'

'का ?'

'काही अपवाद वगळले तर आमच्या जातीत स्त्रियांना शिक्षण मिळालंच पाहिजे असं अनेकांना वाटत नाही. बुरखापद्धत आहेही आणि क्वचित ठिकाणी नाहीही. पण हे अपवादानेच. चार बायका करण्याची मुभा आहे. आमच्या जमातीतही, अल्प प्रमाणात का होईना वैचारिक बदल होताहेत. माझ्या बापानं कोणताच विधीनिषेध मानला नाही. तीन लग्नं केली. मला पाच बहिणी, दोन भाऊ. माझ्या काहीशा बंडखोर वृत्तीपायी मी माझं शिक्षण, स्कॉलरशिपवर चालू ठेवलं. बारावीची परीक्षा दिली. शेवटचा पेपर दिला त्याच दिवशी मला दाखवायला नेली. त्या मुलाचं शिक्षण शून्य. पैसा बेदम. कारण गर्दचा व्यापार. लग्न झाल्यावर मला गल्फमधे पाठवणार, अशा वार्ता कानावर आल्या. माझ्या बापाला, माझ्यासमोर दहा हजार रूपये देण्यात आले. दुसऱ्या दिवशी पहाटे मी घरातून पळून गेले. माझी एक जिवाभावाची मैत्रिण होती. हॉस्पिटलमधे नर्स होती. आठ दिवस तिच्या घरात लपून राह्यले. टीव्हीवर 'लापता'च्या दोन डझन यादीत स्वतःचा फोटोही पाह्यला. मी बुरखा झुगारून दिला होता. त्यापायी लाथाबुक्क्या, काठ्या, सगळं पचवलं होतं. पण नंतर आठ दिवस बुरख्यामुळेच वाचले. कंटाळलात ?'

'नॉट अॅट ऑल.'

'माझ्या मैत्रिणीनं मला नोकरी दिली; आणि एक वेगळी सायरा जन्माला आली. आज तुम्हाला, तसा तुमच्यावर अधिकार नसताना, मी जे जे बोलले...'

ओंकारनाथांनी सायराचा पटकन् हात धरला. दुसऱ्या हातानं तिचा पालथा हात थोपटीत ते अगतिकतेनं म्हणाले,

'डोण्ट मिसअंडरस्टॅण्ड मी. अधिकार नाही, वगैरे काही बोलू नका. आय अॅम स्टार्व्हड. आय नीड कंपनी.'

हात सोडवून न घेता सायरानं नुसतं पाह्यलं. ओंकारनाथ म्हणाले,

'मला आईवडिलांचं प्रेम मिळालं नाही. मी माझ्या धनाढ्य काकांच्या घरी आश्रितासारखा वाढलो. काकांचा मुलगा लोफर निघाला. काकाकाकूंच्या पंगतीत मला कधीही जेवायला मिळालं नाही. स्वयंपाकीणबाईबरोबर जेवायचं. घरातल्यांचा चहा झाला, म्हणजे मागं उरणारी चहाची पत्ती पुनः उकळून तो चहा प्यायचा. एकदा एका कपाचा कान माझ्या हातून फुटला, तेव्हापासून चहा-कॉफी जाड काचेच्या ग्लासातून

पिणं नशिबी आलं. ऐपत आल्यावर हॉटेलींग आणि शॉपिंग करणं, ही माझी एन्टरटेनमेण्ट झाली आणि बायकोनं त्यात भर घातली. वस्तू वापरण्यापेक्षा, ती आपल्यापाशी आहे, ह्याचाच आनंद. जाऊ दे. मी माझंच सांगत राह्यलो. तुम्हाला बोअर कशाला करू ? तुम्ही तुमच्याबद्दल सांगा.'

ओंकारनाथांच्या हातातला आपला हात सायरानं काढून घेतला नाही. त्या स्पर्शाला फक्त आधाराची सावली हवी होती. ओंकारनाथांच्या हातावर थोपटत सायरानं विचारलं,

'मी तुम्हाला बोअर करू का ?'

'हे मोकळं होणं आहे. माझ्या गतकाळातून तुला...तुम्हाला....'

'तुला चांगलं वाटलं; सांगा पुढे.'

'काय सांगणार ? फक्त घटना आहेत. तुझं सांगणं वेगळं. त्यातून विचार मिळतात. प्रथम प्रथम मी चिडत असे. कशावर, कुणावर-कळत नव्हतं. तुझी आर्ग्युमेंटस् खोडता येईनात, तेव्हा वेगळ्या विचारांचा छंद जडला. कोणत्या घडामोडींमुळे तुझे विचार इतके पारदर्शक झाले, ते मला आता हवं आहे.'

'ही सगळी प्रोफेसर मंडलीकांची कृपा आहे.'

'मंडलीक कोण ?'

'अत्यंत बुद्धिवान, खरं तर जिनीयसच आणि तितकेच दुर्दैवी प्रोफेसर.'

'म्हणजे ?'

'ही इज पॅराप्लेजिक. मी त्यांच्याच आश्रयाला आहे. त्यांना दुसरे कोणी नाही. बायको अचानक वारली. तो धक्का त्यांना पेलला नाही. प्रथम ताप येऊ लागला. तो त्यांनी अंगावर काढला. एके दिवशी टेंपरेचर बेदम वाढलं. नाऊ ही इज डिसॅब्लड. मुलगा आणि सून त्यांना सोडून गेली.'

'ह्या अवस्थेत ?'

'चोवीस तासाच्या कारारावर, एका नर्सच्या हवाली करून गेले. ती नर्स मी. मला नोकरी मिळाली. फिलॉसॉफी आणि अध्यात्माचा व्यासंग, तरीही माझ्या 'सायरा' नावाला ते बिचकले. मी ते टिपलं, पण दुसऱ्याच क्षणी माझं लक्ष शेजारच्या

ज्ञानेश्वरीकडे गेलं. कॉलेजमध्ये असताना एका ऑफ पिरीयडला, पाटणकर नावाच्या एक प्राध्यापिका अचानक आल्या आणि पाऊण तास फक्त पसायदानावर बोलल्या. धर्म, जात-पात ह्याच्या पलीकडे जाऊन, सगळ्या विश्वात शांती नांदावी, असं सांगणारे ज्ञानेश्वर. मी अभावितपणे ज्ञानेश्वरी उचलली; कपाळाला टेकवून ठेवून दिली. मंडलीक त्याक्षणी माझ्या मैत्रिणीला म्हणाले, 'हिला आजपासून राहू दे.'

त्यादिवशी मला समजलं, सर्वात मोठा धर्म कोणता ? -तर 'प्राण आहे तोपर्यंत जगणं' हाच धर्म मोठा.'

सायरा थांबली. ओंकारनाथही गप्प होते. कुणाच्या वाट्याला कोणतं आयुष्य येईल, तसंच का येईल, कशाकशाचा भरवसा नाही. कोणत्या चेहऱ्यामागे कोणती कहाणी आणि अशा किती कहाण्या ? आपल्या ऑफिसात तेवीसचोवीस माणसं आहेत. रोज प्रत्येकाच्या ग्रंथात नवानवा मजकूर लिहिला जात असेल. तो मजकूर विसरून, प्रत्येकान नेहमीचं काम करायलाच हवं. ह्यालाच नोकरी म्हणतात. थोडंफार स्वातंत्र्य असलंच तर ते घरी. स्वातंत्र्य म्हणजे तरी काय ?

काम नाकारण्याचा हक्क म्हणजे स्वातंत्र्य. म्हणजे, सायराच्या वाट्याला हे स्वातंत्र्य नाही. दोन्हीकडे नोकरीच. ओंकारनाथांनी हा विचार बोलून दाखवताच सायरा म्हणाली,

'मिळालेलं काम आवडू लागलं की नोकरी शब्द पुसला जातो. बापाच्या घरी काम जबरदस्तीनं करावं लागत होतं. जास्तीत जास्त काम माझ्या नावावर मांडून ठेवलं जायचं. शिक्षणाची किंमत मला अशीही मोजावी लागत होती. मंडलीकांची नोकरी मला दोन दिवसात सेवाधर्मासारखी वाटू लागली. त्यांच्या घरी राह्यले आणि दुसऱ्याच दिवशी एक वेगळा धडा शिकले, कोणत्याही क्रमिक अभ्यासपत्रकात नसलेला. मंडलीकांना स्पंजिंग करण्यासाठी मी गरम पाणी आणि टॉवेल घेऊन त्यांच्या समोर उभी राह्यले. ते कमालीचे संकोचले. 'मी ह्यापूर्वी एका नर्सिंग होममधे ही सगळी कामं केली आहेत.' म्हटल्यावर त्यांचा संकोच दूर झाला. तेव्हा समजलं, माणसापेक्षा त्याचा व्यवसायच काही बंधनं दूर करतो.'

'आजही ही सगळी कामं संभाळून तुम्ही कामावर येता ?'

'बारावीचा रिझल्ट लागेपर्यंत, केरवारे, भांडी-धुणी, स्वयंपाक-सुश्रुषा ही सगळी कामं माझ्याकडे होती. पगार शून्य. मला आसरा हवा होता आण मंडलीकांना देखभाल. निखळ, निरपेक्ष प्रेम केवळ शून्यावस्थेत मिळतं. निर्विचार क्षणी जो उद्गार उमटतो तोच प्रेमाचा, समाधीचा अनुभव असतो. थोडा जरी विचार जागा झाला की हिशोब आला. मित्रांपासून सख्ख्या नातेवाईकांपर्यंत आपण ज्यांना ज्यांना जवळचे मानतो

किंवा जे जे आपल्याला जवळ करतात, ती निव्वळ गरजांची स्पर्धा असते.'

'रिझल्ट लागल्यावर काय फरक पडला ?'

'मी मेरिटलिस्टमध्ये आले. टाईम्सला फोटो आला. त्या दिवसापासून मंडलीकांनी माझा, त्यांची शिष्या म्हणून स्वीकार केला. मला त्यांनी फिलॉसॉफी घेऊन एम.ए. पर्यंत शिकवलं.'

'सायरा, तू...तुम्ही एम्.ए. आहात ? -कधी बोलला नाहीत ?' -ओंकारनाथ उडालेच.

'तुम्हाला केवळ स्टेनो-टायपिस्ट हवी होती. मंडलिकांची फिलॉसॉफीची लेक्चर्स लिहिण्यासाठी मी दोन्ही शिकलेच होते. ज्या महितीची तुमच्या नोकरीसाठी गरज नव्हती ती माहिती आपण होऊन का द्यायची ?'

सायराकडे अजून त्याच गोंधळलेल्या मनःस्थितीतून ओंकारनाथ म्हणाले,

'तुझी संपूर्ण ओळख मला कधीच होणार नाही का ?'

'तशी ओळख कुणाचीच होत नाही. स्वतःचीही. म्हणूनच विचारते, तुम्हाला त्या काळातली सायरा कशाला हवी होती ? -कालची सायरासुद्धा माझ्यापासून अंतरावर गेली आहे. आत्ता, ह्या क्षणी तुमच्या शेजारी जी सायरा आहे, ती खरी. उद्या सायरा भेटली तरी तीही आत्ताची सायरा नसेल. सर, तुम्ही काय करता सांगू ? हातात येणारे सगळे क्षण उघडून न बघता तुम्ही ते फेकून देत आहात.'

नेहमीप्रमाणेच गोंधळून ओंकारनाथांनी तिच्याकडे पाह्यलं. लाटांकडे पहात सायरा स्वगत म्हणावं तशी बोलू लागली,

'एक सम्राट होता. एक साधू रोज दरबारात येऊन त्याला एक छोटं फळ देत असे. त्या फळाकडे तुच्छतेनं पाहून राजा ते फळ प्रधानजीकडे देत असे. हा क्रम वर्षोनवर्षे चालला. एकदा त्या सम्राटानं चाळा म्हणून ते फळ प्रधानाला न देता, सहज तिथल्या पोपटाच्या पिंजऱ्यात टाकलं. पोपटानं ते खायला सुरूवात केली आणि अचानक त्यातून एक तेजस्वी हिरा बाहेर पडला. राजानं तातडीनं प्रधानाला, त्या दिवसापर्यंतच्या फळांचं काय केलं म्हणून विचारलं. राज्यकर्त्यांना केव्हाही, कोणतीही जुनी माहिती हवी असते, हे प्रधानजींना माहित होतं. तो त्या सम्राटाला घेऊन तळघरात गेला. तिथं सडलेल्या फळांचा खच पडला होता आणि तळघर तेजस्वी रत्नमाणकांनी झगमगत होतं. सर, आयुष्यात उगवणारा प्रत्येक क्षण असाच आपण, न उघडता फेकून देतो. अशी किती रत्नं आपण गमावली, हे सांगता येईल का ? -कचरा झालेली भूतकाळातली

सायरा तुम्हाला कशाला हवी ?'

सायरा दुसऱ्या दिवशी कामावर आली नाही, तेव्हा ओंकारनाथांना ती सम्राटाची गोष्ट किंवा अवांतर गप्पा, ह्यांपैकी काहीही आठवलं नाही.

'उद्या सायरा भेटली तर, तीही आजची सायरा नसेल.' हे एकच विधान आठवायला लागलं. ते अस्वस्थ व्हायला लागले. तिला घरी सोडताना ती गाडीत असंच काहीतरी सांगत होती. 'वाऱ्याची तीच झुळूक दुसऱ्यांदा येत नाही. पंख्याशिवाय चैन पडलं नाही, तरीही ते वारं नकोसं वाटतं.' कारण तीच तीच हवा तुमच्याभोवती वेढे घालते. सुखाची पुनरोक्ती झाली तरी त्याचा शीण येतो. त्यात ताजेपणा नसतो. पावसाचा प्रत्येक थेंब नवा असतो. समुद्राची प्रत्येक लाट कोरीकरकरीत असते. नदीवर आंघोळ केली तर नदीचं नाव तेच असलं तरीही पाण्याचा प्रवाह वेगळा असतो. पाण्यात उतरतो तेव्हाचं पाणी कधीच पुढे जातं, पाण्यातून आपण बाहेर येतो ते पाणी बदललेलं असतं. प्रत्येक क्षणाचं भिजणं वेगळं असतं. सगळी समृद्धी असून माणसाला त्या जगण्यात जेव्हा आनंद निर्माण करता येत नाही तेव्हा समाजावं, नव्या दिवसाची किरणं त्याला झेलता आली नाहीत. तो कालचाच परिचयाचा दिवस आज जगतोय. निसर्ग रोज बदलतोय आणि निसर्गाचीच एक निर्मिती असूनही माणसाला उबग येतो, ह्याचं कारण काय ? -तर कालचा दिवस तो आजही घट्ट धरून ठेवतो. भूतकाळावर अलोट प्रेम. पार केलेलं दुःखही आठवत बसायचं आण उद्याचा दिवस कसा असेल हयासाठी पत्रिका, कुंडली दाखवत रहायचं. आजचं चांदणं दिसत नाही आणि कोजागिरी कधी ह्यासाठी छापलेले चौकोन शोधायचे. प्रतिक्षणी आनंदी राहण्याचा वसा घेतला तर कोजागिरी मावळतच नाही.'

आत्ता हे सगळं आठवून ओंकारनाथ मनात म्हणाले, 'माझा आनंद तुला पाहण्यात, तुला ऐकण्यात आहे. तो ह्या क्षणी मिळाला नाही तर कालचाच दिवस आज जगण्याची सक्ती होते.

सक्तमजूरी म्हणजे हेच असेल का ?

सायरा पंधरा दिवस कामावर नंतर आलीच नाही तेव्हा ओंकारनाथांनीच रजा घेतली. महत्त्वाचे पेपर्स सरवटे घरी घेऊन येत राहाला. ऑफिसात येणारे फोन्स घरी येऊ लागले. बिझीनेसच्या त्याच त्याच चर्चा ऐकून विनीता पिसाळून गेली. घरी येणाऱ्या कागदी नोटात तिचं सर्वस्व होतं. त्या कशा येतात त्यामागची यातायात तिला नको होती. तिच्या माहेरी तिच्या वडिलांची चलती होती तेव्हा फोनवरची अर्धाअर्धा तास चालणारी, धार हरवलेली भाषा तिच्या अतिपरिचयाची होती. शेअरबाजारात वडिलांनी फटका खाल्ल्यावर त्यांचे विनंतीअर्ज, मवाळ उत्तरं, बेभरवशाचे वायदे

ह्याचा तिला वीट आला होता. आत्ता एकच गोष्ट समाधानाची होती की संध्याकाळी सातच्या ठोक्याला रोजची ठरलेली कॅश घरी येत होती. चेक्स, ड्राफ्ट्स सुखरूप पोहोचत होते. तेवढीच विनीताची कोजागिरी. ह्यापेक्षा मोठी जाग तिच्या परिचयाची नव्हती. एकदा ती लक्षमी घरातल्या सेफमधे स्थानबद्ध केली की ओंकारनाथांची ही गृहलक्षमी घर सोडून, भ्रमंती करायला मुक्त. ओंकारनाथांनी तिच्याबरोबर फिरण्याचं बंद केल्यावर, 'कोणती साडी नेसू ?' -ह्या प्रश्नापुरताही संवाद उरला नव्हता. बाहेर पडण्यापूर्वी, टोल नाक्यावर पावती फाडल्याप्रमाणे ओंकारनाथांचे चुंबन घ्यायचं की त्या दिवसाची फुलाची पुडी टाकून झाली. दुकानादुकानातून, महिन्याच्या करारावर, दुकानातल्या देवांच्या तसबिरीला हार घालणारे फेरीवाले असतात. फुलं मोजकी, दोरा जास्त, एक तांबड्या गंधाची टिकली तसबिरीला आणि गल्ल्यातली टिकली खिशात, एवढ्या माफक हालचालींवर भक्तीचं सुपरमार्केट चालतं, तसंच विनीताचं प्रेम.

अंतरीच्या उमाळ्यापेक्षा प्रदर्शनाची आरास महत्त्वाची. आठदहा दिवसांनी ओंकारनाथांनी विनीताची भावनाशून्य मिठी चुकवायला सुरुवात केली. 'उद्यापासून पेपर टाकू नकोस.' असं सांगितलं तर तोसुद्धा 'मग कधीपासून ?' हा प्रश्न विचारतो. विनीता, 'शेतकऱ्यांचं कर्ज माफ.' म्हटल्यावर, ते ऐपत असूनही मुक्त होतात, तशी मोकळी झाली. ओंकारनाथ आणखी एकटे झाले; अस्वस्थ झाले.

सजवलेलं घर त्यांना खायला उठलं. म्युझियमचा वॉचमन दार सोडून एकाही दालनात डोकावीत नसेल, असं त्यांना वाटलं. सहज चाळा म्हणून त्यांनी हाताला येईल तो अंक उचलला. वाचन करणं हा ज्याचा हेतू नाही त्याला कोणतंही अधलं मधलं पान उघडलं गेलं तरी चालतं. ओंकारनाथांनी तसंच केलं. क्रूसावर टांगलेल्या येशूचं करूण चित्र. त्याबरोबर येशूच्या ठिकाणी ओंकारनाथांना स्वतःचं चित्र दिसायला लागलं. समाजाला कुशीत घेण्यासाठी येशूनं हात पसरले. त्यात खिळे ठोकले गेले. आपण एका हातानं अमाप पैसा कमवला आणि दुसऱ्या हातानं प्रचंड वस्तूसंग्रह केला. त्या चित्राशी स्वतःशी जास्त तुलना न करता ओंकारनाथांनी चित्राखालचं शीर्षक वाचलं.

'माय बॉडी स्पोक, नॉट आय्.'

कोणत्या तरी खेड्यातली घटना. रोगराईपायी रोज माणसं डझनावारी मरत होती. प्रत्येक ठिकाणी फादर धावत होता. तीन दिवस झोप नाही, जेवण नाही. चौथ्या दिवशी तो ग्लानी येऊन पडला आणि त्याचवेळी एक स्त्री तिच्या नवऱ्यासाठी, फादरनं त्याच्यावतीनं प्रेयर म्हणावी, म्हणून भरल्या डोळ्यांनी आली. तो म्हणाला, 'मी उद्या सकाळी येईन.' तो झोपला. त्याला जी जाग आली, ती पहाटेचा मंद वारा आला, पक्षांची किलबिल कानावर पडली तेव्हा. रात्रीचे शब्द आठवले. आपण असं कसं बोलून गेलो, हे त्याला कळेना. मग ध्यानात आलं, 'बोलून गेलं ते शरीर, आपण नव्हे.' तो

सकाळी त्या बाईकडे धावला. ती आश्चर्यानं म्हणाली,

'यू हॅव कम् अगेन ? -ही डाइड पीसफुली.'

आपल्या रूपानं कोण येऊन गेलं, हे उमगून तो पुटपुटला, 'माय बॉडी स्पोक, नॉट आय्.'

सगळं सांगणारी एवढीच कथा.

पुस्तक मिटून टाकत डोळे बंद करीत ओंकारनाथ मनाशी म्हणाले, 'दामाजीचं रूप घेणाऱ्या विठ्ठलाला सगळीकडे नजर ठेवावी लागते.' पाठोपाठ दुसरा विचार मनात आला, 'हाच विठ्ठल माझ्यासाठी सायरा होऊन येईल का ?'

त्याक्षणी जणु काही सगळ्या वास्तूमधून नाद आला,

'तू विठ्ठलाच्याच सहवासात आहेस.'

'कुठे ? -कधी ? कसा ?'

'बेदम पैसा हाच तुझा विठ्ठल आणि नाना प्रकारच्या चैनीच्या वस्तूंनी भरलेली तुझी ही वास्तू म्हणजे पंढरी. आणखी काय हवं, बोल.'

'शांती हवी शांती.'

'म्हणजे सायरा.'

'तसं म्हणा, सायरा हवी.'

'कोणती सायरा ? -ती रोज वेगळं रूप घेते. त्यातली नेमकी कोणती ?'

'मी हरलो. ती खूप उंच आहे. मी क्षुद्र आहे.'

रामलालनं एक पाकीट आणून दिलं. ओंकारनाथांची तंद्री मोडली. पाकिटावर नाव-गाव काही नव्हतं.

'कुणी दिलं ?'

'नाव सांगितलं नाही, साहेबांना द्या म्हणाला आणि गेला.'

ओंकारनाथांनी पत्र फोडलं. नुसता 'सर' एवढाच मायना. त्यांनी घाईघाईनं शेवटी पाह्यलं. 'तुमची एस' एवढीच सही.

'एस' पेक्षाही 'तुमची' ह्या शब्दानं ओंकारनाथांच्या रक्तातून काहीतरी सळसळत गेलं.

सर,

खरोखरच, 'तुम्ही बॉस, मी स्टेनो', मॅटर एण्डस. तरीही मी आजवर सीमारेषा अनेकदा ओलांडून खूप बोलले. का ? -ते सांगू शकत नाही. कदाचित् त्यातलं काहीही तुमच्यासाठी नसेल. ते स्वतःलाच अजमावणं असेल. ते सगळं स्वगतच समजा. तुम्ही विचाराल, नाही... चुकलंच. मीच मला विचारलं, स्वगताला वैखरीपर्यंत प्रवास का करावासा वाटला ?

स्वगत चलाख असतं. विचार अदृश्य असतात म्हणून त्यांच्यात अफाट सामर्थ्य असतं. किंबहुना एकूणएक अदृश्य गोष्टी प्रचंड शक्तीशाली असतात. त्यांचं सामर्थ्य असतं. त्यांना पेलवेनासं झालं की त्यांना प्रकट व्हावं लागतं. जे प्रकट होतं त्याला आपण स्वभावधर्म म्हणतो.

धर्म हा शब्द महाभारतापासून बदनाम झाला असला तरी धर्माची संकल्पना वेगळी आहे.

जो तुमचा आनंद वाढवतो, तो धर्म.

आयुष्य एक सतारीसारखं वाद्य आहे. ती सतार वाजवण्याचं सामर्थ्य आणि कला अवगत करून घेणं, हाच धर्म. तो धर्म समजला तर छोट्या बीजातून प्रचंड वृक्ष जन्माला येतो. त्यावर पक्षी येऊन बसतात. गातात, त्यांचे संसार बहरतात. पैशाशिवाय, पक्ष्यांचं धन वेगळंच असतं. गाणं हेच त्यांचं आयुष्यभरचं कार्य. पक्षी पिल्लासाठी घरं बांधतात. स्वतः वळचणीखाली राहतात. मला सांगा, एका तरी पक्षाची हाऊसिंग सोसायटी आहे का ? तसं असतं तर झाडाझाडांवर राजीव, संजय, इंदिरा ह्यासारख्या नावाच्या अनाधिकृत कॉलनीज दिसल्या असत्या.

बघा, असं होतं. 'पक्षांचा' हा शब्द वापरल्याबरोबर मी भरकटले. 'पाखरू' म्हणायला हवं होतं. पाखरं घरं बांधतात पिल्लांसाठी. पिल्लाला मुक्त आकाश खुलं झालं की घर आपण होऊन काटक्या टाकतं. म्हणून झाडंही नोटिसा पाठवत नाहीत. मनाचा हा मोठेपणा झाडं जमिनीपासून शिकतात आणि पावसाचा वर्षाव करून आकाश जमिनीवर प्रेमाचा अभिषेक करतं. सृष्टीतलं हे नातं ओळखता आलं की सतार योग्य हातात पडली, असं समजावं.

हाच धर्म.

हेच माझं स्वगत.

तरी प्रकट करावंसं वाटलं. कारण तिथंही दोन तट पडतात. ह्या दोन भूमिकांकडे लांबून पाहणारा तिसरा कुणीतरी आपल्यातच वास्तव्याला असल्याशिवाय, दोन मनांचा झगडा दिसणारच नाही. आपण 'डावा' आहोत आणि आपण उजवा, हे कान, डोळे, हात, पाय यांना कुठे कळतं ? -ह्यांना संबोधणारा माणूस तिसरा असतो, तसं. तर हा तिसरा जो असतो, त्याला संभ्रमात टाकण्याचं काम दोन मनं करीत राहतात. कुणाचं ऐकावं हे कळेनासं झालं, की कौल लावण्यासाठी कुणी तरी बाहेरचा मिळावा लागतो. तसा मी रोज तुमच्यावर कौल लावत होते आणि कौल कधीच सामान्य माणसावर लावला जात नाही. तुमच्यातल्या सुप्त शक्तीला ओळखा. मग तुम्ही स्वतःच एक आनंदवृक्षा व्हाल. सायराची गरज पडणार नाही. जी आज संभाव्य कल्पना वाटत आहे ती वास्तवतेत उतरवणं ह्याचंच नाव साधना.

तुमची,

एस्.

एक महिना झाला, ओंकारनाथ ऑफिसचं नाव काढत नाहीत, अजब आहे.

'तुम्हाला काय झालंय तरी काय ?'

'काही नाही.'

'ताप वगैरे काही नाही.'

'घरी राहण्यासाठी ताप यायलाच हवा का ?'

'सिमल्याला तरी चला.'

'किती वेळा जायचं ?'

'मग कामावर जा.'

'कशासाठी ?'

'पैसे नकोत का ?'

‘बिल्डिंगच्या भाड्यावरही जसे जगलो तसं जगता येईल.’

‘आणखीन चांगलं जगायचं असेल तर ?’

‘म्हणजे आणखीन मोठं घर, जास्त फर्नीचर, ह्याहून मोठ्या शोकेसेस. लेटेस्ट कार, वर्ल्ड टूर.... असंच काहीसं ना ? ते सगळं महिन्यात, आत्ताच दिलं तर ?’

‘घरात आहे तेच वाटत सुटला आहात. तुम्ही नवं काय देणार ?’

विनीता फणकाऱ्यानं निघून गेली.

।। दहा ।।

‘‘सायरा, तू ? - आणि इथे ?’

दार उघडताच ओंकारनाथ चक्रावले.

‘आत येऊ ना ?’

‘अवश्य. मी आजच्या सायराचं स्वागत करतो.’

सायरा समजून हसली आणि गंभीर झाली. संपूर्ण परिवर्ततन झालेल्या ओंकारनाथांना पाहून आपल्याला नक्की काय वाटेल ह्याच्या विविध संकल्पना करीत, तिनं त्यांचा पत्ता शोधून काढला. सहा महिने ओंकारनाथ कामावर आले नाहीत. तेव्हा सरवटेनं इरेला पेटून सायराचं घर शोधून काढलं. पण ती भेटलीच नाही. त्यानंतर सात-आठ महिन्यांनी सायरा घरी परतली तेव्हा तिला सरवटेची जुनी चिठ्ठी मिळाली. आता एकूणएक प्रश्न विचारण्याची वेळ तिच्यावर आली होती. प्रश्नांचा क्रम मनाशी पक्का करीतकरीतच ती नव्या पत्त्यावर आली आणि ओंकारनाथांचा संपूर्ण कायापालट पाहून तिला काहीच विचारवंसं वाटेना. जेमतेम पाचशे चौरस फुटाचा तो फ्लॅट होता. बाहेरच्या खोलीत फक्त एक कॉट आणि अभ्यागतांसाठी दोन सेमीइझीचेअर्स. एका भिंतीला फक्त एक कॅलेंडर आणि त्याच्या समोरच्या भिंतीवर एक भलं मोठं पोस्टर. त्यावर कबिराचा दोहा. हीच रचना सायराच्या टेबलावर असायची. दोघं एकमेकांकडे बघत राहिली आण त्यांना कितीतरी गोष्टी न सांगता समजल्या. तरीसुद्धा, ओंकारनाथ स्वतःचं घरही सोडतील ही सायरा अपेक्षा नव्हती.

तेवढं जाणून घ्यायचंच होतं.

‘तू कशी आलीस ?’ ओंकारनाथांकडून ह्या प्रश्नाची अपेक्षा नव्हती. ‘तू आलीस, खूप बरं वाटलं.’ अशा विधानाची गरज होती का ? सरवटेकडून आलेली चिठ्ठी वाचता क्षणी ‘आपण का चाललो आहोत ?’ -हा प्रश्न आपण स्वतःला विचारला नाही. त्याक्षणी जी सायरा होती, तिला ‘निघावं’ असं वाटलं, म्हणून ती सायरा निघाली. आत्ताच्या सायराला तिच्याच चिठ्ठीतलं वाक्य आठवलं. ‘तुम्हाला सायराची गरज वाटणार नाही !’ तसं झालं असेल ? -ओंकारनाथांचा आनंदवृक्षा झाला असेल ? -त्यांना पारंब्यांचा आधारही नको असेल ? -ओंकारनाथांच्या चेहऱ्यावरून पत्ता लागेना. सायरानं स्वतःला सांगितलं, ‘आता तू स्वतःचाच शोध का घेत नाहीस ? -ओंकारनाथांना तू जे वेळोवेळी ऐकवलंस, ते कशासाठी ? -त्यांना आत्मवान् करण्यासाठी.

पण का ?

'एकला चालो रे' च्या मार्गावर फेकल्या गेलो म्हणून सोबत हवी होती ?' -ह्या प्रश्नामुळे ती कासावीस झाली पण त्याचंही ठाम उत्तर मिळेना.

पुनः कौल लावायचा का ?'

आणि ओंकारनाथ आणखी वरच्या पायरीवर गेले असतील तर ? -क्रिकेटमधे अपेक्षा नसलेल्या प्लेअरनं शतक झळकवावं, तसं झालंय का ? -छे. संभ्रमाच्या भोवऱ्यात तिथल्यातिथे गरगरून खोल जाण्यापेक्षा प्रश्न विचारून मोकळं व्हावं. 'मी तुमच्यासाठी आले. तुम्ही इतके बदलाल असं वाटलं नव्हतं.'

ओंकारनाथ हसत म्हणाले,

'माळयानं खतपाणी घालून, मशागत करून रोप वाढवावं आणि मग त्याला म्हणावं, तुला कळी येईल असं वाटलं नव्हतं, तसं झालं.'

सायरा पटकन म्हणाली,

'फुल म्हणा फुल. कळीजवळच का थांबलात ?'

कळीचं फुल होणारच.'

'शाश्वती काय ?' -असं म्हणून ओंकारनाथ एकदम गंभीर झाले.

'का नाही होणार ?'

'कळीपर्यंत पोहोचलोय् की नाही, ह्याचा तरी ठाम अंदाज कुठाय् ?

'आपण निगेटिव्ह विचार करणं, हाच ह्या प्रवासातला चकवा आहे. पुनः पहिल्या जागी येतो माणूस.'

सायराच्या या विधानावर ओंकारनाथ एकदम बोलायला लागले.

'सायरा, ह्या सगळयाला तू कारणीभूत आहेस. मी प्लॅस्टिकच्या फुलांवरच प्रेम करणारा माणूस. सुगंध देणाऱ्या, चैतन्याच्या फुलांच्या दुनियेत तू मला आणलंस. मी कचकड्याच्या बाहुलीशी संसार करीत होतो आणि फीमेल रोबोटच्या बायकोच्या सहवासात राहत होतो. धातूनं बनवलेल्या बाईशी, यांत्रिक शृंगार करीत होतो. तुला

एकदाच स्पर्श केला तेव्हा स्त्रीचा स्पर्श कसा असतो ते मला समजलं. तू प्रतिसाद दिला नाहीस तेव्हा कळलं की सगळ्या उर्मी ज्याच्या त्याच्या वैयक्तिक असतात. त्याला दुसरी व्यक्ती जबाबदार नसते. मला पाय नव्हते, चाकं होती. नकाशात अरेबियन सी असं नुसतं लिहिलेलं असतं. नकाशात त्याच्या हेलावणाऱ्या लाटा नसतात. भरती ओहोटीचा खेळ तू मला दाखवलास. मी आकाशकंदिलात राहत होतो आणि समोर ज्या रंगाचा जिलेटीनचा कागद येता होता ते ते रंग जगाला देत होतो. श्रावणसरींच्या एजंटखाली मी आंघोळ करीत होतो.'

'म्हणजे काय ?'

'म्हणजे शॉवरखाली. तू मला वळवाच्या सरी झेलून भिजायला शिकवलंस. आणि एके दिवशी अचानक, समुद्रात निर्माल्य सोडून द्यावं, तसं मला सोडून गेलीस. फुलांचं खरोखरच निर्माल्य होतं म्हणून त्यांना समुद्राच्या पाण्याचं काही वाटत नाही. मी निर्माल्य नव्हतो. मी न सुकणारी प्लॅस्टिकची फुलं होतो -रंग होताच, पण जाग येऊन गंधाच्या दुनियेत प्रथमच चार पावलं टाकायला शिकत होतो. चाकं गळून पडली होती, पण मातीचा स्पर्श समजायच्या आत तू माझा पांगूळगाडा काढून घेतलास. माझं नावच फक्त ओंकारनाथ. नाथ कसला ? मी त्या ओंकाराचा दासही होण्याच्या योग्यतेचा नव्हतो. वैखरीवरची वाणी मला फक्त माहीत होती. ती सगळी टाकसाळीतली नाणी होती. परावाणीचा, हुंकाराचा स्पर्श त्याला नव्हता. तुझ्या कधीकधी गप्प राहण्यातसुद्धा नाद होता. तू माझं अथांग सागरात, मी फुलत असताना विसर्जन केलंस, तेव्हा समुद्राच्या चैतन्यापेक्षाही मला त्याचा खारट स्पर्श प्रथम झोंबायला लागला. जित्याजागत्या माणसांवर मी प्रेम करू लागलो. मला ती चटक लावलीस आणि स्वतः दूर राहिलीस. तू थर्मामिटरमधल्या पाऱ्यासारखी आहेस. पारा तपमान दाखवतो पण आतल्या काचेला तो चिकटत नाही.'

'तुम्ही असं का म्हणता ?'

'न कळवता नाहीशी झालीस. दुसरं काय म्हणणार ? तू काय केलंस माहीत आहे ?'

'सांगा.'

'स्वतःची जागा न सोडता एखादा पत्ता सांगावा, तसं केलंस. किती फर्लांग सरळ जायचं, डावी-उजवीकडे कधी वळायचं, थोडक्यात म्हणजे पोस्टाच्या सरहद्दीत जी घरं येतात, त्यांचे पत्ते एका जागी राहून सांगता येतात. पण अनंताच्या प्रवासाला निघालं की साथ-सोबत हवीशी वाटते. ती मिळत नाही हे जाणवलं तेव्हा माझा अहंकार जागा झाला. सायरा नाहीतर नाही. सोयरा नव्हताच कुणी, सायरा पण नाही. गेली तर गेली, असं स्वतःशी म्हणालो. सायरा प्रत्येक दिवसाची वेगळी असेल तर कोणती

सायरा सोबतीला असेल, हे तरी कसं कळणार ?'

'आपद्दीपो भव' 'तुमचा दिवा तुम्हीच व्हा.' -असं बुद्धवचन आहे. तसा निघालो. दिशा मात्र तू बदललीस, मी कसा बदललो ते कळत नाही.'

सायरा शांतपणे म्हणाली,

'सर, परिवर्तन ही अंतर्मनातलीच प्रोसेस आहे. लाऊडस्पीकर्स लाऊन, कानठळ्या बसवणाऱ्या आवाजात प्रार्थना म्हणणं, हा राजकारणाचा भाग आहे. भक्ती, प्रेम, श्रद्धा, दया, शांती, क्षमा ही सगळी मौनाची रूपं आहेत. बाहेरच्या कोलाहलापासून लांब गेलात तेव्हा तुम्हालाच तुमचा सूर ऐकू आला. तो सूर ऐकू येऊनही जी माणसं तिकडे दुर्लक्ष करतात, त्यांना गुरू किंवा सायकिअॅस्ट्रिस्ट लागतो. मी काहीच केलं नाही. जास्तीत जास्त मी काही केलं असेल तर फक्त काडी ओढली. दिवा तुमचाच, वातही तुमचीच, तेलही तुमचंच. तरी एका गोष्टीचं नवल वाटतं. विनीतानं तुम्हाला कसं सोडलं ?'

ओंकारनाथ तिच्या डोळ्यात सरळ सरळ पाहात म्हणाले,

'कोणत्या ओंकारनाथाबद्दल तू विचारणा करीत आहेस असं मी तुझ्याप्रमाणे तुला विचारणार नाही.'

'सर...'

'तुझ्यावर हा कॉमेंट नाही. आजवर हा प्रश्न मला कुणी विचारला नाही. मी सगळ्यांपासून फटकूनच राह्यलो होतो. प्लॅस्टिकसारखा चेहरा असलेला मी तुझ्याइतकं भावनात्मक पातळीवर कुणीच मला गुंतवलं नाही.'

सायरा या विधानानं घाबरली. ओंकारनाथ गुंतत चालले होते, ह्या त्यांच्या कबुलीजबाबापेक्षाही, आपणही गुंतलो होतो का ? -ह्या आत्मपरिक्षणानं ती हादरली. तिथं द्वाड मन नेमकं काही सांगेना. यंत्रात तांत्रिक बिघाड झाला की हिरवा आणि तांबडा, दोन्ही सिग्नल चालू राहतात तसं झालं. तिनं गोंधळून पाह्यल्यावर ओंकारनाथ म्हणाले, 'भावना शब्द बोचत असला तर वैचारिक म्हणतो. कुणी जवळ आलं नाही, ही फॅक्ट. संसारानं मला धरलं नव्हतं, मीच संसार धरला होता, हे अचानक समजलं तेव्हा तो सोडणं सोपं होतं, तसा सोडला. अंगावरचे वळ कुरवाळत बसत राहालं की भूतकाळ जवळच राहतो. जवळ शब्दातच वळ आहे. अंगावरचे वळ जपत राहालं नाही म्हणजे भूतकाळ जॉमेट्रीतल्या रायडरसारखा फळ्यावर मांडता येतो. माझ्यात ते बळ आलं आहे की नाही हे पाहण्यासाठी आज प्रथम भूतकाळाकडे वळणार आहे.'

‘तू ऑफिसात आलीस ती एक स्टेनो म्हणून. सूर्यप्रकाश हळूहळू प्रखर होत जातो, तशी तू तापायला लागलीस. पण तुझ्या तापण्यानं चटके बसत नव्हते. ते झटके होते. परिवर्तनाला विरोध केला की चांगलं सांगणारा माणूस नकोसा होतो. सांगण्याऱ्याजवळ अहंकार असेल तर ज्ञानावर काजळी चढते. त्याचा डाग आपल्या अंगाला लागेल म्हणून आपण स्वतःला जपतो. अहंकार वगळून ज्ञान ग्रहण करण्याची कला आपल्याजवळ नसते. पण तुझ्या सांगण्यात आत्मियता होती. विचार करायला लावण्याचं सामर्थ्य होतं. आयुष्यात कधीच निरूत्तर न झालेल्या ओंकारनाथांना, आपल्याला गप्प बसावं लागत आहे, ह्याची जाणीव झाली. नुसती जाणीव न होता त्याचा आनंद वाटायला लागला, त्याक्षणी मिडीऑकर शब्द पुसला गेला.’

सायरा सुखावली. ही एक जखम अद्यापी वहात होती. आज ती थांबली. ती सुखावली खरी, पण त्याचक्षणी ती स्वतःला म्हणाली,

‘हाही अहंकारच. आपण कसल्या निरहंकारी ?’

ओंकारनाथ सांगतच होते,

‘आणि नंतर सगळं पालटलंच. माझी दिशा बदलल्याचं श्रेय तू स्वतःकडे घेत नाहीस, पण मी कधीच तुला ते दिलं आहे. तरीसुद्धा मी इतक्या दुसऱ्या टोकाला कसा गेलो, ते मला कळत नाही.’

‘तुमच्यासारखी व्यक्तीच इतकी बदलू शकते. सर, रागवू नका स्पष्ट बोलते म्हणून. पैसा आणि त्याच्या जोरावर मिळणाऱ्या सगळ्या गोष्टी, ह्यातल्या शेवटच्या टोकावर तुम्ही उभे होतात. घेतलेल्या वस्तूंचा उपभोग घ्यायचा असतो, त्याचा आनंदही तुमच्या कोषात नव्हता. पुढे पुष्कळ प्रवास होता पण रस्ता उरला नव्हता. जगात जे जे उत्कृष्ट आहे त्याचा मी मालक असेन. कायम प्रथम क्रमांकावर राहीन, अशी तुमच्या वर्तुळात तुम्हाला नशा होती. दुर्दैवानं तुम्हाला पत्नी तशीच मिळाली. इतकं ‘मेड फॉर इच अदर’ जोडपं मी पाहालं नव्हतं. ती नशा मला बघवत नव्हती. मला शान समजते. नशा नाही. अक्षरांची जागा बदलण्याचा सवाल होता. त्याला थोडीफार मी चालना दिली असेल. तुमचा चेहरा फिरवला की उलट्या दिशेचं तुम्ही अंतिम शिखर गाठणारच होतात. तिथंसुद्धा प्रथम क्रमांकावर कोण ? -तर ओंकारनाथ. दरीतलं शेवटचं टोक, तिथपर्यंत घसरलेला माणूस जर जागा झाला तर अधेमधे थांबत नाही.’

‘तू दिशा बदललीस असंच मी म्हणणार, पण ह्या अवस्थेपर्यंत कालापव्यय न करता विलक्षण गतीनं पोहोचवलं, ते मात्र विनीतानं. शी नेव्हर सेज् नो टू एनीथिंग, त्यानुसार मी सगळं सोडून निघालो, त्यालाही ती ‘नाही’ म्हणाली नाही,

‘सरप्रायझिंग.’

ओंकारनाथ नुसतं हसले.

‘मला त्यांची कीव करावीशी वाटते.’

‘ती फार वेगळ्या परिस्थितीतून आली. तिचा बाप शेअरबाजारतला दादा. गडगंज पैसा. माझ्या पाचपट. गोतावळा मोठा. खरं तर तो गुंतवळाच. असतील शितं तर जमतील भुतं’ म्हणतात तसं. कारभार डबघाईला येतोय् म्हटल्यावर सगळे पांगले. ‘सक्सेस् इज अ रिलेटिव्ह टर्म. मोअर सक्सेस, मोअर रिलेटिव्हज्’

सायरा हसली.

‘पांगताना ह्या गोतावळ्यानं त्यांच्या हाताला येईल ती वस्तू घेऊन पोबारा केला. ज्या वयात अशा घटनांचे शिलालेख होतात अशा वयाची त्या काळात विनीता होती. ती तेव्हापासून शुष्क झाली. वस्तू जपायला लागली. आई गेली आणि बाप कायम चिंतेत. अशा मुलीला नेमका मी मिळालो. मला पाहण्याऐवजी, माझं वेगवेगळ्या गोष्टींनी भरलेलं घर पाह्यल्यावर तिनं मला होकार दिला. रोज काही ना काही नवी वस्तू आणण्याशिवाय ती प्रसन्न होत नव्हती. मला काहीही अप्राप्य नाही, हे सिद्ध करता करता माझा अहंकार वाढत गेला. मी वस्तू वाटायला सुरुवात केल्यावर ती बिथरली. आपण एकमेकांच्या नादी लागलो असतो तरी तिची हरकत नव्हती. अफेअरचंही केव्हातरी रूटीन होतं आणि जोडीदार परत येतो. वस्तू गेली की गेली. मधे मी दोन दिवसाच्या सेमीनारसाठी बाहेरगावी गेलो होतो. त्या दोन दिवसात, मी वाटलेल्या एकूणएक गोष्टी दामदुप्पट भावानं तिनं खरेदी केल्या. गावाहून आल्यावर मला आरशात माझं प्रतिबिंब दिसेचना. माझ्या वासना, अहंकार, लोभ, संग्रहाची स्पर्धा, हे सगळे भाव तिच्या रूपानं सगुणसाकार झाले. माझंच भयानक अस्तित्त्व तिच्या शरीरातून सगळ्या वास्तूत फिरताना दिसलं. फोटोच्या आल्बममधला आपला एखादा जरी फोटो खराब आला तर आपण ते पान फाटून टाकतो. इथं संपूर्ण भूतकाळ आणि वर्तमान प्रत्यही जड रूपानं भोवती फिरत होतं. माझ्या त्या अमानुष दर्शनाला घाबरून मी घर सोडलं.’

‘आणि ऑफिस ?’

‘मिस्टर टिपणीसांची कृपा.’

‘म्हणजे ?’

‘मिसेस् टिपणीसांना मी वाढदिवसाला परफ्यूम दिला. त्याच्यावर ‘फॉर यू ओन्ली.’ असं नाव होतं. तेही श्रीयुत टिपणीसांनी ऑफिसात येऊन तमाशा केला, तेव्हा मला समजलं. मिसेस् टिपणीसांचे आणि माझे संबंध आहेत, हा आरोप. मिसेस् टिपणीसनं राजिनामा दिला.’

सुस्कारा टाकीत सायरा म्हणाली.

‘ह्याला मीच जबाबदार आहे.’

‘अजिबात नाही. मिस्टर टिपणीसांकडे पण आकशकंदील आहे; त्याचा रंग ह्या नात्यावर चढला.’

‘तुम्ही खूप उंच झालात.’

‘तूही कोणत्यातरी जिलेटीनमधून पाहू नकोस. सरळ सरळ पहा.’

‘ऑफिस सोडलंत ?’

‘सरवटेंना चालवायला दिलं. मी फक्त कन्सल्टन्ट म्हणून जातो.’

‘आणि घर ?’

‘आठवड्यातून एकदा.’

‘मुलं असती तर ?’

‘एकदाच तो क्षण आला होता. मिस्कॅरेज झालं. गर्भारपण म्हणजे बंदीशाला हे विनीताला समजल्यावर तिनं सरळ ऑपरेशन करून घेतलं.’

‘हाऊ सॅ ऽऽड्.’

‘आपण भूमिका वठवण्यासाठी आलो आहोत हे तू सांगितल्यापासून मी खूप शांत झालो, मी अकारण चिडत होतो....’

‘अकारण म्हणू नका. अज्ञात कारण म्हणा.’

‘सर, तुम्हाला फक्त प्रेम हवं होतं.’

‘कधी ओळखलंस ?’

‘तुम्ही फुलं देण्यामागचा संकेत विचारलात तेव्हा.’

‘मग सरळसरळ ‘आय लाइक यू’ असं का म्हणाली नाहीस ?’

‘माणसांचं प्रेम फार मर्यादित असतं. त्याला परीघ असतो. माणूस मोठया मनाचा, खूप विशाल मनाचा असं म्हटलं तरी फरक पडत नाही. खूप मोठं वर्तुळ काढलं तरीही त्याला परीघ आलाच, आणि परीघ आहे, तिथे सेंटर, मध्यबिंदू आलाच. मध्यबिंदू म्हणजे आत्मकेंद्रीतपणा. परीघ कितीही मोठा असो, त्रिज्या अनेक मैलांची असो, ती फिरणार मध्यबिंदूभोवतीच.’

‘काय बिघडलं ?’

‘त्याला पझेशन म्हणतात. मध्यबिंदूवर मग पत्नी असो किंवा प्रेयसी. परिघाशिवाय वर्तुळ पूर्ण करण्याची क्षमता फक्त निसर्गाजवळ असते. मला तुम्हाला त्या विराट, अंत नाही, स्वार्थ नाही, हक्क नाही अशा प्रेमाच्या वर्षावात सोडायचं होतं. मागणी करायचीच तर मी इतक्या मोठ्या प्रेमाची करावी. त्याच्याखाली कॉम्प्रमाइज नकोच. तुम्ही मुक्त, मी मुक्त; तरीही आपण एकमेकांचे. माझ्यापेक्षा चार पायऱ्या तुम्ही उंच.’

‘मी कुठे आहे, मला माहीत नाही. शिडीला वर किती पायऱ्या आहेत, ते माहीत नाही. मी कोणत्या पायरीवर आहे, त्याचा पत्ता नाही. एक गोष्ट नक्की, आता पायऱ्या उतरणार नाही.’

सायरा भारावली. अस्वस्थ झाली. थोडी एकाकी झाली. पण लगेच सावध होऊन सावरलीही.

तोपर्यंत अचानक ओंकरनाथ हात पसरून जवळ आले. सायरा जागची हालली नाही. ओंकारनाथांनी तिला मिठीत घेतलं. मिनीट दीड मिनिटानं भानावर येत ते सायराच्या कानात पुटपुटले,

‘माय बॉडी स्पोक, नॉट आय.’

सायरा शांत होती. आयुष्यातल्या प्रत्येक अवस्थेवर सावरणारे ज्ञानेश्वर त्याचवेळी दुसऱ्या कानात सांगत होते.

‘तैसी हे जाण माया ।

तू भ्रमत आहासी वाया ।
शस्त्री हाणीतलीया छाया ।
जैसी अंगी न रूपे ।।'

आपण सारे अर्जुन

वपु काळे

संसार खरंच इतका अवघड आहे का?

माणसाला नेमकं काय हवंय्?

संपूर्ण आयुष्य संगीतमय करता येणार नाही का?

एखाद्या मैफलीसारखं रंगवता येणार नाही का?

आपल्या जन्मापूर्वी हे जग होतंच. आपण मेल्यानंतरही जगाचा

कारभार तसाच चालू राहणार आहे. ह्या अवाढव्य रंगमंचावर

आपली 'एन्ट्री' मधेच केव्हा तरी होते आणि 'एक्झिट'ही. हे नाटक किती वर्षांचं, ते माहीत नाही. चाळिशी, पन्नाशी, साठी, सत्तरी..... सगळं अज्ञात. धडधाकट भूमिका मिळणार, की जन्मांधळेपणा, अपंगत्व, बुद्धीचं वरदान लाभणार, की मतिमंद?

भूमिकाही माहीत नाही.

तरी माणसाचा गर्व, दंभ, लालसा... किती सांगावं?

कृष्णानं बासरीसहित आपल्याला पाठवलं;

पण त्या सहा छिद्रांतून संगीत जन्माला येत नाही.

षडरिपूंचेच अवतार प्रकट होतात.

स्वतःला काहीही कमी नाही. स्वास्थ्याला धक्का लागलेला नाही.

तरी माणसं संसार सजवू शकत नाहीत.

वपु काळे

रंगपंचमी साजरी होते ती त्यातील माणसांच्या उत्साही सहभागामुळे,

विविध रंगांच्या उधळणीमुळे.

आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळी माणसे

आपल्याला सामील होतात.

आपल्या आयुष्याला बहरायला, फुलायला, रंगीबेरंगी करायला

ही माणसेच हातभार लावतात; प्रत्येकाचे रंग निराळे,

मग हे रंग कधी शहाणपणाचे असतात, कधी वेडेपणाचे,

कधी उत्साहाचे; तर कधी नैराश्याचे.

वपुंची त्यांच्या आयुष्यातल्या छोट्या-छोट्या प्रसंगांनी सजलेली ही 'रंगपंचमी'

कुठेतरी 'आपल्याही आयुष्यात असं घडलं होतं बरं का'

असं म्हणायला लावते.

हसवते. खिन्नता आणते, विचारही करायला लावते.